नवभारत

वर्ष ४ थें]   मे १९५१   [अंक ८ वा

किंमत १ रुपया

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्र. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

निवेदन

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई ही महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेली स्वायत्त संस्था आहे. मराठी भाषा विभागाच्या पत्राप्रमाणे (संदर्भ क्र. मसंस २०१६/प्र.क्र.११५/२०१६/भाषा-२, दि. ३ जानेवारी, २०१७) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे '**महाराष्ट्रातील मराठी संशोधन मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य योजना**' कार्यान्वित करण्यात आली असून या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य करण्यात येते.

सदर प्रकल्पांतर्गत प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांना राज्य मराठी विकास संस्थेद्वारे नवभारत मासिकांचे ऑक्टोबर १९४७ ते सप्टेंबर २०१७ पर्यंतच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासाठी अर्थसाहाय्य करण्यात आले होते. याअंतर्गत सदर अंकांचे संगणकीकरण करण्यात आले असून **प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांनी हे अंक जतन केलेले असल्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.**

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.

अनुक्रमणिका

वर्गणीदारांस सूचना

(१) 'नवभारत'चा अंक दरमहा १ तारखेच्या आंत नियमितपणें काळजीपूर्वक पोस्टांत टाकला जातो. वर्गणीदारांस जर आपला अंक ५ तारखेपर्यंत मिळाला नाहीं तर त्यांनीं प्रथम स्थानिक पोस्ट ऑफिसांत चौकशी करून नंतर आमचेकडे लिहावें. अंक शिल्लक असला तरच पाठविला जाईल. अंक न मिळाल्याबद्दल १० तारखेनंतर येणाऱ्या तक्रारीस उत्तर दिलें जाणार नाहीं.

(२) वर्गणीदार कोणत्याहि महिन्यापासून होतां येतें.

(३) पत्रव्यवहार करतांना नेहमीं अनुक्रम-नंबर अवश्य लिहावा. 'नवभारत' कचेरींतून दरमहा जो अंक रवाना होतो त्यावर पत्त्याच्या वरच्या बाजूस डाव्या हाताला अनुक्रम-नंबर लिहिलेला असतो.

(४) पत्ता बदलावयाचा असल्यास त्याबद्दलची सूचना कचेरीस २५ तारखे-पूर्वी मिळाली पाहिजे. त्यानंतर सूचना-पत्र आल्यास त्याची अंमलबजावणी त्याच महिन्यांत न होतां पुढील महिन्यापासून केली जाईल.

(५) 'नवभारत' च्या कोणत्याहि एजंटास वर्गणी वसूल करण्याचा अधिकार नाहीं. त्यामुळें कचेरी व वर्गणीदार या दोघांनाहि त्रास होतो व विलंब लागतो. म्हणून वर्गणी नेहमीं कचेरीकडे खालील पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी.

व्यवस्थापक
'नवभारत',
टिळक रोड, पुणें २

जाहिरातींचे दर

	संबंध पान	अर्धे पान	पाव पान
एक वेळ	७५	५०	३५
तीन वेळां	७० प्रत्येक खेपेस	४५ प्रत्येक खेपेस	३० प्रत्येक खेपेस
सहा वेळां	६५ ,,	४० ,,	२५ ,,
बारा वेळां	६० ,,	३५ ,,	२० ,,

पाव पानापेक्षां कमी जाहिरात स्वीकारली जात नाहीं.

कव्हर पान नं. ४	प्रत्येक वेळेस	५० रुपये
कव्हर पान नं. २ व ३	,, ,,	२० रुपये

(१) सर्व जाहिराती 'जाहिराती व जाहिरातदार' या सदरांत छापल्या जातात.

(२) शक्य असेल त्या वेळेस जाहिरातदारांचा थोडक्यांत परिचय देण्याची पद्धत स्वीकारलेली आहे.

(३) एका पानांत दोन कॉलम्स असतात.

(४) पानाचा आकार ८॥" × ५।"

व्यवस्थापक
'नवभारत'
२९१ शनिवार, पुणें २

या अंकांतील जाहिराती

अनुक्रमणिका

‘नवभारत’, मे १९५१

लेखक-परिचय

[या अंकांतील खालील लेखकांशिवाय बाकीच्या लेखकांचे लेख ‘नवभारतां’त या वर्षी यापूर्वी आले असून त्या त्या वेळीं त्यांचा परिचय दिला आहे.—का. सं.]

प्रा. अ. का. प्रियोळकर—कारवार येथें यंदा मेमध्यें भरणाऱ्या मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या विद्यमानें निघालेल्या सरकारी संशोधन-संस्थेचे डायरेक्टर. यांच्या व्यक्तित्वाचा व वाङ्मयाचा परिचय प्रस्तुत अंकांत प्रा. व. ना. नाईक यांनीं आपल्या लेखांत करून दिला आहे.

प्रा. व. ना. नाईक—(ठाणें)– मुलुंद येथील टोपीवाला कॉलेजचे माजी प्राचार्य. “Indian Liberalism : a Study”, “Jinnah : a Political Study” “Story of my transportation” (स्वा. वी. सावरकरांच्या ‘माझी जन्मठेप’ या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद)–इत्यादि पुस्तकांचे लेखक.

प्रा. जयन्त जोग— औरंगाबाद येथील डॉ. आंबेडकर यांनीं स्थापन केलेल्या कॉलेजमध्यें इंग्रजी व मराठी या विषयांचे प्राध्यापक.

मानवाच्या व मानवसंस्कृतीच्या विकासास पोषक होईल, अशा प्रकारें महाराष्ट्रीय जीवनाचा व संस्कृतीचा विकास करणें हें या मासिकाचें ध्येय व उद्दिष्ट आहे.

या मासिकांत येणाऱ्या लेखांत कोणत्याहि विशिष्ट मताचा, वादाचा, पक्षाचा किंवा पंथाचा प्रचार करण्याचा हेतु नाहीं.

संचालक व संपादकमंडळांतील सर्व व्यक्ती यांचेंहि सर्व विषयांत मतैक्य आहे, असें नाहीं. मानवी जीवनविषयक व सांस्कृतिक मूल्यांसंबंधीं सदृश अशा दृष्टिकोनानेंच त्यांना एकत्र आणलें आहे. तथापि, प्रत्येकाचें व्यक्तिवैशिष्ट्य व विचारस्वातंत्र्य यांचा विनाश न होतां विकास व्हावा या दृष्टीनेंच त्यांचें सहकार्य राहील. प्रत्येक व्यक्ति आपल्या नांवानें प्रसिद्ध होणाऱ्या लेखाबद्दलच जबाबदार राहील.

मासिकांत प्रसिद्ध होणाऱ्या लिखाणांत सत्यनिष्ठा, संयम आणि सहिष्णुता असतील अशी काळजी घेतली जाईल.

अनुक्रमणिका

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमालेच्या विश्वस्तमंडळाचें मासिक

वर्ष चौथें | अंक आठवा

नवभारत

मे १९५१

संचालक : श्री. शंकरराव देव

संपादक-मंडळ

आचार्य शं. द. जावडेकर-आचार्य स. ज. भागवत - श्री. हरि कृष्ण मोहनी - प्रा. वि. म. बेडेकर
का. संपादक

वार्षिक रु. ९ **सहामाही रु. ५** **अंकास रु. १**

हें मासिक र. ग. जोशी यांनीं सुलभ मुद्रणालय, २९१ शनिवार, पुणें २, येथें छापून सुलभ राष्ट्रीय ग्रंथमालेच्या विश्वस्तमंडळाकरितां तेथेंच प्रसिद्ध केलें.

आचार्य शं. द. जावडेकर

भगवद्गीतेंत काय आहे आणि काय नाहीं ?

भगवद्गीता हा ग्रंथ प्रामुख्यानें राजर्षींचा धर्म सांगण्यासाठीं निर्माण झालेला आहे. श्रीकृष्ण आणि अर्जुन हे दोघेहि क्षत्रिय असून त्यांच्यापुढें क्षात्रधर्माचाच आदर्श होता. आदर्श राजर्षि कसा असावा, याचें वर्णन भगवद्गीतेंत आलेलें असून " मी जो योग तुला सांगत आहें, तो प्रथमतः विवस्वानाला मी सांगितला. विवस्वानानें तो मनूला सांगितला आणि मनूनें तो इक्ष्वाकूला सांगितला. अशा परंपरेनें चालत आलेला हा योग राजर्षींना माहीत होता. पुढें तो नष्ट झाला व आज मी तुला पुन्हां सांगत आहें " अशी या योगाची परंपरा गीतेंत सांगितलेली आहे. अर्जुनाला युद्धाला प्रवृत्त करतांना धर्मयुद्ध हें क्षत्रियाचें कर्तव्य आहे, त्याच्याइतकें क्षत्रियाला श्रेयस्कर असें दुसरें कोणतेंहि कर्तव्य नाहीं, इत्यादि उपदेश श्रीकृष्णानें केलेला आहे. " धर्मयुद्ध करणें हा तुझा स्वधर्म आहे. तुझ्या गुणकर्मांना अनुरूप असें हें स्वाभाविक कर्म आहे. मी युद्ध करणार नाहीं, असें जें तूं म्हणत आहेस तो तुझा अहंकार आहे. हा तुझा आग्रह व्यर्थ आहे. तूं नाहीं म्हणालास तरी तुझी क्षात्रप्रकृति तुला खेचून युद्धांत ओढून नेईल. याच्या उलट तुझ्या स्वभावाला अनुरूप असा हा धर्मयुद्ध करण्याचा स्वधर्म जर तूं निष्कामबुद्धीनें आचरलास, तर तुला त्यापासून कोणतेंहि बंधन लागणार नाहीं. तुझ्या मोक्षप्राप्तीच्या, आत्मिक शांतीच्या आड तें येणार नाहीं " असा उपदेश श्रीकृष्णांनीं अर्जुनाला केलेला आहे. यांत समाजांतील क्षत्रिय वर्गाचें स्थान व कार्य, अर्जुनाची क्षत्रियप्रकृति आणि तिच्या गुणकर्मानुसार त्याचा बनलेला स्वभाव या सर्व गोष्टी गृहीत धरून केलेला हा उपदेश आहे. असें असूनहि अखेरीस " प्रत्येक भूतमात्राच्या अंतःकरणांत ईश्वर उभा असतो, तो विश्वघटनेच्या यंत्रावर आरूढ झालेल्या सर्व जीवमात्रांना आपल्या मायेनें फिरवीत असतो म्हणून त्याला शरण जाऊन, तुला जशी इच्छा होईल, तसें कर. त्याला शरण गेलास म्हणजे जें करण्याची इच्छा तुला होईल, त्यापासून तुला परमशांति आणि शाश्वत स्थान प्राप्त होईल " असाहि श्रीकृष्णाचा अर्जुनाला उपदेश आहे.

राजर्षि व ब्रह्मर्षि यांचे आदर्श

गीतेंतील एकंदर विवेचन चातुर्वर्ण्याच्या पार्श्वभूमीस अनुसरून केलेलें आहे. चातुर्वर्ण्ययुक्त समाजांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार विभाग असून त्यांपैकीं प्रत्येकाचा स्वधर्म भिन्न आहे. तो प्रत्येकाच्या प्रकृतिगुणानुसार ठरविलेला आहे. भिन्न प्रकारच्या प्रकृतिगुणांच्या लोकांचें कार्य एकंदर समाजाच्या धारणपोषणास उपयोगीं पडावें, ही समाजधारणेची अथवा लोकसंग्रहाची कल्पना गीतेच्या एकंदर उपदेशाला आधारभूत अशी आहे. चारहि वर्णांचे स्वधर्म समाजधारणेला उपयोगी असून प्रत्येक वर्णांतील मनुष्यानें आपापलें कर्तव्य निष्काम, निरहंकार व निर्मम बुद्धीनें करीत राहिल्यास लोकसंग्रह उत्तम प्रकारें चालून प्रत्येकास मोक्षप्राप्तिहि होऊं शकेल, अशी गीतेची दृष्टि आहे. व्यक्तीचा मोक्ष आणि समाजाची धारणा, आत्मप्राप्ति आणि समाजसेवा तसेंच आत्मिक शांति आणि समाजधारणेस व जीवितयात्रेस अवश्य असणारे भौतिक भोग

अथवा सुखें या दोन्हीहि दृष्टींनीं गीतेचें विवेचन आहे. हेंच या धर्मग्रंथाचें वैशिष्ट्य व श्रेष्ठत्व आहे. त्यांत जीवन्मुक्ताचें ध्येय वर्णिलेलें आहे, त्याचप्रमाणें कर्मयोगाचें श्रेष्ठत्वहि सांगितलेलें आहे. असें असल्यामुळें गीतेंत केवळ वैयक्तिक मोक्ष साधूं इच्छिणाऱ्या संन्याश्याचा धर्म प्रतिपादिलेला नसून आत्मोन्नति आणि समाजसेवा या दोहोंकडेहि अद्वैतदृष्टीनें पाहाणाऱ्या कर्म-योग्याचें ध्येय गीतेनें मानवापुढें ठेविलेलें आहे. गीतेची दृष्टि अशी सर्वसंग्राहक व व्यापक असली तरी, गीतेनें ज्या विशिष्ट कर्मयोगाचें वर्णन केलें आहे व ज्याचा प्रामुख्यानें उपदेश केलेला आहे, तो कर्मयोग हा राजर्षीचा कर्मयोग आहे. क्षत्रिय-धर्मास आणि क्षत्रियप्रकृतीस अनुरूप अशा तऱ्हेचा तो उपदेश आहे, हें विसरून चालणार नाहीं.

या राजर्षींच्या आदर्शाहून थोडा भिन्न असा आणखी एक आदर्श मानवसमाजापुढें प्राचीन धर्मपुरुषांनीं ठेविलेला आहे. हा आदर्श ब्रह्मर्षींचा कर्मयोग या नांवानें वर्णितां येईल. राजर्षि आणि ब्रह्मर्षि हे दोघेहि समाजधारणा करण्याचें कर्तव्य करीत असतां, स्वतःच्या आत्मोन्नतीकडेहि तितकेंच लक्ष देत असतात. समाजधारणेला निदान आज-पर्यंत तरी या दोनहि प्रकारच्या कर्मयोग्यांची आव-श्यकता भासलेली असून, यापुढेंहि बराच काल तरी राजर्षि व ब्रह्मर्षि हे दोन्हीहि आदर्श समाजधारणेला व समाजोन्नतीला अवश्य आहेत असें मला वाटतें. गीतेंत जे ब्राह्मणांचे स्वभावगुण म्हणून वर्णिले आहेत, त्या गुणांतून ब्रह्मर्षींचा आदर्श निर्माण होत असून क्षत्रियप्रकृतीचे गुणधर्म असे जे वर्णिले आहेत, त्यांतून राजर्षींचा आदर्श निर्माण झाला आहे. दुष्टांचा संहार आणि साधूंचें संरक्षण करण्या-साठीं निरहंकार आणि निर्मम वृत्तीनें शस्त्रबलाचा उपयोग करणें हें आपलें कर्तव्य आहे, असें राजर्षि मानतात. याच्यापुढें जाऊन दुष्टांचाहि आत्मोद्धार करणें, त्यांच्यांतील सुप्त भावना जागृत करणें आणि या कार्यासाठीं स्वतःच्या देहाचें व प्राणाचेंहि अवश्य असल्यास समर्पण करणें, हा ब्रह्मर्षींचा आदर्श आहे. तो स्वतःच्या देहरक्षणासाठीं अथवा समाजहितासाठींसुद्धां शस्त्रबलाचा, हिंसेचा अथवा असत्याचा आश्रय करणार नाहीं. गौतमबुद्ध व येशू खिस्त यांच्या जीवनांत हा आदर्श आढळतो. म. गांधी यांची प्रकृति अशा ब्रह्मर्षींच्या आदर्शास अनुरूप अशी होती. श्रीकृष्ण, महंमद पैगंबर किंवा लो. टिळक यांच्यापुढें राजर्षींचा आदर्श होता. लोकसंग्रहासाठीं अवश्य व अपरिहार्य असणारी अथवा तशी वाटणारी हिंसा पूर्णपणें निरहंकार, निर्मम व निष्काम अथवा निर्वैर बुद्धीनें केल्यास तिच्यामुळें आत्मिक शांति ढळण्याचें कारण नाहीं, असें या सर्वांनीं निरनिराळ्या भाषेंत प्रतिपादन केलें आहे. त्यांनीं केलेलें हें वर्णन कोणत्याहि मूर्त व्यक्तीस पूर्णांशानें लागू पडत नाहीं, असें म. गांधी मानतात. म्हणजे राजर्षींचा हा आदर्श एक अमूर्त असें ध्येय आहे, हें मत खरेंच आहे. पण केवळ राजर्षींच्याच आदर्शाला हें लागू पडतें असें नाहीं. वर ब्रह्मर्षींचा आदर्श म्हणून जो वर्णिला, त्यालाहि उद्देशून म. गांधींनीं अशा प्रकारचे उद्गार काढिलेले आहेत. संपूर्ण सत्य आणि संपूर्ण अहिंसा यांचें सर्व प्रसंगीं व सर्व परिस्थितींत आचरण कर-णारा मनुष्य, हेंहि एक अमूर्त ध्येय आहे. कोणत्याहि विशिष्ट व्यक्तीस हें वर्णन पूर्णांशानें लागू पडत नाहीं, अथवा पडण्याचा संभव नाहीं, असेंहि म. गांधींनीं अनेक ठिकाणीं म्हटलेलें आहे. तात्पर्य, राजर्षि असो किंवा ब्रह्मर्षि असो, हे दोनहि पूर्ण स्वरूपांत अमूर्त असेच आदर्श आहेत. तथापि क्षात्रप्रकृतीचा मनुष्य आपल्यापुढें राजर्षींचा आदर्श ठेवून शक्य तितकें त्याच्याशीं तादात्म्य पावण्याचा प्रयत्न करीत असतो. तसाच ब्राह्मण-प्रकृतीचा मनुष्य आपल्यापुढें ब्रह्मर्षींचा आदर्श ठेवून त्याच्याशीं तादात्म्य पावण्याचा प्रयत्न करीत असतो. जोंपर्यंत समाजाला आपल्या धारण-पोषणास क्षत्रियधर्माची आवश्यकता भासत आहे, तोंपर्यंत राजर्षींचा आदर्श पुढें ठेवून वर्तन करणाऱ्या लोकांची समाजाला आवश्यकता आहे. ज्या कर्तव्यांची समाजाला आवश्यकता आहे, तीं कर्तव्यें निष्काम बुद्धीनें आचरण करणाऱ्यांना आत्मिक शांति लाभते, हें मत चुकीचें म्हणतां येणार नाहीं. त्याचबरोबर हेंहि खरें आहे कीं, दुष्टाची हिंसा करण्याहून दुष्टाचा उद्धार करणें हें ध्येय अधिक

श्रेष्ठ आहे. या श्रेष्ठ ध्येयाचा स्वीकार करून जर सर्वच लोक त्यासाठीं आत्मसमर्पण करण्यास स्वेच्छेनें तयार होतील, तर दुष्टांचा संहार अथवा त्यांचा प्रतिकार करण्याची व्यवस्था समाजाला करावीच लागणार नाहीं. पण समाजांतील सर्व व्यक्ती सर्व परिस्थितींत या तत्त्वानुसार वर्तन करीत नाहींत आणि आपल्या जीवितवित्तांच्या रक्षणासाठीं लोक दंडधारी राज्यसंस्थेची इच्छा करीत असतात. अशा परिस्थितींत त्यांचें रक्षण करण्यासाठीं ज्यांनीं आपल्या हातीं राजदंड घेतला, त्यांना सर्व प्रसंगीं अहिंसा पाळून आपलें कर्तव्य पार पाडणें शक्य नाहीं. 'समाजानें त्यांच्या हातीं राजदंड दिला असून त्याचा उपयोग आमच्या जीवितवित्तांच्या संरक्षणासाठीं करणें हाच तुमचा धर्म आहे अथवा हेंच तुमचें कर्तव्य आहे,' असें समाजच त्यांना सांगत असतो. म्हणून समाजांत राजर्षींचा आदर्श प्रतिष्ठा पावलेला आहे. पण मानवाचा हाच एक सर्वश्रेष्ठ आदर्श आहे अथवा मानवसमाजाच्या आदर्शावस्थेंत या आदर्शाची आवश्यकता आहे, असें मानण्याचें कारण नाहीं. एकंदर मानवसमाजाची प्रगति हिंसेकडून अहिंसेकडे होत राहिली पाहिजे आणि म्हणून त्यांतील हिंसा उत्तरोत्तर नष्ट होत गेली पाहिजे. अर्थात् समाजाच्या आदर्शावस्थेंत दंडधारी राज्यसंस्थेचीहि गरज उरूं नये असें आपणांस मानतां येईल. असें असलें तरी, आज मानवसमाजाला ही अवस्था प्राप्त झालेली नाहीं आणि म्हणून त्याला दंडधारी राज्यसंस्थेची व राजर्षींच्या कर्मयोगाची आवश्यकता आहे. अशा राजर्षींच्या कर्मयोगांत निरहंकार व निर्ममवृत्तीनें आपलें कर्तव्य करीत राहाणें म्हणजे अधार्मिकांना दंड अथवा शासन करण्याचें आपलें कर्तव्यहि करीत राहणें हें ध्येय स्वीकारावें लागतें. समाजहितासाठीं ही जी हिंसा करावी लागते तो गौण पक्ष आहे व तीहि उत्तरोत्तर कमी करतां आली पाहिजे हें उघड आहे. समाजाच्या धारण-पोषणास हें जें दंडसंस्थेचें साहाय्य घ्यावें लागतें, तें कमी करण्याचें कार्य समाजांतील अहिंसावृत्तीची वाढ होण्यावर अवलंबून आहे. ह्या अहिंसावृत्तीची वाढ करण्यासाठीं शम, दम, तप, शौच, क्षमा आणि आर्जव (म्हणजे सरळपणा, सत्यनिष्ठा) या गुणांची आणि ज्ञान, विज्ञान आणि 'आस्तिक्य' यांची वाढ समाजांत झाली पाहिजे. ही वाढ करणें हें राजर्षींचें कार्य नसून तें ब्रह्मर्षींचें कार्य आहे. हे गुण ब्राह्मणप्रकृतीचे द्योतक आहेत असें गीतेनें वर्णिलें आहे. क्षत्रिय प्रकृतीच्या गुणांत शौर्य, तेज, धृति, दक्षता, युद्धांतून पराङ्मुख न होणें, दान आणि 'ईश्वरभाव' हे गुण सांगितलेले आहेत. अर्थात् युद्ध आणि हिंसा हीं त्यांत गृहीत धरलेलीं आहेत. पण हें युद्ध धर्मयुद्ध असलें पाहिजे आणि दंड धारण करीत असतां केलेलीं सर्व कर्में धर्मशास्त्रास अनुसरून झालीं पाहिजेत, असेंहि बंधन या राजर्षींवर घातलें आहे.

धर्मरक्षण आणि धर्मनिर्मिति

गीतेंत शास्त्रप्रामाण्याचें तत्त्व कार्याकार्य-निर्णयाच्या वेळीं अवलंबिण्यास सांगितलेलें आहे. हें शास्त्र म्हणजे समाजांतील परंपरागत रूढ सामाजिक नीति, अथवा धर्मशास्त्र होय. या धर्मशास्त्रानुसार समाजांतील सर्व व्यक्तींनीं व राजानेंहि वागलें पाहिजे. धर्मशास्त्रानें घालून दिलेले विधिनिषेध सर्वांकडून पाळिले जातात किंवा नाहीं हें पाहावयाचें आणि हे विधिनिषेध झुगारून देणाऱ्यांना शास्त्रीय आज्ञेस अनुसरून यथोचित दंड करावयाचा, हें राजर्षीचें कार्य. मात्र या धार्मिक विधिनिषेधांत बदल करणें किंवा त्यांत सुधारणा करणें हें राजर्षींचें कार्य नव्हे. जुने विधिनिषेध बदलून नवे विधिनिषेध घालून देण्याचें कार्य म्हणजे समाजांत नव्या धर्माची निर्मिति करणेंच होय. हें धर्मनिर्मितीचें कार्य राजानें आपल्या दंडसामर्थ्यानें करावयाचें नाहीं. तें कार्य ब्रह्मर्षीनें आपल्या आत्मबलानें समाजाचें हृदयपरिवर्तन करून केलें पाहिजे. आपण ज्याला आज समाजाची सर्वांगीण क्रांति असें म्हणतों, ती सर्वांगीण क्रांति म्हणजे प्राचीन भाषेंत नव्या धर्मसंस्थापनेचें कार्यच होय. अशा सर्वांगीण क्रांतींत समाजांत रूढ असलेल्या कर्तव्याकर्तव्यासंबंधींचे परंपरागत विधिनिषेध बदलून नवे विधिनिषेध समाजाकडून मान्य करून घ्यावयाचे असतात. अशा प्रकारची सर्वांगीण क्रांति समाजाच्या अंतःकरणांत खोल रुजलेल्या भावनांचीं पाळेंमुळें उखडून काढीत असते. हें कार्य राजाच्या दंडसामर्थ्यानें न होतां तें

ब्रह्मर्षींच्या आत्मसामर्थ्यानें अथवा तपोबलानें घडून यावें, म्हणजेच तें समाजाला उद्धारक बनूं शकतें. राजदंडानें समाजाचें असें हृदयपरिवर्तन घडत नाहीं, अथवा घडवून आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यांत विकृति निर्माण होते. म्हणून हें कार्य सत्याग्रहानें करावें. अशा सर्वांगीण क्रांतिकारकांनीं सत्यनिष्ठा आणि अहिंसावृत्ति यांचा केव्हांहि त्याग न करतां त्याच वृत्ती समाजांत जागृत कराव्या आणि जुने विधिनिषेध मोडून नवे विधिनिषेध निर्माण करण्याचा, अशी क्रांति करण्याचा मार्ग समाजाला दाखवून द्यावा. हें कार्य करण्यासाठीं सत्याग्रही नेत्यांना जुन्या शास्त्रांचे विधिनिषेध उल्लंघावे लागतात आणि या क्रांतीसाठीं त्यांचें उल्लंघन करून सत्याग्रह करण्याचें शिक्षण समाजालाहि द्यावें लागतें. ज्यांना जुन्या विधिनिषेधांचें उल्लंघन करण्याचें हें स्वातंत्र्य हवें असेल, त्यांनीं सत्य व अहिंसा यांचें बंधन स्वीकारलें पाहिजे, असा सत्याग्रही क्रांतिशास्त्राचा दंडक आहे. अर्थात् जुन्या विधिनिषेधांचें उल्लंघन व नव्या विधिनिषेधांचे संस्थापन हें कार्य ब्रह्मर्षींनीं समाजांतील आत्मबल जागृत करून करावयाचें असल्यानें, हें स्वातंत्र्य राजर्षींच्या धर्मांत अंतर्भूत होत नाहीं. त्याला शास्त्रप्रामाण्याचें बंधन नेहमींच पाळलें पाहिजे. तात्पर्य, जे अहिंसा व सत्य यांचें बंधन पाळतील, त्यांना क्रांतिकालांत जुने विधिनिषेध उल्लंघून नवे विधिनिषेध समाजांत रूढ करण्याचें स्वातंत्र्य उपभोगतां यावें आणि जे कोणत्याहि कारणानें समाजहितासाठीं किंवा स्वतःच्या देहरक्षणासाठीं अहिंसेचें उल्लंघन करीत असतील, त्यांनीं शास्त्रीय विधिनिषेधांना अनुसरूनच नेहमीं वागावें, हें इष्ट आहे.

राजर्षींच्या कर्मयोगाचाच प्रामुख्यानें विचार गीतेंत असल्यानें (" तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ । ") यापलीकडे गीता गेलेली नाहीं. तिच्यांत निस्त्रैगुण्यत्व संपादन करण्याचा उपदेश आहे. परंतु निस्त्रैगुण्य मार्गानें जाणारास कोणताहि विधि अगर निषेध नसतो, अशा प्रकारचा युक्तिवाद गीतेंत कोठेंच नाहीं. तसेंच परंपरागत शास्त्रांत बदल कोण व कसा घडविणार, याचेंहि विवेचन त्यांत नाहीं. नवी धर्मसंस्थापना, नवे विधिनिषेध अथवा सर्वांगीण समाजक्रांति अशा प्रकारचे कोणतेहि विचार त्या धर्मग्रंथांत नाहींत. केवळ राजर्षींच्या कर्मयोगाचेंच त्यांत प्रसंगोचित वर्णन असल्यानें या विषयांची तेथें गरजहि नाहीं. मनुष्यानें स्थितप्रज्ञ बनावें, द्वंद्वातीत वृत्ति धारण करावी, निस्त्रैगुण्यत्व संपादन करावें इत्यादि उपदेश आहे आणि त्याचबरोबर शास्त्राला प्रमाण मानून स्वधर्माचरण करावें, असाहि आग्रह आहे. विधिनिषेधांच्या अतीत होऊन कर्में करण्याचा उपदेश तेथें नाहीं. अर्थात् शास्त्राचें बंधन पाळावें यांत लोकसंग्रहासाठीं सुद्धा जरी हिंसा करावी लागली तरी, त्याबद्दलहि प्रायश्चित्त घ्यावें, हें शास्त्रानुसारच प्राप्त होतें. शास्त्रप्रामाण्य मानण्याच्या उपदेशांत त्याचा अंतर्भाव आपोआपच होतो.

क्रांतिकल्पना अर्वाचीन आहे

प्राचीनकाळीं समाजावर धर्माची व धर्मशास्त्राची सर्वंकष सत्ता चालत असे. हा धर्म सुधारण्याचें कार्य करावें लागल्यास तें राजाच्या दंडसामर्थ्यानें करून न घेतां तें ब्रह्मर्षींच्या आत्मबलानें समाजाचें हृदय–परिवर्तन घडवून करून घ्यावें, अशी पद्धति कधींकाळीं पूर्ण व शुद्ध स्वरूपांत रूढ होती किंवा नाहीं, हें सांगणें कठीण आहे. तथापि, राजाला धर्माचें बंधन असावें आणि धर्माचें राज्य सर्व समाजावर चालूं असावें, हीं ध्येयें प्राचीन काळीं मान्यता पावलीं होतीं, यांत शंका नाहीं. समाजावर सर्वंकष सत्ता गाजविणाऱ्या धर्मांत आमूलाग्र क्रांति करण्याचे प्रसंग येतात. धर्मबंधनांत वारंवार सुधारणा करावी लागते आणि ती सुधारणा करण्याचा अधिकार समाजांतील प्रत्येक पिढीस आहे, इत्यादि कल्पना आधुनिक आहेत. त्या तशा स्वरूपांत प्राचीन काळांत रूढ असल्याचें आढळणार नाहीं. तथापि, प्राचीन कल्पनांपासून आधुनिकांना पुष्कळ बोध घेतां येण्यासारखा असतो. तसा बोध घेतांना पूर्वींच्या कल्पनांचा विकास व विस्तार करावा लागतो. याच दृष्टीनें म. गांधींनीं, आधुनिकांना अवश्य वाटणाऱ्या सर्वांगीण सामाजिक क्रांतीकरितां सत्याग्रहाच्याच साधनाचा उपयोग करावा, या कामीं शस्त्रबलाचा उपयोग करूं नये, असें सांगितलें. सर्व धर्मांचें रहस्य सत्य व अहिंसा म्हणजे न्याय व प्रेम यांत आहे व त्यांना मूर्त स्वरूप देण्यासाठीं जी सर्वांगीण क्रांति करावयाची, ती सत्य व अहिंसा या वृत्तींशीं विसंगत अथवा त्यांना

विघातक अशा साधनांनीं करूं नये; तसें केल्यास सामाजिक नीतींत विकृति उत्पन्न होण्याचा धोका आहे, हें मत आधुनिकांनाहि पटण्यासारखेंच आहे. यामुळें सामाजिक क्रांति सत्याग्रहानें करावी, सत्याग्रहाचा मार्ग या कामीं अधिक श्रेयस्कर आहे, हें कोणीहि मान्य करील. पण समाजांत सर्वांगीण क्रांति होऊन नवी समाजरचना अस्तित्वांत आली, तरीहि तिच्या रक्षणासाठीं पुनः राज्यसंस्थेची आवश्यकता आहे आणि त्या राज्यसंस्थेला दंडनीतीचा आश्रय करणें आज तरी अपरिहार्य आहे. यासाठींच क्षत्रिय धर्म समाजधारणेला अवश्य आहे; व तो तसा अवश्य आहे तोंपर्यंत राजर्षींचा आदर्श पुढें ठेवून दंडनीतीचा धर्म आचरण करणाऱ्याचीहि आवश्यकता आहे. गीतेपासून आधुनिक समाजशास्त्रज्ञांना एवढाच बोध घेतां येईल. सर्वांगीण क्रांति, नवी धर्मसंस्थापना, जुने विधिनिषेध बदलून नवीन निर्माण करणें, या कल्पनांचें विवेचन त्या ग्रंथांत नाहीं. पण आज मानवाला या गोष्टींची आवश्यकता निकडीनें भासत आहे व त्या घडवून आणण्याचा सर्वश्रेष्ठ मार्ग म. गांधींनीं दाखवून दिला आहे. त्याचा उगम राजर्षींच्या आदर्शांत आढळणार नसून तो ब्रह्मर्षींच्या आदर्शांत आढळूं शकेल. निदान सत्याग्रही क्रांतिकारकांना गीतेंत जे ब्राह्मणप्रकृतीचे गुण म्हणून वर्णिले आहेत, त्यांचाच आश्रय करावा लागणार आहे. श्रीकृष्ण किंवा अर्जुन यांची प्रकृति ती नव्हे, हें लक्षांत घेऊन गीतेचें रहस्य उलगडण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

' ईश्वरभाव ' आणि ' आस्तिक्य '

गीतेंत ब्राह्मण व क्षत्रिय या दोघांचे गुण वर्णन करतांना ' ईश्वरभाव ' व ' आस्तिक्य ' असे दोन निरनिराळे शब्द योजण्यांत आलेले आहेत. 'आस्तिक्य' हा गुण ब्राह्मणांचा आणि ' ईश्वरभाव ' हा क्षत्रियांचा गुण आहे. ' ईश्वरभाव ' यांत प्रभुत्वाचा आणि दंडनीतीनें इतरांना शासन करण्याचा अधिकार अंतर्भूत होतो. ' मी प्रभु आहें, मी पालक आहें, आणि ज्यांचें पालन करण्याची जबाबदारी माझ्यावर आहे, त्यांचें पालन करण्यासाठीं मीं दंडनीतीचा आश्रय करीत आहें, मी दुर्जनांना शासन करीत आहे ' इत्यादि भावना ' ईश्वरभाव ' या शब्दांत अंतर्भूत होतात. 'आस्तिक्य' ही वृत्ति जगांत नैतिक शक्तीचा विजय होईल अशी निष्ठा प्रदर्शित करते. यांत अनैतिक शक्तींचा पराभव होईल अशी निष्ठा असली, तरी त्यासाठीं अनीतिमान् व्यक्तींना आपण शासन करावें, अशी वृत्ति नाहीं. या आस्तिक्यवृत्तीमुळें अनीतिमानांना आपोआप शासन होईल, अथवा त्यांना ईश्वर शासन करील, अथवा राज्यसंस्था शासन करील, अशीहि वृत्ति असू शकते. पण दुर्जनांना आपल्याऐवजीं इतर कोणी तरी अथवा ईश्वरानें शासन करावें, ही वृत्तीसुद्धां पूर्ण अहिंसेची द्योतक नाहीं. दुर्जनांना शासन व्हावें अथवा त्यांना परमेश्वरानें शासन करावें अशी इच्छा ही खरी अहिंसा नसून ती एक हिंसाच आहे. दुर्जनांना सद्बुद्धि व्हावी, त्यांचा उद्धार व्हावा, ते सज्जन बनावेत, अशी इच्छा करणें अथवा तशी प्रार्थना करणें, ही खरी अहिंसावृत्ति आहे. या अहिंसावृत्तीनें दुर्जनांच्या दुष्टकृत्यांशीं सतत लढत राहाणें, ही क्रांतिकारक अहिंसा असून या क्रांतिकारक अहिंसेंतूनच सत्याग्रहाचा मार्ग निर्माण झालेला आहे. सत्याग्रहांत जी आस्तिक्यबुद्धि गृहीत आहे, ती अशा प्रकारची अहिंसक, पण प्रभावी अशी वृत्ति आहे. ' सर्वोदय ' या शब्दांत दुष्टांचें निर्दालन असा अर्थ सूचित नाहीं. अर्थात् ' दुष्टांचें निर्दालन करण्यासाठीं मीं अवतार घेतलेला आहे ', हा ' ईश्वरभाव 'हि सत्याग्रही निष्ठेशीं सुसंगत नाहीं. पण गीतेंत अशा प्रकारचा ईश्वरभाव सर्वत्र प्रकट झालेला असून त्याची गणना राजर्षींच्या स्वाभाविक गुणांत करण्यांत आलेली आहे. राज्यशासन करणाऱ्या दंडधारी व्यक्तीच्या अंगीं हा गुण असावा लागतो, मात्र त्यानें अहंकारानें व ममत्वानें हें प्रभुत्व उपभोगूं नये अशी अपेक्षा आहे.

येथें अशी एक शंका येऊं शकते कीं, ईश्वरभाव किंवा प्रभुत्व यांत एका प्रकारचा अहंकार अंतर्भूतच झालेला आहे. पण गीतेंत अर्जुनास जो अहंकार झाल्याचें वर्णन केलें आहे, तो हा अहंकार नव्हे. 'दुष्टांशींहि मी लढणार नाहीं आणि संन्यास घेऊन मी रानावनांत भटकेन ' अशा आशयाचे जे शब्द अर्जुनानें योजिले, त्यांना उद्देशून अथवा त्या शब्दांनी

व्यक्त होणाऱ्या वृत्तीस उद्देशून 'अहंकार' हा शब्द श्रीकृष्णांनीं योजिलेला आहे. कारण ' आपल्या हक्काचें राज्य ज्यांनीं घेतलें त्यांच्याशींसुद्धां मी युद्ध करणार नाहीं' ही वृत्ति श्रेष्ठ असेल, पण ती वृत्ति अर्जुनाच्या प्रकृतिगुणांशीं किंवा त्याच्या स्वभावाशीं सुसंगत नव्हती; ती त्याला झेपण्यासारखी नव्हती. जी वृत्ति आपणांस झेपत नाहीं अथवा झेपणें शक्य नाहीं, ती चांगली असली अथवा श्रेष्ठहि असली तरीहि त्या वृत्तीचा मी अंगीकार करतों, असें म्हणणें हें अहंकाराचें द्योतक असतें. अर्जुनाला झालेला अहंकार अशा प्रकारचाच होता. त्याचा प्रकृतिसिद्ध ईश्वरभाव जागृत झाल्याबरोबर त्याचा तो अहंकार नष्ट झाला. हा 'ईश्वरभाव', ज्यांचा प्रकृतिधर्म ब्राह्मणत्व आहे त्यांच्या ठिकाणीं नसतो. अशा ब्राह्मणत्वविशिष्ट प्रकृतिधर्मांच्या व्यक्तीला उपदेश करण्याचा प्रसंग असता, तर श्रीकृष्णाचे युक्तिवाद कितपत लागू पडले असते, हा प्रश्नच आहे. अशा लोकांना अथवा व्यक्तींना म. गांधींच्या सारखा गुरु भेटला, तर तो " सत्याग्रहानें आपले हक्क प्राप्त करून घेण्यासाठीं अथवा अन्यायाविरुद्ध झगडण्यासाठीं सज्ज व्हा " असा उपदेश करील. अशा प्रकारची क्रांतिकारक अहिंसा गीतेंत नाहीं. साधूंच्या रक्षणासाठीं शस्त्रधारण करणाऱ्या अवतारी राजर्षींचा धर्म तींत प्रामुख्यानें सांगितलेला आहे. त्याची आजहि समाजाला आवश्यकता असली, तरी त्याहून अधिक निकडीची अशी जी सर्वांगीण क्रांतीची आवश्यकता आज मानवसमाजाला भासत आहे, ती क्रांति राजर्षींच्या शस्त्रबलानें घडवून आणण्याचा प्रयत्न धोक्याचा आहे. हें जाणून समाजांतील आत्मबलाची जागृति व संघटना करून अशी क्रांति घडवून आणतां येईल, या निष्ठेची आज मानवसमाजाला अधिक आवश्यकता आहे. आज संन्यास घेऊं इच्छिणाऱ्या क्षत्रियांना युद्धाला प्रवृत्त करण्याचा संदेश देण्याची आवश्यकता नाहीं. तर, ज्या आर्थिक विषमतेमुळें आणि अर्थशोषणाच्या महत्त्वाकांक्षेमुळें जागतिक महायुद्धें निर्माण होत आहेत, ती आर्थिक विषमता नष्ट करून अर्थशोषणाची आकांक्षा जेथें मूळ धरूं शकणार नाहीं, अशा प्रकारची नवी समाजरचना करण्याची आवश्यकता आहे. ही समाजरचना करण्यासाठीं समाजांत सर्वांगीण क्रांति घडवून आणून वर्गभेद नष्ट केले पाहिजेत. म्हणून ही सामाजिक क्रांति आत्मबलानें घडवून आणणें कसें शक्य व अवश्य आहे, तेंच मानवाला दाखवून दिलें पाहिजे. या कामीं गीतेचा फारसा आधार उपयोगी पडणार नाहीं.

आत्मबल आणि मानवधर्म

शंकराचार्यांनीं गीताभाष्याच्या प्रस्तावनेंत " ब्राह्मणत्वस्य हि रक्षणेन रक्षितः स्यात् वैदिको धर्मः। " असें म्हटलें आहे आणि या ब्राह्मणत्वाच्या रक्षणासाठींच श्रीकृष्णाचा अवतार होता असें विधान केलें आहे. यावरून वैदिक धर्माचें रक्षण होणें अगर न होणें हें क्षत्रियत्वापेक्षां ब्राह्मणत्वाच्या रक्षणावर अधिक अवलंबून आहे, असा निष्कर्ष निघतो. तथापि, या ब्राह्मणत्वाचें रक्षण करण्यासाठीं अखेरीस क्षत्रियधर्माच्या अवताराची आवश्यकता गृहीत धरलेली आहे. यासंबंधीं विशेष ऊहापोह करण्याचें येथें कारण नाहीं. म. गांधींनीं जी क्रांतिकारक अहिंसा प्रतिपादन केली आहे, तिचें ध्येय समाजांतील आत्मबल जागृत व प्रभावी करून त्याला शस्त्रबलाच्या संरक्षणाची आवश्यकताहि भासूं नये, हें आहे. पण हें अंतिम ध्येय सामाजिक दृष्टीनें आज वास्तववादी नाहीं. तथापि, ब्राह्मणत्व या शब्दानें व्यक्त होणारे आध्यात्मिक गुण वाढविण्यावर मानवधर्माची सर्व भिस्त अवलंबून आहे, हें कोणासहि मान्य होण्यासारखें आहे. म० गांधींच्या जीवनसंदेशाचें सूत्र " आत्मबलस्य हि रक्षणेन रक्षितः स्यात् मानवो धर्मः " असें सांगतां येईल. हें आत्मबल समाजांतील केवळ एका विशिष्ट वर्गांत जागृत व संरक्षित करणें हा आजचा प्रश्न नसून, सर्व समाजांत व्यापकत्वानें पसरलेलें पण सुप्तावस्थेंत असलेलें आत्मबल जागृत करून त्याच्या प्रभावानें एकवर्ग समाज निर्माण करणें, ही आजची समस्या आहे. या काळांत चातुर्वर्ण्यसंस्था आणि युद्ध या गोष्टी गृहीत धरून केलेल्या क्षात्रधर्माच्या उपदेशांतील रहस्य फारसें पुरें पडणार नाहीं. तथापि, त्यांतील कांहीं महत्त्वाचे सिद्धान्त आजहि मान्य करावे लागतील. इतकेंच नाहीं, तर त्या सिद्धान्तांवर भर देऊन नव्या मानवसंस्कृतीची उभारणी करावी लागेल.

गीताधर्म आणि आधुनिक मानव

अखेरीस आजच्या मानवालाहि गीतेच्या उपदेशापासून शिकण्याजोग्या ज्या गोष्टी आहेत, त्यांचा थोडक्यांत निर्देश करून हा लेख संपवावयाचा आहे. मानवसमाजाच्या रचनेला धर्माचा आधार असला पाहिजे, हा गीतेंतील अत्यंत महत्त्वाचा सिद्धान्त आहे. मात्र समाजरचनेला व समाजाच्या सर्व व्यवहारांना आधारभूत असा जो धर्म असला पाहिजे, तो धर्म म्हणजे कोणताहि विशिष्ट धर्म नसून मानवाच्या अंतःकरणांतील जी कर्तव्यनिष्ठा तोच धर्म होय. समाजांतील सर्व व्यवहार करीत असतां त्यांतील घटकांनीं स्वार्थसाधनाच्या हेतूनें प्रेरित होऊन व्यवहार न करतां ते कर्तव्यबुद्धीनें प्रेरित होऊन करावेत, हा गीतेच्या सामाजिक उपदेशाचा मथितार्थ आहे. समाजांतील आपापलीं कामें करीत असतां, व्यक्ति स्वार्थबुद्धीनें वागली, तरी समाजहित आपोआप होईल. मात्र अशा समाजांत प्रत्येक व्यक्तीला स्वार्थसाधनाची समान संधि असावी आणि प्रत्येकास इतरांबरोबर स्पर्धा करण्याची पूर्ण मुभा असावी, या विपर्यस्त व भ्रामक सिद्धान्तावर आधुनिक युरोपांतील वैश्यसंस्कृतीची उभारणी करण्याचा प्रयत्न व प्रयोग गेलीं दोन शतकें करण्यांत आला. हा प्रयत्न व प्रयोग आतां भ्रामक व विघातक ठरला असल्याचें बहुतेक समाजशास्त्रज्ञांनीं मान्य केलें आहे. सामाजिक व्यवहारांची उभारणी व्यक्तिस्वार्थाच्या व स्पर्धेच्या तत्त्वावर करण्यानें समाजांत अनर्थ माजतो, हें आतां मान्य होऊन सामाजिक व्यवहार कर्तव्यबुद्धीच्या, सेवाभावनेच्या व सहकारितेच्या पायावर उभारले पाहिजेत, हें तत्त्व समाजवादी विचारसरणीचें एक आधारभूत तत्त्व गणिलें जातें. या दृष्टीनें विचार केल्यास, गीतेची सामाजिक विचारसरणी व्यक्तिवादापेक्षां समाजवादाला अधिक निकट आहे, असें दिसून येईल. समाजधारणेला आवश्यक असणारीं कोणतींहि कामें कर्तव्यबुद्धीनें करीत राहिलें, तरी मनुष्याला आत्मिक शांतीचा मोक्ष प्राप्त करून घेतां येईलः मात्र हीं कर्तव्यें त्यानें, सकाम बुद्धीनें, फलासक्तीनें, अहंकारानें अथवा ममत्वानें करतां कामा नयेत. अशा निष्काम, निरहंकार, निर्मम व अनासक्त वृत्तीनें जीं सामाजिक कर्तव्यें आपण स्वीकारलीं असतील अथवा कर्तव्यें आपणांस प्राप्त झालीं असतील, तीं केव्हांहि सोडून देऊं नयेत; मनुष्याला आत्मिक मोक्ष प्राप्त करून घेण्यासाठीं सामाजिक कर्तव्यांचा त्याग करण्याची मुळींच आवश्यकता नाहीं, अशी भूमिका स्वीकारून गीतेनें वैयक्तिक मोक्ष आणि समाजधारणेचा लोकसंग्रह या दोहोंचा फार सुंदर समन्वय साधला आहे. मात्र हीं सामाजिक कर्तव्यें आत्मोन्नतीला उपकारक ठरावयाचीं तर तीं करणारांनीं केवळ आपल्या विशिष्ट समाजाच्या हिताचाच तेवढा विचार करून चालणार नाहीं, तर सर्व मानवसमाजाचें किंबहुना सर्व भूतमात्रांचें हित ज्यानें होईल अशींच कर्में कर्तव्यबुद्धीनें करीत राहिलें पाहिजे. मानवसमाज निरनिराळ्या राष्ट्रांमध्यें अथवा वर्गांमध्यें विभागला गेला असतां, त्यांपैकीं एकाद्या विशिष्ट राष्ट्राचें अगर वर्गाचें हित पाहून आपलीं कर्तव्यें करणें आणि इतर राष्ट्रांच्या अथवा वर्गांच्या हितांकडे दुर्लक्ष करणें हें गीतेच्या आध्यात्मिक व धार्मिक उपदेशास धरून होणार नाहीं. तींत जो अहंकार व जें ममत्व सोडून कर्तव्याचरण करण्याचा उपदेश केलेला आहे, तो अहंकार अथवा तें ममत्व एकाद्या राष्ट्रीय भावनेमुळें किंवा वर्गीय भावनेमुळेंहि निर्माण झालेलें असतां कामा नये.

राष्ट्रीय अथवा वर्गीय अहंकार आणि ममत्व यांना वश होऊन केलेलीं कर्तव्यें हीं तीं करणारांच्या अथवा मानवसमाजाच्या आत्मिक उद्धारास अथवा भौतिक हितास विघातक झाल्यावांचून रहाणार नाहींत. गीतेची दृष्टि विशिष्ट राष्ट्रहित अथवा वर्गहित साधण्याची नसून ती सर्व मानवांचें आध्यात्मिक व आधिभौतिक हित साधण्याची आहे. या मानवहिताच्या दृष्टीनें आज युद्धसंस्था नष्ट करून सर्व मानवांना एका राज्याखालीं आणणें आणि वर्गसंस्था नष्ट करून एकवर्ग समाज स्थापन करणें—या गोष्टी आवश्यक झालेल्या आहेत. गीतेंत ही विशिष्ट पार्श्वभूमि स्वीकारून कर्तव्याकर्तव्याची चर्चा झालेली नसल्यामुळें त्याबाबत स्पष्ट असा आदेश तिच्यांतून मिळणार नाहीं. तथापि, तिची एकंदर शिकवण इतकी व्यापक आणि मानवी अंतःकरणांतील चिरंतन अशा श्रेष्ठ वृत्तीवर आधारलेली आहे कीं, ती

शिकवण युद्धसंस्था व वर्गसंस्था या नष्ट झाल्या तरीहि मानवाला नेहमींच मार्गदर्शक व उन्नतिकारक अशी भासेल. समाजांतील आपापलीं कर्तव्यें स्वहितबुद्धीनें न करतां तीं सर्वहितबुद्धीनें करावींत आणि तीं निर्मम, निरहंकार व अनासक्त भावनेनें करावींत, हा उपदेश केव्हांहि गतार्थ होणार नाहीं.

जीवनाची सर्वांगीण निष्ठा

गीतेच्या उपदेशाचा सर्वांत श्रेष्ठ असा आणखी एक विशेष म्हणजे मानवी जीवनाला जितकीं अंगें आहेत, त्या सर्वांचा विचार करून जीवननिष्ठा प्रतिपादिलेली आहे, मानवी जीवनाला जसें आध्यात्मिक अंग आहे. तसेंच त्या जीवनाला आधारभूत असें आधिभौतिक अंग आहे. मानवाच्या जीवनाला जसें एक वैयक्तिक अंग आहे, तसेंच सामाजिकहि अंग आहे. आध्यात्मिक व आधिभौतिक त्याच प्रमाणें वैयक्तिक व सामाजिक या मानवी जीवनाच्या सर्व अंगांचा विचार करून गीतेचा उपदेश करण्यांत आला आहे. मनुष्य व्यक्तिशः मुक्त झाला, त्याला आत्मप्राप्ति झाली अथवा आत्मशांति सर्व परिस्थितींत उपभोगितां आली, तरीहि इतरांच्या उद्धाराचें कर्तव्य त्यानें करीत राहिलें पाहिजे. तसेंच मानवी समाजाच्या धारणपोषणाला भौतिक भोगांची आवश्यकता आहे. हे भौतिक भोग सर्वांना मिळत राहाण्यासाठीं आवश्यक तीं कामें सर्वांनीं केलींच पाहिजेत. गीतेंत या भौतिक भोगांच्या प्राप्तीच्या दृष्टीनेंच यज्ञाचें महत्त्व वर्णिलें आहे. अर्थात् यज्ञामुळें देवता संतुष्ट होतात व त्या आपणांस भौतिक भोग देतात, हे विचार आज कोणास पटणार नाहींत. तथापि, भौतिक शक्ति आणि सामाजिक शक्ति यांच्या सहकार्यानें व साहाय्यानें आपणांस इष्ट असणारे भोग लाभतात हें लक्षांत घेऊन त्यासाठीं झालेली सामाजिक शक्तींची व भौतिक शक्तींची झीज भरून काढणें आणि भौतिक भोगांच्या उत्पादनांत आपल्या श्रमशक्तीचा विनियोग करून त्या कार्यांत सहभागी होणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. समाजाच्या धारणपोषणार्थ आवश्यक ते श्रम करणें आणि ते श्रम करणाऱ्यांच्या शक्तींचा योग्य विकास होईल अशा रीतीनें सामाजिक धनाची विभागणी करणें, ह्याला आधुनिक भाषेंत यज्ञ असें म्हणतां येईल. हा यज्ञ समाजांतील अर्थोत्पादनाच्या कामीं होणारें सहकार्य न्यायनीतीला धरून घडत राहण्यावर अवलंबून असतो. सामाजिक जीवनासाठीं चाललेला हा यज्ञ योग्य प्रकारें चालू राहील तरच समाजाचें धारणपोषण होईल. हाच बोध गीतेंतील यज्ञासंबंधींच्या आग्रहापासून आपणांस घेतां येईल. हा सामाजिक यज्ञ आजच्या समाजांत योग्य प्रकारें चाललेला नाहीं. या यज्ञासाठीं कराव्या लागणाऱ्या श्रमांत भाग न घेतां त्याच्यांतून निर्माण होणारे भोग केवळ मालकी हक्कानें जे आज उपभोगीत आहेत, ते गीतेच्या उपदेशानुसार सामाजिक धनाची चोरीच करीत आहेत. हें स्तेय बंद झाल्यावांचून समाजाच्या धारणेस आवश्यक असणारे उपभोग योग्य प्रकारें निर्माण होणार नाहींत व ते योग्य प्रकारें विभागलेहि जाणार नाहींत. सामाजिक उत्पादनकार्यांतील ही चोरी आजच्या मालमत्तेच्या कायद्यांनीं कायदेशीर ठरविलेली आहे. पण ती चोरी कायद्यानें बंद केल्यावांचून समाजधारणेला अवश्य असणारा हा यज्ञ योग्य प्रकारें चालणार नाहीं व अर्थात् लोकसंग्रहहि होणार नाहीं. हा मूलभूत अन्याय समाजांत विग्रह निर्माण करीत असून या विग्रहाचा अंत उत्पादनकार्यांतील व विभजनकार्यांतील अन्याय दूर केल्यावांचून थांबणें शक्य नाहीं. समाजांतील सर्व व्यवहारांना धर्माचें अधिष्ठान असलें पाहिजे, हा गीतेचा सिद्धान्त जर आपणांस आज कांहीं बोध करीत असेल, तर तो बोध हाच कीं, सामाजिक धनोत्पादनाच्या कार्यांतील व विभजनांतील मूलभूत अन्याय दूर केल्यावांचून समाजधारणेचें अथवा लोकसंग्रहाचें कार्य होणार नाहीं.

समाजाच्या भौतिक अंगाचें विवेचन करतांना त्याच्या धारणपोषणास अवश्य असणाऱ्या धनोत्पादनाच्या प्रश्नांप्रमाणेंच त्याच्या संरक्षणाचा व अन्यायनिवारणाचा प्रश्न गीतेनें प्राधान्यानें विचारांत घेतलेला आहे. संरक्षण आणि अन्यायनिवारण यांची व्यवस्था झाल्यावांचून समाजाचें नैतिक किंवा आत्मिक बल वाढूं शकत नाहीं. याचसाठीं संरक्षण आणि अन्यायनिवारण हीं कामें सतत चालू राहिलीं

पाहिजेत, इकडे गीतेनें विशेष लक्ष दिलेलें आहे. याच दृष्टीनें धर्मयुद्धाचें आणि क्षात्रधर्माचें समर्थन तींत केलेलें आहे. हे प्रश्न सोडविण्यासाठीं शस्त्रबलाचा व दंडनीतीचा उपयोग करावा लागूं नये, अशी व्यवस्था केल्यावांचून समाजांत धर्माचें व नीतीचें संवर्धन किंवा संरक्षणहि होणार नाहीं. म्हणून यासाठीं आज मनुष्यांना अवश्य वाटणारी हिंसा टाळून ते प्रश्न अहिंसेनें व शांततेनें सोडविण्याचा प्रयत्न करणें, हाच खऱ्या धर्मसंस्थापनेचा मार्ग होय. यांत जितकें यश येईल, तितक्याच प्रमाणांत सामाजिक नीति स्थिर होत जाईल. केवळ आत्मबलाचें संघटन करून त्याच्या प्रभावानें हे प्रश्न अद्यापि सुटत नाहींत. म्हणूनच शस्त्रबलानें न्यायसंस्थापना करण्याचे प्रयत्न समाज करीत असतो. या वास्तववादी भौतिक दृष्टीनें गीतेची मांडणी झालेली आहे.

दैवी व आसुरी वृत्तींचा लढा

समाजांतील न्यायसंस्थापनेच्या व अन्यायनिवारणाच्या कार्यातूनच दैवी व आसुरी वृत्तींच्या लढ्याचा प्रश्न निर्माण होत असतो. हा प्रश्न पुढें ठेवून हा लढा चालविण्याचा एक मार्ग प्रसंगानुसार गीतेंत प्रामुख्यानें वर्णिला आहे. पण हा लढा चालविण्याचा तेवढाच एक मार्ग आहे किंवा त्याहुन अधिक श्रेष्ठ मार्ग अवलबूं नये असा गीतेचा अर्थ नाहीं. म. गांधींनीं जो सत्याग्रही क्रांतीचा मार्ग आधुनिक मानवापुढें ठेविला आहे, तो एक अधिक श्रेष्ठ मार्ग असून त्याचा अवलंब करणें हें गीतेंतील आध्यात्मिक आदर्शास अनुरूप असेंच आहे. याच दृष्टीनें आपण गीतेच्या उपदेशास अनुसरून सत्याग्रहानें अन्यायनिवारणाचें कार्य करीत राहाण्याचा मार्ग लोकांपुढें ठेवीत आहों असें म. गांधी म्हणत असत. पण या अधिक श्रेष्ठ मार्गानें जाण्याइतकें आत्मबल ज्याच्यापाशीं नसेल, त्यानें गीतेंत उपदेशिलेल्या मार्गांनीं अन्यायाविरुद्ध झगडलें पाहिजे, कर्तव्यपराङ्मुख होतां कामा नये किंवा समाजांतील न्याय-अन्यायासंबंधीं उदासीनहि राहातां कामा नये. हें खरें असलें तरी अन्यायाविरुद्ध शस्त्रबलानें लढल्याचीं फळें आणि आत्मबलानें लढून न्यायसंस्थापना केल्याचीं फळें भौतिक किंवा नैतिक दृष्टीनें एकाच प्रकारचीं होऊं शकतात, असें मात्र कोणासहि म्हणतां येणार नाहीं. आत्मबलानें लढा करून जें फल मिळूं शकतें, तें शस्त्रबलाच्या साहाय्यानें केलेल्या लढ्यानें मिळूं शकणार नाहीं, हा सिद्धान्तच म० गांधींनीं 'साधनांची शुद्धता' या नांवानें क्रांतिकारकांपुढें मांडलेला आहे. समाजाच्या भौतिक अंगांचा आणि आर्थिक व राजकीय व्यवहारांचा विचार केला पाहिजे, त्या सर्वांना नैतिक अधिष्ठान दिलें पाहिजे आणि तें नैतिक अधिष्ठान जेव्हां नष्ट होतें तेव्हां तें निर्माण करण्यासाठीं सामाजिक क्रांति केली पाहिजे, हे आधुनिक क्रांतिकारकांचे विचार म. गांधींनीं आत्मसात् केलेले आहेत. पण त्याचबरोबर त्यांनीं हें दाखवून दिलें कीं, ही सर्वांगीण क्रांति आत्मबलानें घडवून आणली पाहिजे. तरच सर्व सामाजिक व्यवहारांना हवें असणारें नैतिक अधिष्ठान प्राप्त करून देतां येईल. यांपैकीं सर्व सामाजिक व्यवहारांना नैतिक अधिष्ठान असलें पाहिजे, हा विचार गीतेंत गृहीत धरलेला आहे. पण तें नैतिक अधिष्ठान नष्ट झालें असतां तें नव्यानें निर्माण करण्यासाठीं एक सर्वांगीण क्रांति करावी लागेल व ती आत्मबलानें करणें हा सर्वश्रेष्ठ मार्ग आहे, हे विचार गीतेंत आढळणार नाहींत. पण तींत मानवी जीवननिष्ठा बनवितांना भौतिक वास्तववाद आणि आध्यात्मिक आदर्शवाद या दोहोंचा समन्वय साधण्याचा जो व्यापक दृष्टिकोन आढळून येतो, त्या व्यापक दृष्टिकोनाचा आश्रय केल्यास आजच्या मानवाला हीच विचारसरणी खऱ्या अर्थानें उद्धारक होऊं शकेल, हें पटल्यावांचून राहाणार नाहीं.

'व्यवहाराची कला म्हणजे राजकारण. उपयुक्ततेचें शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र. मूल्यांचें सार म्हणजे संस्कृति.'

—सिनॉर मदारिआगा (स्पॅनिश साहित्यिक), मुंबई. (२८-२-५१)

अनुक्रमणिका

प्रा. अ. का. प्रियोळकर

पोर्तुगीज पुराणकाराचा मराठी काव्यग्रंथ

मराठीचें प्राचीन वाङ्मय म्हणजे ज्ञानेश्वरांपासून मोरोपंतांपर्यंत होऊन गेलेल्या महाराष्ट्रकवींचे ग्रंथ, अशी आपली कालपरवांपर्यंत समजूत होती; परंतु गुप्त लिपीच्या कडीकुलुपांत अनेक शतकें झांकून ठेवलेलें महानुभावांचें वाङ्मय या शतकाच्या आरंभीं तत्पंथीयांशिवाय इतरांस उपलब्ध झाल्यापासून मराठी भाषेचा एक नवीनच ठेवा महाराष्ट्रास प्राप्त झाला आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. याखेरीज आणखीहि एक मराठी वाङ्मयाचा खजिना आहे. त्याचें संपूर्ण दर्शन महाराष्ट्राला अद्याप व्हावयाचें आहे. तो म्हणजे कॅथोलिकपंथाच्या विदेशी व देशी खिस्ती लोकांनीं सोळाव्या व सतराव्या शतकांत आपल्या धर्मप्रसारार्थ निर्माण केलेलें रोमन लिपींतील मराठी वाङ्मय होय. या पंथाचा मराठी आद्यकवि जो पाद्री तोमास इस्तेव्हं—किंवा इंग्रजी भाषेंत म्हणावयाचें झालें तर फादर तोमास स्टीफन्स या इंग्रज माणसानें लिहिलेलें खिस्तपुराण सबंध वाचलेला कोणी आढळला नाहीं, तरी

जैसी हरळां माजी रत्नकिळा।
कीं रत्नांमाजी हिरा निळा।
तैसी भासांमाजी चोखाळ।
भासा मराठी ॥
जैसी पुस्पांमाजी पुस्प मोगरी।
की परिमळांमाजी कस्तुरी।
तैसी भासांमाजि साजिरी।
मराठीया ॥
पखिआं मधें मयोरु।
रुखिआं मधें कल्पतरु।
भासांमधें मानु थोरु।
मराठियेसी ॥

या मराठी भाषेच्या स्तुतिपर तीनचार ओव्या तरी पुष्कळांच्या कानांवरुन गेल्या असतील. कांहींच्या तर त्या मुखोद्गतहि असतील. हें पुस्तक १६१६ सालीं मुद्रित झालें. स्टीफन्सच्या निधनानंतर त्याच्या जागीं राचतूरच्या खिस्ती पाठशालेचा कुलगुरु म्हणून नियोजित झालेल्या एतियेन द ला क्रुवा या फ्रेञ्च पाद्रीनें सेंट पीटरवर दुसरें एक मराठी पुराण लिहिलें. त्याच्या मुखपृष्ठावर १६२९ हा मुद्रणकाल नमूद आहे. या सुमारें दहा हजार ओव्यांच्या मराठी पुराणांत हिंदु देवदेवतांवर जोराचे हल्ले चढविले आहेत.

या दोन्हीहि पुराणांची माहिती मीं पूर्वीच निरनिराळ्या प्रसंगीं मराठी वाचकांना उपलब्ध करुन दिली आहे (यशवंत, संमेलन खास-अंक १९३८). खिस्ताच्या वधस्तंभारोहणावरील एक मराठी काव्य १९४१ सालीं, मुंबई युनिव्हर्सिटी 'जर्नल' मध्यें मीं सटीप प्रसिद्ध केलें. त्याच्या इंग्रजी प्रस्तावनेंतहि या वाङ्मयाची थोडीफार माहिती सांपडेल. आज ज्या मराठी पुराणग्रंथाचा मी आपणांस परिचय करुन देणार आहें, तो अलीकडेच उपलब्ध झालेला ग्रंथ होय. जगांत त्याची एकच प्रत उपलब्ध आहे. या पुराणाचा कर्ता पाद्री आंतोनियु सालदाञ्ञ. आई इटालियन व बाप पोर्तुगीज अशा जोडप्यापासून याचा आफ्रिकेंतील मोरोक्कोमध्यें जन्म झाला. आपल्या अंगांतील वीरवृत्तीला वाव मिळावा म्हणून सोळाव्या वर्षीं लष्करांत नोकरी धरुन तो प्रथम हिंदुस्थानांत

आला; परंतु पुढें धर्माकडे त्याच्या मनाची अनिवार ओढ झाल्यामुळें १६१५ सालीं त्यानें गोव्यांत जेसुईट पंथाची दीक्षा घेतली. धर्मशास्त्र व तत्त्वज्ञान या विषयांचा अभ्यास पुरा केल्यावर सासष्ट (गोवा) या प्रांतामध्यें धर्मोपदेशक म्हणून त्याची योजना झाली. वर सांगितलेल्या इंग्रज व फ्रेंच पुराणकारांच्या जागीं रायतूरच्या धार्मिक पाठशाळेंत त्याची कुलगुरु म्हणून नेमणूक झाली असावी. कारण ता. १५ डिसेंबर १६६३ रोजीं याच गुरुकुलांत त्याचा अन्त झाल्याचें बारबोझ माशाद यानें आपल्या Biblioteca Lusitana या १७४१ सालीं प्रसिद्ध झालेल्या पोर्तुगीज ग्रंथांत नमूद केलें आहे.

सासष्टीमध्यें धर्मप्रसार करीत असतांना तिकडील प्रचलित स्थानिक बोली व ग्रांथिक मराठी या दोहोंचाहि त्याला अभ्यास करावा लागला. या दोनही प्रकारांमध्यें त्यानें एकंदर सहा ग्रंथ लिहिल्याचें नमूद आहे. त्यांपैकीं **सांत आंतोनीची जीवित्वकथा** किंवा सेंट अँथनीपुराण असें ज्यास मी म्हणतों तो ग्रंथ १६५९ सालीं मुद्रित झाला. याचा पूर्वार्ध गोमांतकी बोलींत व उत्तरार्ध ग्रांथिक मराठींत आहे. Fruitos de Arvore de Vida किंवा " जीवनवृक्षाचीं फळें " हाहि ग्रंथ असाच गद्यपद्य आहे. याशिवाय गोमांतकी बोलीचा एक शब्दसंग्रह व कांहीं धार्मिक चोपडींहि या बोलींत त्यानें लिहिल्याचें कळतें. प्रस्तुत लेखांत " सांत आंतोनीची जीवित्वकथा " या ग्रंथाचा परिचय करून द्यावयाचें योजिलें आहे.

मंगलाचरण

नमन * माजें परमेस्परा ।
स्वर्गीसृष्टीचेआ रचणारा ।
कृपासिंधु करुणाकरा ।
मुग्तिराया ॥ १ ॥

नमो मरिये स्वामिणी ।
तूं स्वर्गासंसाराची राणी ।
सास्टांगें तुजां चरणीं ।
प्रणिपातु माजा ॥ २ ॥

तुझेआ देवपुत्राचें वरुदान ।
मज देवविजे मतिग्न्यान ।
तुजे कृपेस्तव सांगैन ।
सांतु आंतोनिची कथा ॥ ३ ॥

मागां पोर्तुगाल राज्यदेसीं ।
लिजबोअ म्हणिपे येका नगरासी ।
सांतु आंतोनियु घरवासी ।
आपुलां निजस्थानीं ॥ ४ ॥

आपुलें मातेचेआ दूदपिवनासरी ।
स्वामिणीची भग्ति निरंतरी ।
ते आ देवभग्तें शेविली उधरीं [1] ।
दुद्‌पान जैसें. ॥ ८ ॥

फुडां आपण हिये संसारीं ।
वर्तणारू होता जेणें परी ।
ती गुणप्रकृती लोकांतरीं
दावीत होता ॥ १० ॥

स्थलान्तर

पुढें पंधराव्या वर्षीं लिस्बनमधील सेंट ऑगस्टाइन पंथाच्या मठामध्यें त्यानें प्रवेश केला:

तंव तो माहा सुलखेणिकु होउनु ।
पुण्यवंती जीणि क्रमउनु ।
देवभग्ति चिंतन करूनु ।
क्रमवी दिवस ॥ २० ॥

ऐसा सदैवु भग्तु वर्ततां तिये स्थानीं ।
तेथ त्याचे सोहिरे समंदी येउनु ।
आडखळु करिताती देखोनु ।
देव चिंतनासी. ॥ २१ ॥

---

* हा मराठी ग्रंथ मूळ रोमन लिपींत छापला असून त्याच्या पहिल्या पानाचा ठसा १९ व्या पानावर पाहावा. प्रस्तुत स्थळीं मंगलाचरणांत देवनागरी लिपींत अनुलेखिलेल्या पहिल्या चार ओंव्या त्या ठश्यांत मूळ रोमन लिपींत छापलेल्या असून त्या वाचकाला कुतूहलजनक वाटतील.

१ उदरीं. महाप्राणाऐवजीं अल्पप्राण व अल्पप्राणाच्या जागीं महाप्राण व्यंजनें योजण्याचा प्रघात जुन्या हिंदु मराठी हस्तलिखित ग्रंथांतहि सांपडतो.

आपुलेआ आत्म्याची मुग्तिची जोडी।
ते जोड्डं नेदेती दिसवडी।
येतां जातां घडी घडी।
अंतरविती देखोनु ॥ २२ ॥

मग त्यां जवळिंचा निगोनी।
दूरस्थ राहीन म्हणऊनी।
ऐसा निर्धारु आपुलां मनीं।
केला तेणें. ॥ २३ ॥

तंव मुस्तैराचेआ[२] स्स्टार्थें[३] विनवुनु।
तेयापासीं अनुग्न्या मागुनु।
निगाला तेआचा निरोपु घेऊनु।
कोइंत्र नांवें नगरीं. ॥ २४ ॥

फ्रॅन्सिस्कन पंथाची दीक्षा.

येथें असलेल्या ऑगस्टाइन मोनास्टरीमध्यें धर्मपठन करीत असतां त्याला फ्रॅन्सिस्कन पंथाची दीक्षा घेऊन त्यांच्याप्रमाणें मुसलमान लोकांमध्यें ख्रिस्तीधर्मप्रसार करण्यासाठीं जावें व हुतात्मा व्हावें, अशी हाव उत्पन्न झाली. याकरितां त्यानें ऑगस्टाइन मठाधिपतीची परवानगी मागितली.

तेणें तेआसि निरोपु दिधला, पण।
देखोनि फेर्नोदाचे उत्तम गुण।
दुखवलें तेयाचें अंतःकरण।
ता निघताये देखोनी. ॥ ४७ ॥

म्हणे फेर्नोदासारिखे कवणु।
ऐसा आणियेकु नाहि सुलखेणु।
ता[४] निगालेआ येथहोऊनु।
मुस्तैरा—आंतुनु ॥ ४८ ॥

अमोलिक भांडार—ठेवणी।
जैसी गेलेया अंतरुनी।
तैसा गेलेया सांतु आंतोनी।
सांडोनि येथें. ॥ ४९ ॥

अमोलिक रत्नाचें भांडार।
येथोनि गेलें होयेल दूर।
म्हणोनि संताप थोर।
करी तेयाचे. ॥ ५० ॥

पण फ्रै फेर्नोदाचें चित[५]।
आपण न करावेया दुस्चित।
आपसंतोसाविण दिधला तेथ।
जावेया निरोपु. ॥ ५१ ॥

नांवहि बदलतो!

धर्माकरितां घरादाराचा त्याग केला, पंथहि सोडला आणि शेवटीं नांवहि बदललें:

तेणें सांव फ्रान्सिस्काची ओर्दी[६]।
आपणेआसि घेतली जर्दि।
सोविसा[७] वरुषाची प्राये[८] तर्दी।
लोटली तेया. ॥ ६० ॥

फ्रै फेर्नोद असतां तेथ।
दिवस क्रमविले बहुत।
तियेचि ठाइं राहावेना त्याचें चित।
न्हवतें तर्दी. ॥ ६१ ॥

आपुले सोहिरे समंधीजन।
मैत्र ओळखिचे स्वजन।
भेटावया येतांति अनदिन।
म्हणोनिया. ॥ ६२ ॥

तेयाचें येरजारी निमितिं।
खोळंबे आपुली देवस्तुति।
ऐसे देखोनि आली बहुती।
उबगी तेया. ॥ ६३ ॥

तंव ते चुकवावेया कारणें।
येकु उपावो मनिं पाहिला तेणें।
नांव पालटावेया कारणें।
चिंतिलें तेहि. ॥ ६४ ॥

कोठां राहिला आहे आपण।
ऐसें न गमावेया कवणा।
नाम पालटिलें जाणा।
आपुलें तेणें. ॥ ६५ ॥

सांतु आंतोनिचे भग्तिपासौनृ'
फेर्नोदु नांव सांडुनु!
आंतोनियु ऐसें म्हणवोनु।
घेतलें नाम. ॥ ६६ ॥

---

२ Monastery च्या. ३ श्रेष्ठातें (superior), ४ तो,
५ चित्त, ६ Order (पंथ), ७ सव्वीस, ८ वय

पोर्तुगीज पुराणकाराचा मराठी काव्यग्रंथ

आपलें घरदार सोडून व नारायण या आपल्या लौकिक नांवाचा त्याग करून रामदासानें जसें नवें पारमार्थिक नांव धारण केलें, तसेंच त्यानें केलें असें म्हणावयास हरकत नाहीं. पुढें म्लेंच्छ लोकांमध्यें ख्रिस्ती धर्मप्रसार करण्याकरितां तो आफ्रिकेला गेला, परंतु वाटेंत आजारी पडून त्याला परत फिरावें लागलें. येतांना स्पेनमध्यें जाण्याकरितां तो जहाजावर चढला; परंतु वाटेंत मोठें तुफान होऊन तारूं सिसीली देशाला लागलें. तेथून निरनिराळे देश फिरत फिरत तो शास्त्रकथन करूं लागला व अनेक " अभाविकांना " त्यानें धर्ममार्गाला लाविलें. तो धर्मप्रसार कसा करी याविषयीं हा पुराणकार लिहितो :

पापियां दोसवंता जनासी ।
उधंडी नितेजना[9] करी तेआंसी ।
नितेजिते समर्थी कवणाई येकासी ।
न करी भीड. ॥ १३८ ॥

उपशाम कारितां सकळा जना ।
न बोलत होता वचनां निस्टुरां ।
बोलुनि बरवीं मोगाळां[10] उतरां[11] ।
उपशमी लोकां. ॥ १३९ ॥

जे लोकु करिती शास्त्रस्त्रवण ।
तेआं जनां योग्य करी पठण ।
जेणें गहिंवरे अन्तकरण ।
तैसी कथना करी. ॥ १४० ॥

त्यानें केलेल्या चमत्कारांमुळें त्याची लोकांवर विलक्षण छाप पडूं लागली. एकदां कांहीं पाखंडी लोक त्यास म्हणाले कीं, " संस्कारिलेल्या होस्ती[12]-मध्यें जर ख्रिस्त वसत असेल, तर आम्ही एका वासराला कांहीं दिवस उपाशी ठेवून नंतर त्याच्यापुढें गवत टाकतों. तें सोडून तें वासरूं जर आपल्या 'होस्ती'कडे जाईल तर विश्वरचना करणाऱ्या ईश्वरास प्राणिमात्र मान देतात असें मानतां येईल."

असें केल्यावर हा संत म्हणाला :

सर्व संसार-रचना नित्य दिवशीं ।
हेआ आपुलेआ रचणारा स्वामियासि ।
मानु देताये म्हणोनि ऐसी ।
व्हावया प्रचिति. ॥ १६५ ॥
वेसरा[13] तूं येउनु झडकरी ।
तुज्या देवा रचणारा सामोरीं ।
शरण येऊनु भजन करीं ।
आपुलेआ देवाची. ॥ १६६ ॥
आणि काय नवल वर्तलें पाहा—
तंव तें वेसर आपुलेआ गोसावेयाहोऊनु ।
बरवे बुधि युग्त आहे देखुनु ।
आपुल्या खाणाची आशा न करुनु ।
तेया वेळां. ॥ १६८ ॥
येऊनि सांतिस्सिमु[14] सांक्रामेता[15] मोहरीं ।
डिंब्रिया[16] घालोनि वसुंधरीं ।
शेरण आलें तिये अवसरीं ।
आपुल्या स्वामिया पुढां. ॥ १६९ ॥

तें अपूर्व महा विपरित ।
देखोनि तेथिल लोकु समस्त ।
अतोज[17] होंऊनु जाहाले विस्मित ।
सकळै तेथें. ॥ १७१ ॥

पुढें आरमिन नांवाच्या नगरामध्यें पाखंडी लोक आपलें शास्त्रकथन ऐकत नाहींत असें पाहून या संतानें काय केलें तें पाहा :

आपण सेंधुतीरीं निगाला ।
जाऊनु तेथें उभा रायिला ।
मग सादु देऊन बोलता जाहाला ।
सेंधूचेआ मछेकुळां ॥ १८५ ॥
तुमी समुद्राचे जळचर ।
लाहान थोर मछमगर ।
शास्त्रस्त्रवणासि समग्र ।
यारे यारे येथें. ॥ १८६ ॥

---

९ रागें भरणें, १० प्रेमळ, ११ शब्द,

१२ Host = Bread consecrated in Eucharist, १३ वासरा,

१४-१५ The most Holy Sacrament, १६ गुडघे, १७ अचोज–आश्चर्यचकित

ऐसें भग्तवचन आइकिलेआवरी ।
माहा चळवळ सुंटले सागरीं ।
लाहान थोर मछकुळें समभारीं ।
येते जाहाले. ॥ १८८ ॥
येक जळांतुनी उडी घेती ।
येरां माछेआं उलंडोनी जाति ।
आपुलें सिसाटे [१८] उचलोनि पाहती ।
येर येरां सरिसे. ॥ १८९ ॥
येर मर्थेचि बुडकळ देउनु ।
येरीकडां येंती उमट्टनु ।
एक मछे उमटती बुडुनु ।
येरां मोहरीं. ॥ १९० ॥
असंख्य मछेकुल देखोनि ।
जिवीं संतोषला सांतु आंतोनी ।
तंव सांगता जाला कथोनी ।
शास्त्र तेयां. ॥ १९६ ।

एकदां तर या पाखंडियांनीं त्याला जेवायला निमंत्रण करून विष चारलें, पण—

तें भक्तें सेविल्या नंतरीं ।
विख बाधलें नाहीं त्याचा शेरिरीं ।
जैसा होता तियेचि परी ।
उरला जिवंतु. ॥ २३७ ॥

शास्त्रकथनाच्या वेळीं आणखीहि एक चमत्कार होई. तो असाः—

विविध यातिचेआं जनां ।
येकें भासेन केलेआ कथना ।
तांतांचे भासे तांताच्या मना ।
परिसे कथन. ॥ २५० ॥
तेआं जना आपापुले भासे ।
कथोनि सांगितलें होय जैसें ।
ते ते परी जाणावे तैसें ।
संदेवावीण. ॥ २५१ ॥

सेंट फ्रान्सिस झेविअर याच्यासंबंधींहि हाच चमत्कार सांगितला जातो; परंतु त्याच्या उपलब्ध पत्रांमध्यें याला आधार मिळत नाहीं. महिपतीनें भक्तिविजय ग्रंथामध्यें ज्ञानेश्वर व नामदेव यांच्या बाबतींत हाच चमत्कार निराळ्या स्वरूपांत वर्णिला आहे :

ज्या ज्या देशीं जाती तीर्थी। तेथें तैसीच करिती कविता।
भाषापरत्वें अमोलिकता। गुण वर्णिती हरीचे ॥ १२॥
—भक्तिविजय, अ. ११

महिपतीनें आपल्या श्रीसंतलीलामृत या ग्रंथाच्या पसतिसाव्या अध्यायांत वर्णन केलेली संत सखूची कथा पुष्कळांना माहीत असेल.[१९] तिची आठवण करून देणाराहि एक प्रसंग या पुराणांत आहे, तो असा :

तो देवभग्तु आणि येकें दिवसीं ।
निगाल्या शास्त्रकथनेसी ।
येकी स्त्री भ्रतारापासीं ।
आज्ञा मागों निगाली. ॥ २५२ ॥
म्हणे " सांतु आंतोनिची शास्त्रसुमूर्ति[२०] ।
आईकावया मज उतकंठा बहुती ।
तरि निरोप दिजो प्राणपति ।
जावेया तेथें." ॥ २५३ ॥
तंव भ्रतारें तिचा पाड न करोनी ।
नाहीं पाठविली आग्न्या देउनि ।
मग ती उपरियें[२१] वळगुनी[२२] ।
लागली पाहूं. ॥ २५४ ॥
तो देवभग्तु अर्धु कोसुभरी ।
शास्त्र सांगे येतुकां दुरी ।
ती उंच स्थानीं उपरियेवरी ।
होंती घरीं. ॥ २५५ ॥
भग्तु आसतां येतुके दूर स्थानीं ।
तिये स्त्रियेन उपरियेहोउनि ।
त्याचें शास्त्रकथन कर्णी ।
आइकिलें समस्त. ॥ २५६ ॥

तुकारामबुवांच्या कीर्तनप्रसंगीं कांहींतरी संकट यावें आणि तें त्यांनीं आपल्या तपःसामर्थ्यानें निवारण करावें असे चमत्कार आपल्या परिचयाचे आहेत.

---

१८ शीर्ष, डोकें, १९ मध्वनाथानेंही या कथेवर अभंग लिहिले आहेत,

२० शास्त्रस्मृति, २१ माडीवर, २२ चढून,

सेंत आंतोनीच्या बाबतींत त्यांना वाण नव्हती. पाहा :

आतां आणियेकी अपूर्वता परियेसीं ।
सदैव देवभग्तु आणियेके दिवसीं ।
विसाळ[23] मैधनीं[24] बहुतां जनांसी ।
कथितां शास्त्र. ।। २५७ ।।
तंव तिये ठाइं अकस्मात ।
माहा प्रचंड वायु उठिला तेथ ।
तेणें विजु वारा झडफळित ।
धाई[25] दिसीं ।। २५८ ।।
गडुगडु सुंटोनि आकासिं ।
मेघपटलें आलीं चौपासिं ।
घनवरुसावो जाहाला सुस्टिसी ।
तेया वेळां. ।।२५९ ।।
तंव लोकांसि आलें माहा जुगांत[26] ।
येकु येकावरी पडत ।
तेवां गर्जर उठिलें बहुत ।
मेधा आणि पवनाचे ।। २६० ।।
झोंपावताती तरुवर ।
तेयांच्या शाखा मिसळताती येकत्र ।
उडती वावटळियांचे धुळौर ।
धाई दिसीं. ।। २६१ ।।
जे लोक होते शास्त्रकथनीं ।
ते भेणें उठिले गजबजोनीं ।
त्यांसि म्हणे नाभिकारू देऊनि ।
सांतु आंतोनियु भग्तु. ।। २६२ ।।
" अरे तुमि लोकु स्थिर असा ।
वायां न करा येकमेकांचा बोळसा[27] ।
तुमि द्रुढ धरा भरवंसा ।
स्वामिया देवाचा. ।। २६३ ।।
तुमां सकळां जनाभितुरी ।
कवणाइ ऐका प्राणियावरी ।
मेघु न पडे एक थेंबाभरी ।
पाहा राहा निश्चिंत. " ।। २६४ ।।
देखोनि भग्ताचें नाभिकारवचन ।
ठाइंच्या ठाइं राहिलें सकळै जन ।
आइकूं लागले शास्त्रकथन ।
सावकाश होउनु. ।। २६५ ।।
येतुक्यां चौघडा गर्जुनु ।
वरसुं लागला माहा घनु ।
तंव त्या मैघजळें कवणु ।
भिजला नाहीं. ।। २६६ ।।

आणखीही एक चमत्कार पहा—

सदैवु देवभग्तु आणियेके दिवसीं ।
शास्त्रकथन करितां जनासीं ।
दुस्ट सैतानु येउनु त्या दिवसीं ।
काय केलें परियेसा. ।। २६७ ।।
एका वाटसुराचें रूप धरुनु ।
कथने ठाइं आला सैतानु ।
येके स्त्रियेपासिं म्हणे येउनु ।
" तूं नेणसीं काये ।। ३३० ।।
अगे येथें राहुन काये करिसी ।
घरींचें वर्तमान नेणसि ? ।
म्यां आइकिलें देखिलें तें तुजसी ।
सांगावेया आलों. ।। ३३१ ।।
तुजा पुत्रु घरीं निवर्तला ।
ऐसा रुधनबोळसा[28] आइकिला ।
म्हणऊनी तुज सांगतों बहिला ।
तुज घरिचें वर्तमान. ।। ३३२ ।।
तें त्याचें वचन आइकिल्यावरी ।
दुखें झळंबली ती नारी ।
रुधन करोनि दुःखभारीं ।
व्याकुळ जाहाली. ।। ३३३ ।।
म्हणे, " कटकटा ऐसें जरी जाणतीं ।
तरी पुत्रासि सांडोनि येथें न येतीं ।
यासि सांभाळोनि तेथेचि राहातीं ।
म्हणोनि घाली स्वास. ।। ३३४ ।।

बाई शोकविव्हल होऊन परत घरीं जाऊं लागली, तों सेंट अंतोनीच्या लक्षांत तिची स्थिति आली व ही गोष्ट साफ खोटी असल्याचें त्यानें तिला सांगितलें व तें अखेर खरेंच ठरलें !

---

२३ विशाळ, २४ मैदानांत, २५ दहाही,
२६ संकट, २७ वळसा, धामधूम, २८ रडण्याची गडबड.

नामदेव व तुकाराम यांना श्रीविठ्ठलानें प्रत्यक्ष भेट दिल्याच्या कथा आपल्या कथापुराणांत आहेत. तशींच ख्रिस्तानेंही सांत आंतोनीला भेट दिली पाहा:—

सदैवु सांतु आंतोनि येके अवस्वरीं ।
फ्रान्स देसिं आसतां एका आश्रमान्तरीं ।
येक वर्तमान वर्तलें त्या मंधिरीं ।
माहा थोर. ॥ ३४६ ॥

क्रिस्तु स्वामी देवनंदनु ।
तेथें लहान बालकाचें रूप धरुनु ।
दिव्य स्वरूपें देवभग्तासि भेट्टनु ।
पडला दस्टी. ॥ ३४७ ॥

कोटी सूर्य प्रकासकळा ।
फांकली त्या सुलखेणा बाळा ।
सर्व संपूर्ण दिव्य पुतळा ।
देखता जाहाला. ॥ ३४८ ॥

तंव भग्तें जोड्डनी दोनिइ हस्त ।
केलें सास्टांगें प्रणिपात ।
मग काये बोलिला होएल तेथ ।
परियेसा श्रुते. ॥ ३४९ ॥

कर–संपुस्ट जोडोनि म्हणे ।
" स्वाभिया तुज्या पवित्र दरुसणें ।
धन्य सुफळ जाहालें जीणें ।
आजि माजें. ॥ ३५० ॥

स्वामिया तूं करुणेचा सागरु ।
मुग्तिराजा परमेस्परू ।
तूं विस्वदीपकु दिनकरू ।
स्वर्गसंसाराचा. ॥ ३५१ ॥

मी अग्न्यानु बाळु तुझा किंकरु ।
तुंवा केलासि भेटेचा कैवारु ।
हा येवढा तुज उपेगु थोरु ।
केवी होईजे उतीर्ण ॥ ३५२ ॥

सुकृताच्या लखे कोटी ।
जरी आचरल्या हे सुस्टी ।
तरीही न लभे तुजी भेटी ।
दुर्लभी दातारा ॥ ३५४ ॥

तूं त्रिलोकींचा चक्रवर्ती ।
मी डिंगरु[२९] गा अल्पमती ।
सुकाळें भेट देऊनि काकुळती ।
केलिसी स्वामिया. ॥ ६५५ ॥

आतां त्राहि त्राहि गा जेजुराया ।
दिव्य बालका क्रिस्ता स्वामिया ।
सहस्त्रसंख्या तुज्या पायां ।
प्रणिपात माजा ॥ ३५८ ॥

मृत माणसाला जिवंत केल्याचेहि अनेक चमत्कार या संताच्या पदरीं आहेत. यांपैकीं एक मोठ्या मौजेचा प्रसंग असा:

लिस्बन शहरामध्यें एका कोणातरी माणसाचा खून झाला. त्याचा आळ सेंट अँथनीचे वडील व त्याचे नोकर यांच्यावर स्थापन करून त्यांना फांशीची शिक्षा देण्यांत कांहीं दुष्टांनीं यश मिळविलें. ही गोष्ट पादुवा नांवाच्या नगरांत बहुत दूर असूनहि अँथनीला अन्तर्ज्ञानानें समजली. रात्रीच्या रात्रीं त्याला देवदूतानें उचलून लिस्बनमध्यें आणलें. त्यानें न्यायाधीशांची भेट घेऊन या माणसांचा अपराध नाहीं असें त्यांना सांगितलें. पण ते आपली शिक्षा बदलूं इच्छीनात. तेव्हां—

बापाचा आणि म्हणियाऱ्यांचा [३०] प्राणु ।
राखावया उपावो न दिसे कवणु ।
तंव मृत्याच्या फोंडांपासीं [३१] निगुनु ।
पातला सांतु आंतोनी. ॥४३९॥

तेयासवें लोकु गेले बहुत ।
फोंडु खणूं लागले तेथ ।

तंव देखिलें मृत्याचें प्रेत ।
जीवंत तेंही. ॥ ४७० ।

मग त्या फोंडातुलें प्रेत ।
जीवंत होउन उठिलें अवाचित ।

तें देखुनु लोक तटस्थ ।
जाहले सकळ. ॥ ४७१ ॥

तंव त्या बहुतांजणांदेखणें ।
सांतु आंतोनी तेयासी म्हणे ।

---

२९ बाळक, ३० सेवकाचा, ३१ पुरलेल्या खळग्याजवळ.

" तुज हातिला[३२] सांग कवणें ।
सत्य वचनीं. ॥ ४७२ ॥
आतां गळा[३३] द्यावेया नेंती जयासा ।
त्या प्राणीयें मारिला काय तुजसीं ।
हें सत्य सांग आपुले वाचेसीं "
ऐसें पुसिलें भग्तें. ॥ ४७३ ॥
देवभग्ताचें वचन आइकोनी ।
मृत्यु मनुसु बोले मुखवचनीं ।
" हेआं मनुषिं नाहीं मारिला हतुनि ।
हे निरपराधी जाणावें. " ॥ ४७४ ॥
मृत्यु मनुष्यु जा जिवनला ।
ता पुणति आपुलां फोंडीं रिघाला ।
ऐसा व्रतांतु येथें वर्तला ।
अश्चर्येवंतु थोरु. ॥ ४८० ॥

प्रस्तुत पुराणकार हा मुक्तेश्वर, तुकाराम व रामदास यांचा समकालीन आहे. याची भाषा पाहातां ती समकालीन मराठी ग्रंथांच्या भाषेसारखी नसून बरीच जुनी वाटते. असें होण्याचें कारण, ज्या प्रदेशांत त्याचें वास्तव्य होतें त्या गोमांतकांतील सासष्टी प्रांतांतील प्रचलित बोलीचें स्वरूप ग्रांथिक मराठीपेक्षां निराळें होतें. त्याच्या पुढें जे जुने हिंदु मराठी ग्रंथ होते त्यांच्या किंवा स्टीफन्स किंवा कुवा या खिस्ती महाराष्ट्र कवींच्या काव्यांचा अभ्यास करून त्यानें आपला ग्रंथ रचिला असला पाहिजे. सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धाच्या आरंभीं म्हणजे १५५६–५७ च्या सुमारास सासष्टी या भागांत धर्मच्छळाचा जोर होऊन तेथील हिंदूंचीं देवदेवळें फोडलीं व ग्रंथ त्यांच्याकडून हिरावून घेतले. यापैकीं कांहीं त्यांनीं जाळून टाकले व कांहीं स्वतःच्या अभ्यासाकरितां राखून ठेवले असावेत. गोव्याचा बिशप दों आल्बुकर्क याचें १५४८ मधील एक पत्र उपलब्ध आहे, त्यांत त्यानें आपण मूर्तिपूजेचें उच्चाटन करण्याकरितां हिंदूंचे धर्मग्रंथ त्यांच्याकडून कसे हिरावून घेतों आहे, याचें वर्णन केलें आहे. हे हिंदु ग्रंथ पांचपन्नास किंवा शंभरदीडशें वर्षांमागचे असावेत. आज एकादा ग्रंथ लिहून झाल्यावर मुद्रणकलेच्या योगानें ताबडतोब जगभर पसरतो; परंतु पूर्वीं त्याच्या नकला होऊन त्या दूर भागांत पसरण्यास बरीच वर्षें लागत, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. त्यामुळें एकनाथानें ज्ञानेश्वरी शुद्ध करण्याच्या आधींचे किंवा महानुभावांच्या ग्रंथांच्या भाषेसारखे जुने शब्द किंवा व्याकरणाचीं रूपें या खिस्ती पुराणांत सांपडतात. शिवाय Gray नें म्हटल्याप्रमाणें, 'a poet's language is never that of his age'. Spenser चीं काव्यें या गोष्टीचें एक उत्कृष्ट उदाहरण म्हणून दाखवितां येतील. स्टीफन्सच्या खिस्त पुराणाची मूळ १६१६, १६४९ किंवा १६५४ मधील मुद्रित प्रत जगांत कोठेंहि उपलब्ध नाहीं, परंतु कुवाचें १६२९ मधलें सेंट पीटरचें पुराण किंवा प्रस्तुत कवीचें १६५९ सालचें अँथनी-पुराण हीं मूळ ग्रंथकर्त्यांच्या नजरेखालीं मुद्रित झालेलीं उघड दिसून येतात. अशा ग्रंथांना मूळ ग्रंथकाराच्या हातच्या लेखाइतकेंच महत्त्व आहे. आपल्याकडील हिंदु कवींच्या ग्रंथाची मूळ हस्तलिखित प्रत अगदीं अलिकडचा मोरोपंतासारखा एकादा दुसरा कवि वगळल्यास कुणाचीहि सांपडत नाहीं. आपल्याकडे असलेले ग्रंथ मूळ लेखकाच्या ग्रंथाच्या नकलांच्या अनेकवार झालेल्या नकला आहेत. प्रत्येक वेळीं मूळाचें आधुनिकीकरण, अशुद्धलेखन, प्रक्षेप, अवक्षेप अशा बदलामुळें मूळ ग्रंथाच्या स्वरूपापासून ते फार दूरावले आहेत. तसा प्रकार या खिस्ती ग्रंथांच्या बाबतींत झालेला नाहीं. या ग्रंथाची भाषा अलीकडच्या लोकांना अशुद्ध वाटते. राजवाडे यांनीं तर स्टीफन्सच्या पुराणावर जोराचा हल्लाच चढविला आहे ! या ग्रंथाची भाषा अशुद्ध वाटण्यास अनेक कारणें आहेत. अलीकडे आपल्या-पुढें असलेले मराठी छापील ग्रंथ संपादकांनीं त्यांच्या-वर संस्कार करून छापलेले आहेत. जुनीं मूळ हस्त-लिखितें जे वाचतील त्यांना या खिस्ती पुराणाची भाषा तितकीशी अशुद्ध वाटणार नाहीं. शिवाय देवनागरी लिपीच्या रोमनीकरणाचा हा पहिलाच

---

३२ मारिला, ३३ फांशी.

प्रयत्न असल्यामुळें तो अपूर्ण व सदोष आहे. देवनागरीमधील कित्येक उच्चार या लिपींत व्यक्त होत नाहींत. उदाहरणार्थ, चित्त. बुद्धि. डबल tt चा उच्चार त्यांच्या रोमन लिप्यन्तराप्रमाणें ट असा होतो. त्यामुळें 'त्त' हें अक्षर डबल tt नें दाखविल्यास चिट्ट असा उच्चार होईल. बुद्धि b- u- d- dh- i असें लिहिल्यास त्याचा 'बुढी' असा उच्चार होईल; परंतु जुन्या काळीं चित्त बद्दल चित किंवा बुद्धी बद्दल बुधी असें देवनागरी हस्तलिखितांतही लिहिलेलें आढळतें, हेंहि विसरतां येत नाहीं. नाहीं तर t- t, d- dh अशाप्रकारें त्त किंवा द्धि असे उच्चार त्यांना व्यक्त करतां आले असते. "तो" या सर्वनामाबद्दल "ता" किंवा "जो" बद्दल "जा" असेंही वरील उताऱ्यामध्यें लिहिलेलें आढळेल. ही परदेशी लोकांची चूक म्हणतां येत नाहीं. भाषेचा इतका ज्यांनीं अभ्यास केला ते अशी क्षुल्लक चूक करतील, हें शक्य नाहीं. शिवाय अशी चूक त्यांनीं केली असती तरी, मुद्रणापूर्वी एतद्देशीय एकाद्या बाटग्या पंडितानें ती त्यांच्या नजरेस खचित आणली असती, हें उघड आहे. राजापूरच्या संस्कृत पाठशाळेंतील पंडित रघुनाथ कृष्ण पाटणकर यांच्याकडून मजकडे एक मुक्तेश्वराच्या आदिपर्वाची जुनी हस्तलिखित प्रत आली, तीमध्यें 'तो' बद्दल 'ता' असा शब्द अनेक ठिकाणीं योजलेला मला आढळला. यावरून जुन्या काळीं 'ता' असेंही रूप प्रचारांत होतें हें स्पष्ट दिसून येतें. आणखीहि ऱ्याच गोष्टी या ख्रिस्ती वाङ्मयासंबंधीं सांगतां येण्यासारख्या आहेत. पण विस्तारभयास्तव येथें जास्त खोलांत मला आज शिरतां येणें शक्य नाहीं.

जीवनलहरी

१

जगता ! मज भान नसे मुळिंहि तुझ्या हंसण्याचें.
काय कथूं ! भान नसे मज माझ्या असण्याचें.
जगतां बेफाट जिणें
पडतें मज विश्व उणें
जडतें अन् वेड मला शून्यामधिं वसण्याचें

२

गाण्याचें गोड वेड दिवसभरी मज जडलें
जें सुंदर त्यावर मी गाणें गुंफित बसलें
माध्यान्हावरती मी
गाणें रचिलें नामी
अवगणुनी नकळत जग क्षुधित, श्रांत बसलेलें.

३

जीवनलहरींवरती तरळावें -- वाटतसें
बिलगावें, विलगावें, ही आशा दाटतसे
गुंगत 'जीवन, जीवन'
फिरतें मी लोभावुन,
आरोहुन माझ्या शिरिं तें सुसाट दौडतसें !

—संजीवनी

पोर्तुगीज पुराणकाराचा मराठी काव्यग्रंथ

' सांत आंतोनीची जीवित्वकथा '

१६५९ सालीं रोमन लिपींत छापलेल्या या पुराणाच्या पहिल्या पानाचा ठसा

100

PADVA

MHALLALEA

XARANTVLEA SAN-
cto Antonichy ziuitua
catha.

13 de Iunho.

NAmana mazē Paramesparā
suerga srustichea rechannara
Crupaxendhu carunnacara
Mugtiraya. 1.
Namo Mariye suaminny
Tü suarga saunsarachy ranny
Sastrangué tuzā charanni
Prannipatu maza. 2.
Tuzea Deuaputrachē varudana
Maza deuauiče mati gneana
Tuze crupestaua sangaine
Sancto Antonichy catha. 3.
Magā Portugala razedessi
Lisboa mhannipe yeca nagaraisi
Sancto Antonio gharauassi
Aaulá nizasthanni. 4.

Bb4 Hea

(देवनागरी लिप्यंतर)

पा द वा

म्हळल्या (म्हटलेल्या)

शारांतुल्या सांतु
आंतोनीची जीवित्व
कथा

१३ जून

नमन * माजें परमेस्परा ।
स्वर्गास्रुस्टीचेआ रचणारा ।
कृपाशेंधु करुणाकरा ।
मुग्ति राया ॥ १ ॥
नमो मरिये स्वामिणी ।
तूं स्वर्गासंसाराची राणी ।
सास्टांगें तुझां चरणी ।
प्रणिपातु माजा ॥ २ ॥
तुझेआ देवपुत्राचें वरुदान ।
मज देवविजे मतिग्न्यान ।
तुझे कृपेस्तव सांगैन ।
सांतु आंतोनिची कथा ॥ ३ ॥
मागां पोर्तुगाल राज्यदेसीं ।
लिज्बोअ म्हणिपे येका नगरासीं ।
सांतु आंतोनिया घरवासी ।
आपुलां निजस्थानीं ॥ ४ ॥

(श्री. प्रियोळकर यांनीं कृपेनें दिलेल्या फोटोवरून)

(पान ११ वरील * तळटीप पहा.)

प्रा. व. ना. नाईक

श्री. अ. का. प्रियोळकर : व्यक्ति व वाङ्मय

येत्या मे महिन्याच्या सुरुवातीस कारवार येथें भरणाऱ्या मराठी साहित्यसंमेलनाचे नियोजित अध्यक्ष श्री. अनंत काकबा प्रियोळकर हे माझे मित्र आहेत. अनेक वर्षांच्या दृढ परिचयामुळें मी त्यांची गणना माझे जे थोडेच स्नेही आहेत त्यांच्यामध्यें करतों आणि ही मैत्री गेल्या पंचवीस वर्षांत कायम टिकली आहे, हें येथें सांगण्यास मला अभिमान वाटतो. आपणांपैकीं एका लायक, विद्याव्यासंगी, आणि विनयसंपन्न व्यक्तीच्या गुणांचें अशा रीतीनें चीज झालेलें पाहून कोणा सुहृद्-मित्राला समाधान वाटणार नाहीं ? त्यांना ज्यांनीं निवडून या पदावर चढविलें, त्यांचेंहि या गुण-ग्राहकतेबद्दल अभिनंदन करावेंसें वाटतें. कारण, श्री. प्रियोळकरांना अध्यक्षपद मिळाल्यानेंच त्यांची थोरवी वाढली आहे असें नाहीं. उलट एका इंग्रजी सुभाषितांत व्यक्त केल्याप्रमाणें in honouring him they have honoured themselves म्हणजे त्यांना भूषित करून त्यांनीं स्वतःलाच भूषित केलें आहे व अशा रीतीनें कारवारच्या नांवलौकिकांत भर घातली आहे.

या लेखांतील मुख्य विषयाकडे वळण्यापूर्वी प्रियोळकरांची निवड होतांच मुंबईच्या ‘ विविध-वृत्त ’ साप्ताहिकांत ‘ आलमगीर ’ या शीर्षकाखालीं त्यांच्या एकंदर वाङ्मयसेवेचें व व्यक्तिमत्त्वाचें जें मार्मिक विवेचन आलें आहे, तें सत्यग्राही व सहिष्णु परीक्षकाला शोभण्यासारखें असल्यामुळें त्याकडे मी वाचकांचें लक्ष वेधूं इच्छितों. या लेखांत ‘ विविधवृत्तां ’तील लेखाची पुनरुक्ति शक्य तोंवर करावयाची नाहीं, असें मीं मनाशीं ठरविलें आहे. त्यामुळें या लेखांतून बराचसा तपशिल आपोआपच वगळला जाईल.

मितभाषी, व्यवस्थित व चोख

माझी व प्रियोळकरांची भेट प्रथमतः गोवें प्रांतांतील मडगांव शहरीं १९१७ किंवा १९१८ सालीं झाली. मी त्यावेळीं मडगांवास तेथील सारस्वत-ब्राह्मण-समाजाच्या वार्षिक उत्सवास गेलों होतों. मडगांवकरांनीं मला या उत्सवाचें अध्यक्षपद दिलें होतें. आणि श्री. प्रियोळकर हे या उत्सवासाठीं मुद्दाम प्रियोळ गांवाहून आले होते. माझी व त्यांची माझ्या निवासस्थानावर पहिल्यांदा दृष्टादृष्ट झाली तेव्हां त्यांच्याबरोबर म्हापशाचे सुप्रसिद्ध व वयोवृद्ध पुढारी, समाजसेवक आणि तेथील विद्यालयाचे संस्थापक व आजीवसेवक काकासाहेब दणाईत हे होते. जवळजवळ तीस वर्षा-पूर्वीची ती गोष्ट. अर्थात्, त्यावेळीं प्रियोळकर अगदीं तरुण होते. प्रियोळकरांचें व माझें या समयीं फारसें संभाषण झालें नाहीं. ओटीवर कोपऱ्यांत काकासाहेबांच्या शेजारीं बसून ते निरीक्षण करतांना मला आढळले. लोक काय बोलतात हें स्वस्थ चित्तानें ऐकावयाचें, कोणत्याहि प्रकारचा मनोविकार चेहऱ्यावर दिसूं द्यावयाचा नाहीं, फारच तर स्मित-हास्य करावयाचें अशा वृत्तीचे ते मला भासले. हें मौन जड बुद्धीचें लक्षण नव्हतें, हें त्यावेळींहि मला पटलें. त्यांचा रेखीव व गोरा चेहरा, त्यावर बुद्धीच्या कुशाग्रतेची दिसून येणारी चमक, शुष्क वादविवादांत न पडण्याचा त्यांचा संयम, त्यांची विनयसंपन्नता, स्वतंत्रपणें विचार करण्याची त्यांच्या मनाची ठेवण--यांची

चुणूक मला या दोनचार दिवसांच्या सहवासांतहि प्रत्ययास आली व हा तरुण मुग्ध असला तरी सामान्य नाहीं, याची खात्री पटली. आज ते प्रसिद्धीस पोहोंचले आहेत व मराठी संशोधन-कार्यांतील त्यांचा दर्जा श्रेष्ठ ठरला आहे म्हणून मी त्यांची स्तुति करीत आहे असें नाहीं. माझे परम स्नेही प. वा. गणपत विश्वनाथ लाड, त्याचप्रमाणें प. वा. काकासाहेब दणाईत यांच्याशीं खाजगी बोलतांना मीं हें मत अनेकदां व्यक्त केलें आहे.

त्यावेळीं ते अगदीं तरुण होते. त्यांच्या वडील बंधूंनीं चालविलेल्या गोंव्याच्या ' स्वयंसेवकां 'त ते लिहीत असत. चारचौघांत व अपरिचितांच्या मेळ्यांत फारसें बोलावयाचें नाहीं, मितभाषणी असावयाचें हा त्यांचा स्वभाव आजहि आहे व त्यावेळींहि माझ्या अनुभवास आला. गोंव्यांतील लोकांस फार बोलण्याची हौस असते. व कोंकणी बोलींत ते आपापसांत बोलूं लागले, म्हणजे तर या संवयीचा अतिरेक करतात. मनमोकळेपणा आणि आदरातिथ्यशीलता यांचाहि हा परिणाम असेल. तरुण आणि वृद्ध सारखेच अघळपघळ बोलतात. पण श्री. प्रियोळकर याला अपवाद आहेत. गोंव्यांत, तरुण म्हणून मी त्यांना पाहिलें व आज एक निकटवर्ती स्नेही म्हणून पाहात आहे. पण त्यांचा तेव्हांचा गुण आजहि कायम आहे. मात्र ज्यांना ते आपले मित्र समजतात त्यांच्यांशीं बोलत असतांना त्यांचा हा मुग्धपणा नाहींसा होतो, स्पष्ट मतें अनुभवास येतात आणि हास्यविनोदप्रचुर असें त्यांचें संभाषण असल्याचें कळूं लागतें. गोंव्यांतून मी मुंबईस परत आल्यावर माझी व त्यांची गांठ अनेक वर्षें पडली नाहीं. आपलें शिक्षण संपवून पुढल्या उद्योगाकरितां मुंबईस कायमचे आल्यानंतर ते मला ' विविधज्ञान-विस्तारा 'च्या कचेरींत आढळले. पुढें प्रसंगानुसार घरींहि येऊं लागले. तदनंतरच्या प्रतिआठवड्याच्या सहवासानें माझा व त्यांचा अधिक परिचय झाला व वर सांगितल्याप्रमाणें ते माझे मित्र झाले. चौपाटी-वर रोज सायंकाळीं रेतींत बसणाऱ्या पांच-सहा शोलकी मित्रांत ते पुढें नियमानें येऊं लागले. प. वा. आनंदराव तेलंग यांची व त्यांची दृढमैत्री याच बैठकीमुळें झाली व ती शेंवटपर्यंत कायम टिकली. तेलंगांची बैठक प्रथम 'विविधज्ञानविस्तारा'-च्या कचेरींत, लक्ष्मीनारायण छापखान्याच्या ओटीवर असे. त्यामुळेंहि कदाचित् प्रियोळकरांची तेथें येण्यास सुरुवात झाली असावी. तें कसेंहि असलें, तरी पुढें ते रामभाऊ तटणीस आणि मोरमकर यांचे स्नेही झाले व ' विविधज्ञानविस्तार ' आणि 'विविध-वृत्त ' यांसाठीं नियमानें लिहूं लागले. ' विविध-वृत्ता 'च्या खास अंकांतील त्यांचें कित्येकदां विनोद-प्रचुर, कित्येकदां रूपकवजा तर कित्येकदां भारदस्त असे जे लेख आले आहेत, ते त्यांच्या वाचकांना निराळे सांगावयास नकोत. प्रियोळकरांनीं ' विविध वृत्ता 'करितां त्यांच्या सुरुवातीच्या अमदानींत कित्येक वेळां अग्रलेखहि लिहिले आहेत. एक कादंबरी लिहिली आहे. शिवाय प्रसंगविशेषीं उपहासवजा व केवळ तत्त्वमंडनार्थ स्फुटें, रूपकें, गोष्टीहि त्यांच्या लेखणींतून उतरल्या आहेत. त्या लेखांनीं वाचकांचे विचार व भावना यांना योग्य वळण लावण्याचें व वस्तुस्थितिनिदर्शन करण्याचें श्रेय जोडलें आहे. ते लेख बोचक वाटत नाहींत, तर मनोरंजक व बोधप्रद वाटतात. होतां होईल तों व्यक्तिविषयक टीका करावयाची नाहीं, पण दंभ-स्फोट करतांना मागेंपुढें पाहावयाचें नाहीं, हा त्यांच्या एकंदर लिखाणाचा दंडक असे. ' विविध वृत्तां 'तील त्यांच्या एकंदर लिखाणांत हा त्यांचा गुण विशेष दिसून येतो. अशा प्रसंगीं त्यांची लेखणी बोंचक होई, परंतु विषारी केव्हांच नसे. आपली भाषाशैली केवळ शब्दांवर कोट्या करून सजवावयाची ही त्यांची रीत नसे. त्यांच्या किरकोळ, प्रासंगिक आणि वर्त-मानपत्रांतील अनामिक लेखांचें सामान्य लक्षण सांगावयाचें झाल्यास, ते लेख चुरचुरीत असत, असें म्हणावें लागेल. इंग्रजींतील कोणत्या लेखकाशीं त्यांची तुलना करावयाची झाल्यास ती Sydney Smith या एकोणिसाव्या शतकांतील लेखकाशीं करणें उचित होईल. त्या लेखकाची Peter Plymley's Letters ही चुरचुरीत, मर्मभेदी व उत्तम पण साध्या भाषाशैलीनें मंडित लेखमाला ज्यांनीं पाहिली असेल, त्यांच्या लक्षांत ही गोष्ट आल्या-शिवाय राहाणार नाहीं. हे अनामिक लेख प्रियोळकरां-चेच आहेत, हें फक्त त्यांची अंतःस्थ माहिती अस-

णाऱ्या मंडळींना अवगत आहे. आणि हें वर्तमान-पत्राच्या शिरस्त्याला धरूनच आहे. ज्यांचें ज्यांचें ' विविधवृत्ता 'च्या कार्यकुशल संपादकांशीं निकट मैत्रीचें नातें आहे, ते सर्वजण या पत्रांत आपुलकीच्या भावनेनेंच लेख लिहितात. प्रियोळकरांनीं आजपर्यंत अशाच भावनेनें या साप्ताहिकांत दंभस्फोट करणारे आपले लेख लिहिले आहेत. ' मोलें घातलें रडाया ' असें त्यांचें लिखाण नाहीं किंवा रंगबेरंगडी-च्या दर्जाचेंहि तें नाहीं. अलीकडे दहापंधरा वर्षांत त्यांनीं वृत्तपत्रांत लिहिणें सोडून दिलें आहे. त्यांचें भारदस्त विषयांवरील लेख सहीनिशींच असतात.

भारदस्त लेखांविषयीं सांगावयाचें झाल्यास, विषयाची पूर्ण माहिती आत्मसात् करून व त्यांतील विचारप्रणालिका पुराव्याच्या आधारें मनांत निश्चित केल्यानंतरच ते असे लेख लिहावयास घेतात. पूर्ण संशोधनानंतरच ते आपल्या आवडीच्या विषयावर लिहितात. यापूर्वी धिसाडघाईनें कांहीं तरी खरडून देणें त्यांच्या बुद्धीला पटत नाहीं. याबाबतींत त्यांच्या तोंडांत नेहमीं असलेला शब्द ' व्यवस्थित ' हा आहे. कोणतेंहि लिखाण करावयाचें झाल्यास तें ' व्यवस्थित व चोख ' असलें पाहिजे, असें त्यांनीं मजकडे अनेकदां म्हटलें आहे. अशारीतीनें त्यांच्या लेखन-पद्धतीची व स्वभावाची सामान्य रूपरेखा दाखविल्यानंतर त्यांच्या चरित्राकडे आपणांला थोडक्यांत पाहावयाचें आहे.

निश्चित ध्येय, अखंड प्रयत्न आणि सत्यनिष्ठा

प्रियोळकरांचा जन्म गोव्यांत प्रियोळ गांवीं झाला. या गांवीं त्यांचें घर आहे. श्रीमंगेशी संस्थान याच गांवांत आहे. मंगेशाचें—म्हणजे शंकराचें—भव्य देवालय डोंगराच्या माथ्यावर आहे, तर प्रियोळकरांचें घर जवळच डोंगराखालीं आहे. त्यांचें प्राथमिक व दुय्यम शिक्षण गोव्यांतच झालें. त्यांना पोर्तुगीज भाषा चांगलीच येते. पुढें ते कालेजांतील शिक्षण घेण्यास प्रथम धारवाडास व तदनंतर सांगलीस राहिले. कर्नाटक कॉलेज आणि विलिंग्डन कॉलेज या दोन विद्यालयांतून आपलें शिक्षण पुरें करून ते बी. ए. ची परीक्षा पास झाले व पुढें कायमचा व्यवसाय पाहाण्यासाठीं मुंबईस आले ते तेथेंच स्थायिक झाले. पोर्तुगीज, मराठी आणि संस्कृत व अलीकडे गुजराथी, या भाषा त्यांना चांगल्याच येतात. त्याचप्रमाणें इंग्रजी भाषेचें त्यांचें ज्ञानहि पायाशुद्ध आहे. आपल्या संशोधन-कार्यांत या चार-पांच भाषांचें व्याकरणशुद्ध ज्ञान व त्यांतील शब्दांचा योग्य अर्थबोध, त्यांच्या चांगलाच उपयोगीं पडला असल्यास नवल नाहीं. ते या भाषांचे पंडित आहेत असें मी म्हणत नाहीं. पण ज्याला accuracy, comprehensive grasp and a good knowledge of the history and meaning of words म्हणतात, तसें या भाषांचें खोल व व्यापक ज्ञान त्यांनीं मिळविलें आहे, हें मला अनुभवानें व प्रत्यक्ष परिचयानें माहीत आहे. ते जुन्या व दुर्मिळ ग्रंथांचे व हस्त-लिखितांचे संग्राहक आहेत; जवळ जवळ हें त्यांचें व्यसनच बनलें आहे. हा संग्रह पाहिल्यास तो विशेष उद्देशानें त्यांनीं केला आहे हें लक्षांत येईल. आणि त्यांचा तो उद्देश व अभ्यासाचा दृष्टिकोन कोणता, हें मीं वर सांगितलेंच आहे.

प्रियोळकरांचें आरंभींचें शिक्षण गांवठी शाळेंत झालें असावें किंवा घरीं मास्तर ठेवून झालें असावें. मूळ वाचनाची गोडी व सन्मार्गाचें वळण त्यांना त्यांच्या वडिलांनीं खास लक्ष पुरवून लाविलें. त्यांचे वडील दररदिवशीं रात्रीं श्रीधर व महीपति यांचे ग्रंथ वाचीत. त्यामुळें लहानग्या प्रियोळकराला मराठीची गोडी लागली. खेडेगांवांतलें निवांत वातावरण, नित्य कानावर पडणाऱ्या श्रीधर व महीपतींच्या ओंव्या आणि वडिलांची दक्षता यांमुळें त्यांच्या बालवृत्तीला इष्ट वळण लागलें व तें पुढें दृढमूल झालें. पोर्तुगीज दोन 'ग्रेड' म्हणजे साधारणपणें इकडील हायस्कूलचें शिक्षण घेतल्यावर त्यांनीं ' लिसेव्ह 'चा अभ्यास सुरू केला. पण तेथील राज्यकर्त्यांची व त्यामुळें ' लिसेव्ह 'मधील शिक्षकांची हिंदी संस्कृतीबद्दल विरोधी वृत्ति व पक्षपात यांची जाणीव होतांच पोर्तुगीज शिक्षण सोडून इंग्रजी शिकण्याची त्यांना प्रबळ इच्छा झाली. याच वेळीं गोव्यास 'रिपब्लिक' झालें व कै. दत्तात्रय विष्णु आपटे व पुण्याचे सध्यांचे वयोवृद्ध काँग्रेस कार्यकर्ते हरि गणेश फाटक वगैरे मंडळींनीं तिकडे जाऊन रामचंद्र पांडुरंग वैद्य यांच्या समवेत फोंडे महालांत ' आल्मेद कॉलेज ' स्थापन

केलें. त्यांत आपलें नांव दाखल करून प्रियोळकरांनीं मॅट्रिक्युलेशनपर्यंत मजल मारली. पण पुढें तो वर्ग बंद झाल्यामुळें व ही मंडळी गेल्यामुळें पुढचें शिक्षण तेथेंच थांबलें. तरीहि घरीं अभ्यास करून त्यांनीं मॅट्रिकची परीक्षा १९१८ सालीं दिली. परीक्षेकरितां बेळगांवास गेले असतां आजारी पडल्यामुळें परीक्षा पास झाल्यानंतर पुढें एक वर्ष त्यांनीं विश्रांति घेतली. पुढें १९१९ सालीं पुढील अभ्यासासाठीं ते धारवाडास गेले व तेथील कर्नाटक-कॉलेजमध्यें त्यांनीं ज्युनियर बी. ए. पर्यंत अभ्यास केला. तेथें कै. अश्वत्थामा बाळाचार्य गजेंद्रगडकर हे त्यांचे संस्कृतचे प्राध्यापक होते. या वेळीं शिष्याच्या नात्यानें प्रियोळकरांची प्राध्यापकमजकुराशीं जी ओळख झाली, ती पुढें टिकून मुंबईस आल्यानंतर प्रियोळकर आणि गजेंद्रगडकर हे एकमेकांचे सुपरिचित व स्नेही झाले, तरीही प्रियोळकर पहिलें नातें विसरले नाहींत. कर्नाटक-कॉलेजमध्यें मराठीचा प्राध्यापक नसल्यामुळें व प्रिन्सिपॉल सिसम तशी व्यवस्था करण्याला तयार नसल्यामुळें प्रियोळकरांनीं कर्नाटक कॉलेज सोडलें व बी. ए. चा अभ्यास पुरा करण्याकरितां सांगलीस नुकत्याच स्थापन झालेल्या विलिंग्डन कॉलेजांत नांव घालून त्यांनीं पुढच्या अभ्यासास सुरुवात केली. तेथें डॉक्टर पां. दा. गुणे येणार म्हणूनच ते या कॉलेजांत आले. डॉ. गुणे आले, पण कॉलेजांत पाय ठेवण्याच्या आधींच ते दिवंगत झाले. ' विविधज्ञानविस्तारां 'त प्रियोळकरांनीं डॉ. गुणे यांच्यावर मृत्युलेख लिहिला आहे. तो पाहिल्यास डॉ. गुणे यांच्याबद्दल त्यांच्या मनांत कोणत्या प्रकारचा थोर आदरभाव होता हें कळलें. या लेखामुळेंच प. वा. रावसाहेब मोरमकर यांचें लक्ष प्रियोळकरांकडे विशेष खेचलें गेलें व बी. ए. ची परीक्षा पास झाल्यानंतर मुंबईस येऊन '-विस्तारा 'ची कायमची सेवा करावी, असें मोरमकरांनीं त्यांना लिहिलें.

प्रियोळकर १९२४ सालीं बी. ए. झाले व एम्. ए.च्या अभ्यासाकरितां मुंबईस आले. पुढें मलेरिया तापानें पछाडल्यामुळें त्यांनीं मुंबई सोडून दिली व ते गोव्याला परत आले. याच सुमारास रावसाहेब मोरमकर वारले व ' विस्तारांत' काम करण्याचा बेत जागच्या जागींच राहिला. पुढें एक वर्ष (१९२४-२५) वेंगुर्ल्याच्या हायस्कूलमध्यें शिक्षकाचें काम त्यांनीं पत्करलें. याच वर्षीं त्यांच्या मातुःश्री निवर्तल्या. त्या वेळीं दुःखाचा विसर पडावा म्हणून ते मुंबईस आले. कै. अनंतराव मोरमकर यांनीं त्यांना रावसाहेब मोरमकरांची आठवण देऊन ' विविधज्ञानविस्तारा 'चें काम पाहाण्याचा आग्रह केला. रामभाऊ तटणिसांचा व प्रियोळकरांचा प्रथम परिचय याच वेळीं झाला. ' विविधवृत्त 'हि याच सुमारास सुरू करण्यांत आलें. ते पहिल्या खेपेस मुंबईस आले असतांना त्यांना मलेरियानें पछाडलें होतें. अर्थात् ते मुंबईंत राहाण्यास प्रथमतः कांकूं करूं लागले. पण मोरमकरांच्या आग्रहावरून ते मुंबईसच राहिले व 'विस्तार' आणि ' विविधवृत्त ' यांच्या कचेरींत जाऊं लागले. पुढची हकीकत मी वर दिलीच आहे. लहान वयांत व आल्मेद कॉलेजमध्यें शिकत असतांना हरि गणेश फाटक यांच्या सहवासाचा त्यांच्या मनावर फारच इष्ट परिणाम झाला. त्यामुळें एका विशिष्ट ध्येयानें वागण्याची त्यांना स्फूर्ति मिळाली. मुंबईंत स्थायिक झाल्यानंतर व संसार करीत असतांना त्यांनीं या ध्येयानुसार आपला मार्ग चोखाळला व त्या मार्गावरील आपलें पाऊल कायम टिकवून अखंड ज्ञानोपासनेबरोबरच त्यांनीं वाङ्मयसेवा केली, लेख लिहिले, प्रसंगोपात्त व्याख्यानें दिलीं; स्कूल कमिटीच्या ऑफिसांतील आपली नोकरी केवळ उपजीविकेचें साधन म्हणून योग्य प्रकारें संभाळून आपलें स्वतंत्र वाङ्मयजीवन त्यांनीं पोसलें व समृद्ध केलें, हें विशेष आहे. एकदां मजकडे 'ज्ञानकोशा'चे संपादक डॉ. केतकर आले असतांना संभाषणाच्या भरांत महाराष्ट्रीयांस स्वतंत्रपणें वाङ्मय हा धंदा करून नीट योगक्षेम चालविणें शक्य आहे काय, असा प्रश्न त्यांनीं विचारला. मी त्यांना 'नाहीं' असें बिनदिक्कत उत्तर दिलें व त्याचीं कारणें सांगितलीं. निदान ' आज तरी नाहीं, उद्यां काय होईल हें सांगतां येत नाहीं ' असा त्याचा भावार्थ होता. हें माझें उत्तर केतकरांनाहि पटलें असावें असा माझा ग्रह झाला. ज्या विषयांच्या अनुरोधानें प्रियोळकरांनीं आजपर्यंत वाङ्मयसेवा केली आहे, ती त्यांनीं कायमची नोकरी पत्करली नसती, तर त्यांना शक्य

अनुक्रमणिका

झाली नसती, असें मला निश्चित सांगावेसें वाटतें. विलायतेंत एकोणिसाव्या शतकांत लँब, मिल ट्रोलोप, मोर्ले यांच्यासारखीं अनेक उच्च दर्जाचीं माणसें दाखवितां येतील, कीं ज्यांना आपला लेखन-व्यवसाय करणें दामुळेंच शक्य झालें. म्हणूनच मोर्ले यांनीं 'Literature is the most seductive and dangerous of all the professions, असें लिहून ठेविलें आहे. ज्ञान व लेखनाची हौस असल्याशिवाय व ती बलवत्तर ठरल्याशिवाय नोकरी करून हा उद्योग सांभाळणें सर्वांनाच शक्य नसतें हें खरें आहे. शिवाय प्रियोळ-करांची नोकरी कॉलेजांतील प्राध्यापकाची नव्हती. पण सामान्यपणें जें काम प्राध्यापकहि करीत नाहींत, तें काम प्रियोळकरांनीं स्वयंप्रेरणेनें पत्करून त्यांत त्यांनीं उच्च दर्जा गांठला आहे.

गोव्याहून मुंबईस आलेल्या, कोणाचीहि ओळख वा वशिला नसतांना, पन्नाशीच्या आंत प्रियोळ-करांच्या हातून असें भरीव काम व्हावें, याचीं दोनच कारणें मला देतां येतात. एक भगवंताचें म्हणजेच सत्यनिष्ठेचें अधिष्ठान. आणि दुसरें प्रयत्नवाद आणि ध्येयनिष्ठा. "यत्न तो देव जाणावा" हें त्यांचें ब्रीदवाक्य आहे असें मी समजतों. ते याविषयीं मजकडे कधींहि बोलले नाहींत. तो त्यांचा स्वभाव नाहीं. परंतु निरीक्ष-णानें मला जें दिसलें, तें मी येथें प्रांजलपणें नमूद करीत आहे. निश्चित ध्येय, अखंड प्रयत्न आणि सत्यनिष्ठा यांच्या अभावीं विद्वानालाहि भरीव काम करतां येत नाहीं, ललितवाङ्मयांतहि अभिजात कृति त्याच्या हातून निर्माण होत नाहीं.

वाङ्मयकलेचे रसिक उपासक

गोव्यास असतांना हरिभाऊ फाटक व प्रियोळ-कर यांचा दाट परिचय झाला. फाटकांनीं त्यांच्या चित्रकलेच्या आवडीला प्रोत्साहन देण्याचा दीर्घ प्रयत्न केला, पण तो यशस्वी झाला नाहीं. गोव्यां-तील लोकांचा कल साधारणपणें गायन—वादन, नृत्यकला व चित्रकला यांच्याकडे असतोच असतो. त्याचप्रमाणें मराठी संतवाङ्मयाचें आणि विशेषें-करून मोरोपंतांच्या आर्यांचें अध्ययन तेथें अनेक-जण—पदवीधर नसतांनाहि—करतांना आढळतात. चातुर्मास्यांत कीर्तनाप्रमाणें बहुतेक घरोघरीं एखाद्या पोथीचें वाचन आणि श्रवण केलें जातें. ही परंपरा ३० वर्षांपूर्वी तेथें अबाधित होती. आजच्या नव्या मनूंत काय चाललें आहे, हें मला माहीत नाहीं. पण प्रियोळकरांच्या बाळपणीं, शिशुदशेंत, व ते मुंबईस येईतोंपर्यंतहि ही परंपरा सुरू असावी असें वाटतें. प्रियोळकर चित्रकलेकडे रमले नाहींत, पण प्राचीन मराठी वाङ्मयानें त्यांचें लक्ष वेधलें आणि वाङ्मयकला त्यांनीं साध्य केली, हें या पूर्व-संस्काराचेंच फळ होय, असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यांना कंठ नाहीं अर्थात् गातां येत नाहीं. एकादें वाद्य ते वाजवितात असेंहि नाहीं. गायन व नृत्यकला यांच्याकडे त्यांचें दुर्लक्ष आहे. ते रसिक आहेत. पण तें केवळ वाङ्मयक्षेत्रांत. ती रसिकता त्यांच्या किरकोळ लेखांत विशेष प्रत्ययास येते व टीकात्मक चर्चेंतहि विनोदाच्या रूपानें मधून मधून अनुभवास येते. त्यांना वक्तृत्व नाहीं. ते आपलीं भाषणें लिहून काढतात व वाचतात. पूर्वतयारी केल्याशिवाय कोणत्याहि विषयावर कोणत्याहि सभेंत बोलावयाचें नाहीं, हा त्यांचा सामान्यतः प्रघात आहे. त्यामुळें त्यांच्या भाषणांत निष्कारण पाल्हाळ आढळणार नाहीं व कोट्यांचा पाऊस पाडून श्रोतृ-जनांना थक्क करण्याची कलाहि दिसणार नाहीं. पण त्यामुळेंच त्यांचें भाषण किंवा निबंधवाचन नीरस होत नाहीं. आणि तें ऐकल्यानंतर फिरून वाचतांना अधिकच मार्मिक व कोणत्याहि विषयाचा ठाव घेणारें असेंच तज्ज्ञ आणि सुज्ञ वाच-काला वाटतें. आपणांला आज कांहीं तरी नवीन कळलें म्हणून समाधान वाटतें किंवा विषयाची मांडणी नव्या रीतीनें केलेली पाहून आनंद होतो. चित्र-कलेकडे त्यांनीं दुर्लक्ष केलें. या विषयाच्या अनु-रोधानें व त्यांनीं खरी वाङ्मयकला—तिचा झगझगाट नव्हे—कशी साध्य केली, हें सांगण्याच्या ओघांत मी हे शब्द लिहिले.

सांगलीस अध्ययन करीत असतां डॉ. गुणे यांचा जो घरगुती चारपांच महिने निकट, प्रेमळ व खासगी संबंध आला, त्यामुळें त्यांच्यांत भाषा-शास्त्राची आवड उत्पन्न झाली. डॉ. गुण्यांची संशो-धन-व-विवेचनपद्धति त्यांना पटली. ती त्यांनीं

उचलली आणि अखंड व्यासंगानें स्वतःपुरती निश्चित केली. याच पद्धतीनें त्यांनीं आपलें एकंदर संशोधन चालविलें व लेखांच्या रूपानें त्याचा निष्कर्ष वाचक आणि श्रोते यांना सादर केला. तो संकलित रूपानें प्रसिद्ध झाला, तर भारदस्त वाङ्मयांत चांगलीच भर पडेल. पण आपणांकडे मॅक्मिलन, मरे यांच्यासारखे प्रकाशक नाहींत व पुस्तकें विकत घेऊन त्यांचा संग्रह करणारा मोठा व मार्मिक वाचक वर्गहि नाहीं. तोंपर्यंत ही आशा जिवंत राहाण्यालाहि जागा नाहीं. धारवाडला 'इंटर'च्या वर्गात असतांना प्रियोळकरांनीं 'विस्तारा'कडे 'मराठी भाषा व कर्नाटक' या विषयावर एक लेख लिहून पाठविला. ह्याबद्दल रावसाहेब मोरमकरांनीं प्रोत्साहनपर पत्र लिहून त्यांचें स्वागत केलें. प्रियोळकर अशा प्रकारच्या लेखनाकडे आकर्षिले गेले. पुढें त्यांनीं डॉ. गुणे यांच्यावर मृत्युलेख लिहिला व त्यामुळेंच रावसाहेबांनीं त्यांना '-विस्तारा'संबधानें लिहिलें. प्रियोळकर कोंकणीचे अभिमानी आहेत व ती बोली ते घरांत बोलतात. परंतु त्यामुळें मराठीचें उच्चाटन करून, गोव्यापुरतें का होईना त्या जागीं कोंकणी भाषेला बसविण्याचें कार्य त्यांनीं पत्करलें नाहीं. प. वा. वर्दे-वालावलीकर यांच्याशीं कोंकणी विरुद्ध मराठी हा वाद करीत असतांना ते संशोधनाकडे वळले असें मला वाटतें.

कविता, नाटिका, प्रहसनें, गोष्टी

मध्यम वर्गातील सभ्य व सज्जन गृहस्थाचें आयुष्य एकाच प्रकारचें व जवळ जवळ रुळल्यासारखेंच असतें. आपला प्रपंच नेटका असावा व होतां होईतोंपर्यंत बिघडूं नये, याबद्दल तो नेहमीं जागरूक असतो व घरांत शांतता आणि प्रेम नादवूं शकतो. तसाच संसार प्रियोळकरांचा आहे, इतकें सांगितलें म्हणजे पुरें आहे. त्याबाहेर त्यांचा संसार म्हणजेच परमार्थ म्हणावयाचा झाल्यास वाङ्मयसेवा हाच आहे. व तोहि ते व्यवस्थित व दक्षतेनें चालवितात.

त्यांच्या विविधविषयक लेखांकडे नजर फेंकल्यास आपणाला याची खात्री पटते. त्यांपैकीं कित्येकांचा येथें नामनिर्देश केला पाहिजे. कविता, विनोदी लेख, रूपकें, स्पष्ट व मर्मभेदी टीका, गोष्टी आणि कादंबरी यांनीं त्यांचें वाङ्मय मंडित आहे. पण कविता आणि कादंबरी ते क्वचितच लिहितात. भारदस्त व माहितीपूर्ण लेख लिहिण्याकडेच त्यांच्या मनाचा कल विशेष आहे. त्यांनीं ग्रंथहि प्रसिद्ध केले आहेत. त्यांचा उल्लेख पुढें येईल. अर्वाचीन मराठी वाङ्मयांतील कित्येक निवडक अभिजात लेखक सोडून दिले, तर इतर आधुनिक मराठी वाङ्मयाची त्यांना फारशी आवड असल्याचें दिसून येत नाहीं. प्रचलित काव्य, कादंबऱ्या, लघुकथा, विनोदी लेख, उपहासात्मक टीका यांची त्यांना फारशी गोडी नाहीं. म्हणून अध्यक्षाच्या नात्यानें या वाङ्मयाचें सिंहावलोकन ते कसें करतात हें पाहणें कुतूहलपूर्ण असून, मी स्वतः त्यांचें यासंबंधींचें विवेचन वाचण्यास उत्सुक झालों आहें. संमेलनाचे अध्यक्ष या नात्यानें त्यांनीं या वाङ्मयाचें धांवतें परीक्षण करतांना दृष्टि समतोल व निःस्पृह ठेवावी असें मला वाटतें व ते तसें करतील याबद्दल मला भरंवसा वाटतो. त्यांनीं कांहीं दिवसांपूर्वीं एका जाहीर अभिनंदनाच्या सभेंत श्री. अत्रे यांना जें उत्तर दिलें, त्यावरून हें गृहीत धरावयास हरकत नाहीं.

त्यांच्या किरकोळ लेखांचें आलोकन करतां, त्यांनीं अनेक मासिकांना हे लेख पाठविल्याचें लक्षांत येतें. 'मासिक मनोरंजन', 'नवयुग', 'विविधज्ञानविस्तार', 'सह्याद्रि' या मासिकांपासून तों 'संजीवनी'पर्यंत त्यांचे लेख विखुरलेले आढळतात. प्रसंगोपात्त जे विषय सुचले त्यांवर त्यांनीं लिहिलें, हौस म्हणून लेखणी चालविली आणि मनोरंजन व ज्ञान यांच्यांत उत्तम भर घातली, असें त्यांचें सामान्य लक्षण सांगतां येईल. 'मासिक मनोरंजनां'त त्यांनीं लिहिलेले दोन लेख उल्लेखनीय आहेत. त्यांपैकीं पहिला लेख 'चाळींतील होमरूल' हा वस्तुस्थितिनिदर्शक असून आजहि विचारप्रवर्तक वाटेल असा आहे. दुसरा लेख--'अंतुकाकांची छत्री' या नांवावरूनच कसा असेल याची कल्पना येते. तो भाषांतरित असला तरी तात्यासाहेब कोल्हटकरांच्या 'पोह्यां'-सारखा चटकदार व खुसखुशीत वाटतो. मी हे दोन्ही लेख प्रथमतः 'मनोरंजनां'तूनच वाचले

व त्याच्या स्मृतीवरूनच मी हें लिहीत आहे. 'आई'– हा लेख चित्ररसग्रहणात्मक आहे. तो त्यांना Cowper कवीच्या 'My Mother's Picture' या कवितेवरून सुचला व त्यांत स्वतःच्या आईच्या स्मृतीची भर पडून तो पुरा झाला, असा माझा तर्क धांवतो. आजहि हे तिन्ही लेख माझ्याजवळ नसल्यामुळें पडताळून घेणें शक्य नाहीं. ' नवयुगां ' तील ' पुरुषाचा पक्षपात ' हा त्यांचा लेखहि याच स्वरूपाचा आहे. या लेखांचे सारांश देणें किंवा परीक्षण करणें येथें शक्य नाहीं, इष्ट नाहीं व अप्रयोजक होईल असें मला वाटतें. त्यांनीं कोंकणी भाषेंतहि एक प्रहसन लिहिलें आहे. तेंहि वाचनीय आहे व त्यांत विनोद आहे. हें, ' प्रहसन ' या त्याच्या नांवावरूनहि लक्षांत येईल. त्याचें शीर्षक ' आवई देव ' (आई हाच देव) हें आहे. त्यांत विनोदा-(humour)बरोबर कारुण्य (pathos)-हि आहे.

त्यांनीं कित्येक कविता व गोष्टीहि लिहिल्या आहेत. ' हताश प्रयत्न ' ही ' महाराष्ट्रसाहित्यां ' तील कविता, ' वसुंधरेची वल्लभोपासना ', ' श्रेष्ठधर्म कुठला बोला ', ' किंकाळी ' या '-विस्तारां 'त प्रसिद्ध झालेल्या कविता, तसेंच ' विविध वृत्तां 'तील ' सोमसंभ्रम ', ' सुंदोपसुंद ', ' कमला-करीम ', ' सावित्री ' या नाटिका व ' एकच शिवी ' हें प्रहसन–यांचा या समालोचनांत उल्लेख करावासा वाटतो. या नाटिका व कविता एक भावना वा विचार केंद्रित करून हेतुपूर्ण अशा त्यांनीं लिहिल्या आहेत. त्यांचा मुख्य व्यवसाय ललित वाङ्मयविलास नसतांहि, त्यांच्या या कृती बहुंशीं Pope कवीच्या satires च्या धर्तीवर आहेत, केवळ हवेंत गमतीनें वावड्या (swallow-flights of song) उडवाव्यात तशा स्वरूपाच्या नाहींत. यानंतर त्यांच्या कित्येक गोष्टींचा निर्देश केला पाहिजे. गोष्टींपैकीं ' नवयुगां 'तील ' क्लेश ' ही गोष्ट, ' शारदें 'तील ' जात्यंध व हत्ती ' हें रूपक, ' महाराष्ट्रसारस्वतां 'तील ' हुंडा–पुराण ' या गद्य-पद्य लिखाणाचा उल्लेख केला पाहिजे. त्यांत उपहास, विनोद, लोकशिक्षणाची तळमळ (satire, humour, didactic strain) यांची छटा आढळते.

कविता, नाटिका, प्रहसनें, गोष्टी यांपैकीं निवडक लेखांचा उल्लेख केल्यानंतर या आढाव्यांत आपणांला त्यांच्या भारदस्त लेखांकडे वळलें पाहिजे. कारण, तो त्यांचा मुख्य वाङ्मयव्यवसाय, आवडीचा उद्योग आहे.

संशोधनपर आणि भारदस्त वाङ्मयांत भरीव भर

त्यांपैकीं वादविवादाचे चर्चात्मक लेख आपण पहिल्यांदा पाहूं या. प्रियोळकरांना कोंकणी भाषेचा अभिमान व आपलेपणा वाटत नाहीं असें नाहीं. पण जेव्हां गोमांतकीय सुशिक्षित लोक व पोर्तुगीज हे मराठीविरुद्ध कोंकणीची नसतीच तरफदारी करतांना व तींसंबंधीं वितंडवाद घालतांना आढळतात, तेव्हां स्वकीयांची ही वागणूक आणि हा अभिनिवेश त्यांना पसंत पडत नाहीं. मराठीच आपली मायभाषा आहे आणि कोंकणी केवळ बोली आहे, हें सिद्ध करण्याकरितां त्यांनीं अनेक लेख लिहिले आहेत व भाषणेंहि केलीं आहेत. मराठीबद्दल त्यांना वाटणारा हा अभिमान रास्त आहे. तो दुराभिमान नाहीं. गोमांतकीय महाराष्ट्रीय आहेत व राजकीय दृष्ट्या त्यांना भारताचेंच घटक व्हावयाचें आहे, ही भूमिका व महत्त्वाकांक्षा लक्षांत घेतां, कोंकणीची किंवा पोर्तुगीजीची तरफदारी करणें इष्ट नाहीं, हें कोणाच्याहि लक्षांत येईल. पण त्याहि पलीकडे जाऊन प्रियोळकरांनीं मराठी भाषा ही महाराष्ट्रीयांइतकीच गोमांतकीयांचीहि भाषा कशी आहे, हें दाखविलें आहे. अशा जाणिवेला पोषक असे लेख लिहून त्यांनीं मराठीबरोबरच कोंकणीचीहि बिनमोल सेवा केली आहे. त्यांपैकीं ठळक व महत्त्वाच्या निबंधांचा येथें उल्लेख करतों. ' विविधज्ञानविस्तारां 'त त्यांनीं ' बोलीभाषेचें बंड ' हा लेख लिहिला आहे. तो जिज्ञासूंनीं अवश्य वाचावा. त्यांत त्यांनीं आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ' प्रमोद ' (मालवण) मध्यें ' कोंकणांतील लोकांची मराठी साहित्यांतील कामगिरी ' हा लेख लिहून आपला वारसा किती थोर आहे, हें त्यांनीं स्वकीयांच्या लक्षांत आणण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे. ' जेसुइटांची मराठी वाङ्मयांतील कामगिरी ' या त्यांच्या

'यशवंत' मासिकांतील लेखांत गोव्यांतील जेसुइटां-पैकीं कित्येकांना धर्मप्रसारार्थ मराठीचीच कांस कशी धरावी लागली, हें त्यांनीं सिद्ध केलें आहे व कोंकणीचा नसताच अभिमान बाळगणें व तरफदारी करणें, गोंव्यांतील हिंदूंना कसें शोभत नाहीं, हें परस्पर दाखविलें आहे. पं. सातवळेकरांच्या ' पुरुषार्थ ' मासिकांत ' मराठी भाषा मारण्याचे जुने प्रयत्न ' आणि ' गोमांतकांतील मराठी भाषा मारण्याचे प्रयत्न ' हे दोन लेख लिहून त्यांनीं याच विषयाचा व एका जिव्हाळ्याच्या प्रश्नाचा उलट बाजूनें परामर्श घेतला आहे. ' कोंकणीची कुळकथा आणि 'कोंकण, कोंकणे आणि कोंकणी', हे त्यांचे 'महाराष्ट्रसारस्वतां'त प्रसिद्ध झालेले लेख व लेखमाला कोंकणी विरुद्ध मराठी या वादाचें निराकरण कर-णारे आहेत. कोंकणीवर त्यांनीं दिलेल्या तीन व्याख्यानांचा 'कॅनरा सारस्वत क्वॉटर्ली' मध्यें इंग्र-जींत प्रसिद्ध झालेला सारांश याच विषयाला पोषक असा वाटतो. सारांश, मराठी-कोंकणीवादांत त्यांनीं भाषणें करून, लेख लिहून मराठीची जी सेवा केली, तिचें स्वरूप पाहातां एकाच प्रश्नाचा पिच्छा पुरवून वितंडवाद नाहींसा करावयाचा, योग्य ज्ञानानें योग्य अभिमान पोसावयाचा, जागृति करा-वयाची ही त्यांची वृत्ति व त्यांच्या मनाची ठेवण लक्षांत येते. हा झाला वादविवादासंबंधाचा त्यांचा दृष्टिकोन. पण त्याशिवाय मराठी भाषेवर स्वतंत्र लेख लिहूनहि त्यांनीं तिला समृद्ध केलें आहे. उदा-हरणार्थ, ' ओंवी, अभंग आणि दिंडी ', ' युरो-पियन लोकांनीं मराठी वाङ्मयांत घातलेली भर ' हे त्यांचे ' सह्याद्री 'त प्रसिद्ध झालेले लेख पाहा. ' विविधज्ञानविस्तारां 'त ' मराठी व्याकरणाची ऐतिहासिक पार्श्वभूमि ' हा लेख लिहून त्यांनीं हीच कामगिरी केली आहे. ' पंतांची माळ व पंडितांचा काळ', 'अभंगचर्चा' ह्यांवर त्यांनीं केलेलें 'प्रतिभे'-तील विवेचन त्याल्या विषयावर नवीन प्रकाश पाडणारें आहे. ' महाराष्ट्रसाहित्यपत्रिकें 'तील ' ज्ञानेशांचा एक प्रगूढ ग्रंथ ' हा लेख, 'Bhagat Namdeo the sixth ' हा त्यांनीं लिहिलेला ' युनिव्हर्सिटी-जर्नल 'मधील संत नामदेवावर नवीन प्रकाश पडणारा निबंध, गुंजीकर लेख-संग्रहाला जोडलेली त्यांची मार्मिक प्रस्तावना, गुंजीकरांच्याच ' मोचनगड ' कादंबरीचें पुनर्मुद्रण करतांना इतिहास आणि ऐतिहासिक कादंबरी यांवर त्यांनीं केलेलें विवेचन, वगैरे लेख मराठी टीकात्मक वाङ्मयांत भर घालणारे आहेत.

प्रियोळकरांच्या स्वतंत्र जीवनाचा विचार करता त्यांत पुढील लेख महत्त्वाचे व उल्लेख करण्यासारखे वाटतात. ' सह्याद्री ' मधील ' शीखपंथ व हिंदु-धर्म ', त्याचप्रमाणें ' ग्रंथसंग्रह—चळवळींचा इतिहास ' हे निबंध याच मासल्याचे आहेत. ' मराठी व्याकरणाची ऐतिहासिक पार्श्वभूमि ' हा त्यांचा '-विस्तारां' तील निबंध माहितीपूर्ण व विवेचनात्मक आहे. ' लोकमान्यां'तील ' बाळशास्त्री जांभेकर', 'ग्रंथालय हेंच विश्वविद्यालय' आणि 'राष्ट्र, महाराष्ट्र व बृहन्महाराष्ट्र ' हे लेख दैनिक वर्तमान-पत्राकरितां लिहिले असले, तरी उद्बोधक वाटतात. 'चक्रधर व गांधी ' हें व्याख्यान त्यांनीं प्रथम प्रार्थना-समाजा'त दिलें. नंतर तें त्यांनीं गुजरातींत व पुढें ' यशवंत ' मासिकांत प्रसिद्ध केलें. गांधीजींच्या जीवनाची चक्रधरांशीं तुलना करून प्रियोळकरांनीं त्या जीवनावर नवीन प्रकाश पडला असल्यामुळें व महानुभावी वाङ्मयांतील एका थोर व्यक्तीच्या चरित्राची गांधींच्या कार्याशीं व जीवनाशीं तुलना केल्यामुळें हा निबंध वाचनीय ठरतो. ' सारस्वत संस्कृतीचें संरक्षण ' हे त्यांचे ' महाराष्ट्रसारस्वत ' या मासिकांतील सात लेख ऐतिहासिक दृष्टीचे असून संस्कृतीचें योग्य मर्म सांगणारे व इशारावजा असल्यामुळें चांगल्या वाङ्मयांत भर घालणारे ठरतात. ' नांवें—आडनांवें ' हा त्यांचा 'विविधवृत्ता'च्या खास अंकांतील लेख संशोधनपूर्ण तसाच मनोरंजक आणि या विषयावर नवीन प्रकाश पाडणारा असल्यानें प्रत्येकानें तो अवश्य वाचावा. ' लोकमान्या 'च्या खास अंकासाठीं त्यांनीं लिहिलेला ' बृहन्महाराष्ट्र ' हा लेख या वादाचें योग्य मार्गदर्शन करणारा असल्यामुळें व ' राष्ट्र, महाराष्ट्र, बृहन्महाराष्ट्र ' या त्यांच्या लेखाची पूर्ति करणारा असल्यामुळें वाचनीय वाटतो. गोमांतक काव्याची ऐतिहासिक पार्श्वभूमि ' हा ' सावरकर-काव्यसमालोचनां 'तील लेख त्यांच्या पुस्तकपरीक्षणाचा व वाङ्मयसमीक्षेचा

उत्तम नमुना असल्यामुळें या आढाव्यांत त्याचा समावेश करणें उचित वाटतें.

सरते शेवटीं त्यांनीं अलीकडे प्रसिद्ध केलेल्या ग्रंथांकडे आपणांला वळलें पाहिजे. त्यांतील दोन ग्रंथ सुपरिचित आहेत, असें मी धरून चालतों. रघुनाथपंडितांचें ' नलोपाख्यान ' हें काव्य सरस व रसाळ आहे. प्रथमतः मी तें ' नवनीतां'तून वाचलें व तदनंतर पुनः पुन्हां प्रियोळकरांच्या संपादित टीकात्मक ग्रंथांतून तें मीं अभ्यासिलें. या ग्रंथाला त्यांनीं जोडलेली प्रस्तावना तो प्रसिद्ध होतांच वादाचा विषय होऊन बसली. हा रघुनाथपंडित कोण, हाच प्रश्न वादात्मक ठरला. त्यांच्या टीकाकारांपैकीं इतिहासकार गोविंदराव सरदेसाई यांच्या विरोधी टीकेला प्रियोळकरांनीं उत्तर दिलें आहे. त्याचप्रमाणें रघुनाथपंडितांवर स्वतंत्र लेख लिहून स्वतःच्या विधानाचें समर्थन केलें आहे. त्यांनीं संपादन केलेल्या प्रतीला जोडलेल्या टीपा काव्य समजण्याच्या दृष्टीनें माझ्या सारख्या अभ्यासूला तरी उपयुक्त व मार्मिक वाटतात. मुख्य वादाच्या प्रश्नावर मी त्या बाबतींत तज्ज्ञ नसल्यामुळें निर्णयात्मक मत देऊं शकत नाहीं. कारण, तो माझा अधिकार नाहीं. काव्याचा स्वाद घेण्याला तें लिहिणाऱ्या व्यक्तीच्या चरित्राची प्रसंगविशेषीं आवश्यकता वाटते. पण ' नलोपाख्याना 'चें तसें आहे, असें मला वाटत नाहीं. ज्याप्रमाणें शेक्सपियरचीं नाटकें वाचीत असतांना त्यांचा कर्ता शेक्सपियर कीं बेकन या वादांत पडणें नाटकांचें रसग्रहण करणाऱ्याला उपयोगी पडत नाहीं, तसेंच जवळजवळ " हा रघुनाथपंडित कोण ? " या प्रश्नाचें आहे. पंडितांनीं त्याचा कीस काढावा; नाहीं असें नाहीं. पण काव्याचें अजरामरत्व त्या प्रश्नावर अवलंबून नाहीं, हेंहि त्याबरोबरच विसरूं नये. औंधकरांच्या प्रेरणेनें व प्रोत्साहनानें प्रियोळकरांनीं या काव्याचें संपादन केलें. त्यांच्या आवृत्तीला युनिव्हर्सिटीकडून ' तर्खड प्राइझ ' देण्यांत आलें आहे.

प्रियोळकरांचा दुसरा महत्त्वाचा ग्रंथ ' रा. ब. दादोबा पांडुरंग यांचें चरित्र ' हा आहे. वस्तुतः मूळ ग्रंथ ' दादोबांचें आत्मचरित्र ' हा दुर्मिळ ग्रंथ आहे. तो मीं मुळांत वाचला आहे. दादोबांनीं केलेली मराठी व्याकरण व मराठी भाषा यांची सेवा, तत्कालीन लोकस्थिति व विचारप्रवाह यांची माहिती कळण्याला हा मूळ ग्रंथ बिनमोल वाटतो. एका बाजूला ' बाबा पद्मनजींचें आत्मचरित्र ' व दुसऱ्या बाजूला ' दादोबांचें आत्मचरित्र ' हीं पुस्तकें ठेवून त्यांतील विचारप्रवाहांचा विचार केल्यास, त्या काळांतील सुशिक्षित मताचें आंदोलन कसें होत होतें, हें चांगलेंच कळतें व या आंदोलनानें उत्पन्न झालेल्या खळबळीचा परिणाम काय झाला आणि त्याची परिणति कशी झाली, याची माहिती या चरित्रावरून मिळते. इतिहासाच्या दृष्टीनें या आत्मचरित्रांचें महत्त्व मोठें आहे. तसेंच त्या वेळची भाषाशैली व आजची भाषाशैली यांचा तुलनात्मक अभ्यास करणाऱ्यांना हीं दोन्ही आत्मचरित्रें उपयुक्त वाटतात. ग्रंथाचें संपादन करून व त्यांतील माहिती दादोबांच्या आयुष्याच्या शेवटापर्यंत देऊन प्रियोळकरांनीं महाराष्ट्राला उपकृत केलें आहे, असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. हा ग्रंथ त्यांच्याकडून लिहून घेण्याचें श्रेय मुंबईचे सुप्रसिद्ध व नुकतेच परलोकवासी झालेले श्रीयुत भास्करराव तर्खड यांनीं घेतलें. मुंबईचे पंतप्रधान श्री. बाळासाहेब खेर यांनीं या ग्रंथाला प्रस्तावना लिहिली आहे. मुंबईच्या जाहीर सभेंत या ग्रंथाचें प्रकाशन करतांना त्यांनीं त्याची मुक्तकंठानें स्तुति केली, इतकें सांगितलें म्हणजे पुरे आहे. या ग्रंथालाहि युनिव्हर्सिटीनें ' तर्खड प्राइझ ' दिलें आहे. या दोन ग्रंथांनंतर त्यांनीं संपादिलेल्या ' गुंजीकर लेखसंग्रह, खंड पहिला ', याचा येथें उल्लेख करावा असें वाटतें. कारण, त्यांनीं हा लेखसंग्रह पूर्ण संशोधन करून संपादिला आहे. व त्याला उत्तम टीकात्मक प्रस्तावना जोडून वाचकांना '–विस्तारा 'च्या या आद्य संपादकांच्या म्हणजे रामचंद्र भिकाजी गुंजीकरांच्या बिनमोल वाङ्मयकार्याची ओळख करून दिली आहे. हे तीन ग्रंथ मी वाचले आहेत. त्यांचे इतर ग्रंथ मी पाहिले नाहींत. त्यांतील ' मराठी व्याकरणाची कुळकथा ' आणि ' ध्रुवाख्यानाचा खरा कर्ता उद्धव चिद्घन ' हीं दोन पुस्तकें, तसेंच ' शीखांच्या आदिग्रंथांतील नामदेव ' यांचा येथें नामनिर्देश केला पाहिजे.

निबंधकाराची लीन वृत्ति

पुस्तकपरीक्षण, स्वतंत्र भारदस्त लेख आणि सरते शेवटीं त्यांनीं प्रसिद्ध केलेले ग्रंथ यांचा त्रोटक परामर्श घेतल्यावर प्रियोळकरांचा वाङ्मयांतील दर्जा पाहावयाचा आहे. तो दर्जा आजच ठरणारा नसल्या-मुळें त्याचें मापन केवळ सापेक्ष दृष्टीनेंच करावयाचें आहे. ललित वाङ्मय निर्मिणारा लेखक आणि भारदस्त विषयांवर लेख लिहून प्रांजळपणें वाङ्मय समृद्ध करूं पाहाणारा वाङ्मयसेवक यांचा दर्जा सारखा नाहीं, हें कोणीहि कबूल करील. या दोघांच्या कृतींमधील चिरंजीव असें काय उरेल, हें सांगणें सोपें नाहीं. त्याचा निर्णय कालावरच सोपविणें अधिक योग्य म्हटलें पाहिजे. उत्तम नाटककार, कादंबरीकार किंवा लघुकथालेखक म्हणून आज ज्यांचा उदोउदो केला जातो, तसा तो पंचवीस वर्षांनंतर पहिल्या किंवा दुसऱ्या श्रेणींत कायमचा असेलच असें नाहीं. भारदस्त विषयांवर लिहिणारे निबंधकार खरोखरी लोकशिक्षणापलीकडे पाहात नसतात. आजची सेवा पदरांत पडली म्हणजे पुरें, अशीच दृष्टि ठेवून ते लेखनप्रवृत्त होतात व आपणांस ‘ जें जें ठावें तें इतरांस सांगावें ’ हाच त्यांचा उद्देश असतो. एकदां हक्सले व स्पेन्सर या पाश्चात्त्य थोर विद्वान् व प्रतिभासंपन्न लेखकांत या विषयावर चर्चा झाली असतां पहिल्यानें दुसऱ्यास चट्कन उत्तर दिलें तें असें : ‘ It is enough to give the world a push and die. No bother about any immortal writing’. कवि, कादंबरीकार, लघुकथालेखक किंवा इतर मनोरंजक वाङ्मय निर्माण करणारा साहित्यिक स्वतःला काय समजत असेल तें समजो. निबंधकार—भारदस्त विषयांवर लिहिणारा निबंधकार—मात्र वेगळ्या वृत्तीचा म्हणजे वर हक्सलेनें वर्णिलेल्या वृत्तीचाच असतो. चिरंजीव होऊन आजहि जगाला श्रेष्ठतम भासणारे असे प्रतिभासंपन्न ग्रंथकार किती झाले, याचा विचार केल्यास आपली या बाबतींतील घमेंड जिरल्याशिवाय राहाणार नाहीं व ‘ नम्र झाला भूतां, त्यानें कोंडिलें अनंता ’ या तुकारामाच्या उक्तीची सत्यता वाङ्मयक्षेत्रांतहि आपणांला पटल्याशिवाय राहाणार नाहीं.

प्रियोळकर हे स्वतःला वाङ्मयाचे केवळ भक्त व निस्सीम सेवकच समजतात. ते साहित्यसंमेलनाचे नियोजित अध्यक्ष झाले, हें त्यांच्या दीर्घ तपश्चर्येचें फळ आहे, असें मी समजतों. निष्कामपणें आपलें आवडतें कार्य करीत राहाणें, फलाशा म्हणजे लौकिक, वाहवा, कीर्ति यांची अपेक्षा न करणें हा त्यांचा मार्ग आहे. लोकांनीं—तज्ज्ञ लोकांनीं—या कार्याला चांगलें म्हटलें म्हणजे त्यांना समाधान वाटतें. तसें न वाटणें हें या मर्त्यलोकांतील मनुष्यस्वभावाच्या विरुद्ध होईल. पण कीर्तीला वा प्रसिद्धीला हपाप-लेले व स्वतःची नसतीच जाहिरात करणारे गृहस्थ ते नाहींत, अशी माझी प्रांजळ समजूत आहे. संशोधनकार्यांतील त्यांची विद्वत्ता आतां सर्वांनाच पटली आहे. मुंबई विश्वविद्यालयानें ‘ मुंबई मराठी ग्रंथसंग्रहा ’च्या विद्यमानें सरकारनेंच त्यांना संशोधक नेमलें आहे. त्यांच्याकडे मराठींत पीएच्. डी होऊं पाहाणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचें कार्यहि सोपविलें आहे. ही गोष्ट त्यांच्या विद्वत्तेच्या मान्यतेची निदर्शक नाहीं असें कोण म्हणेल ?

प्रियोळकर हे स्वतःला ‘ साहित्यचंद्र ’ किंवा ‘ साहित्यसम्राट् ’ म्हणवीत नाहींत; साहित्यिक म्हणवून घेणें हेंहि त्यांना आवडत नाहीं. या पदव्या त्यांना नको आहेत. ती त्यांची महत्त्वाकांक्षा नाहीं. रोजचें काम करावें, सत्याला जागून, होईल ती वाङ्मयसेवा करावी हेंच त्यांचें ब्रीद आहे. मिलनें म्हटल्याप्रमाणें “Do not expect too much from the world, do not become an ‘ergoteur’ ” हा त्यांचा दंडक आहे. आणि त्या-प्रमाणें ते पुढेंहि वागतील व आपलें स्वीकृत कार्य करीत राहातील, असा मला भरंवसा वाटतो.

श्री. श्रीपाद जोशी

राजभाषा, राष्ट्रभाषा आणि प्रान्तभाषा

भारतीय घटनासमितीनें कचेरीची भाषा ठरविल्यापासून राष्ट्रभाषेसंबंधींच्या विचाराला व प्रचाराला या देशांत पुन्हां जोरानें चालना मिळाली आहे. वस्तुत: घटनासमितीनें जो निर्णय घेतलेला आहे, तो राष्ट्रभाषेसंबंधीं नसून संघभाषेसंबंधीं व त्यांतहि मुख्यत: कचेरीच्या भाषेसंबंधीं आहे, ही गोष्ट आपण नजरेआड होऊं देतां कामा नये. घटनासमितीनें कोठेंहि राष्ट्रभाषा National Language हा शब्द वापरलेला नाहीं. कचेरीची भाषा (Official Language) आणि संघभाषा (Language of the Union) हे दोन शब्द घटनेमध्यें वापरण्यांत आले आहेत. या विषयाशीं संबंध असलेलीं घटनेचीं कलमें पुढीलप्रमाणें आहेत.

" कचेरीची भाषा (Official Language)

प्रकरण १. संघभाषा (Language of the Union)

" ३४३ (१) संघाची सरकारी भाषा देवनागरी लिपींतील हिन्दी असेल.

संघाच्या सरकारी कामकाजाकरितां ज्या स्वरूपाचे अंक उपयोगांत आणावयाचे, ते भारतीय अंकांच्या आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे असतील.

" ३५१ हिंदी भाषेचा विस्तार करणें, भारताच्या संमिश्र संस्कृतींतील सर्व घटकांच्या विचारप्रदर्शनाचें माध्यम म्हणून उपयोग होण्याकरितां तिचा विकास करणें, तिच्या स्वाभाविक वळणाला अडथळा येऊं न देतां हिंदुस्थानांतील आणि आठव्या परिशिष्टांत दिलेल्या अन्य भाषांतील घडण, धाटणी व प्रयोग हे आपलेसे करून ती भाषा संपन्न करणें आणि जेथें अवश्य व इष्ट असेल तेथें त्या भाषेच्या शब्दसंग्रहाकरितां मुख्यत: संस्कृत आणि नंतर इतर भाषांच्या भांडाराचा उपयोग करणें हें संघाचें कर्तव्य असेल.

" परिशिष्ट ८ [कलमें ३४४ (१) व ३५१]

" भाषा

(१) असमी
(२) बंगाली
(३) गुजराती
(४) हिन्दी
(५) कानडी
(६) कश्मीरी
(७) मल्याळम्
(८) मराठी
(९) उडिया
(१०) पंजाबी
(११) संस्कृत
(१२) तमिळ
(१३) तेलुगु
(१४) उर्दू "

या उताऱ्यावरून आपल्या लक्ष्यांत येतें कीं, घटनासमितीनें इंग्रजीच्या जागीं हिन्दीची स्थापना केली आहे. अर्थात् पंधरा वर्षांची अट घालून तिनें इंग्रजीला चांगलेंच जीवदान दिलें आहे, ही गोष्ट वेगळी ! परंतु हिन्दीला राष्ट्रभाषा म्हणून मान्यता मिळालेली नसून राजभाषा म्हणून मान्यता मिळालेली आहे, ही गोष्ट नीट ध्यानांत घेतली पाहिजे. मुगलांच्या काळांत फारशी ही राजभाषा होती, मराठ्यांच्या साम्राज्यकाळीं मराठी ही राजभाषा होती आणि इंग्रजांच्या आगमनानंतर इंग्रजी ही राजभाषा

अनुक्रमणिका

बनली. परंतु गेल्या एक हजार वर्षांच्या काळांत हिन्दी ही आंतरप्रांतीय व्यवहाराचें साधन या अर्थानें राष्ट्रभाषा होतीच आणि त्या अर्थानें ती यापुढेंहि अनंतकाळपर्यंत राहाणार आहे. परंतु या सर्व कालखंडांत ती कधीं राजभाषा बनली नव्हती. यामुळें घटनेचें शिक्कामोर्तब करून तिला राजभाषेचें पद बहाल करण्यांत आलें.

हिन्दी राजभाषा कीं राष्ट्रभाषा ?

येथपर्यंत सर्व कांहीं ठीक झालें. परंतु घटना-समितीचा निर्णय जाहीर होतांच ज्यांची मातृभाषा हिन्दी आहे असे बहुतेक सर्व पुढारी आणि त्यांच्या म्हणण्याचा नीट अर्थ व त्यांचा अंतःस्थ हेतु लक्षांत न आलेले अन्य प्रांतीय विद्वान् असें म्हणूं लागले कीं, घटनासमितीनें हिन्दीला राष्ट्रभाषेच्या स्थानांवर बसविलें. फार कशाला ? ता. २६-२७ डिसेंबर १९५० रोजीं राजस्थानमधील कोटा या शहरीं अखिलभारतीय हिन्दी साहित्यसम्मेलनाच्या ३८ व्या अधिवेशनाच्या निमित्तानें तेथें जी राष्ट्रभाषापरिषद् भरली तिचे अध्यक्ष श्री. आर्. आर्. दिवाकर यांनीं देखील आपल्या भाषणांत असें विधान केलें कीं, ' भारत के नव विधान में हिन्दीको राष्ट्रभाषा और राजभाषा होने की दृष्टिसे कायम स्थान मिला । '

अशा प्रकारची चूक होण्याचें कारण एवढेंच कीं, ' राष्ट्रभाषा ' हा शब्द फार मोंगळ अर्थानें आतांपर्यंत वापरला गेला. ज्यांची मातृभाषा हिन्दी नाहीं असे लोक आंतरप्रांतीय व्यवहाराची भाषा एवढ्याच मर्यादित अर्थानें, म्हणजेच संघ-भाषा अथवा राज्य-भाषा या अर्थानें ' राष्ट्रभाषा ' हा शब्द वापरीत आले आहेत. त्यांना आपापल्या प्रान्तांत आपापल्या मातृभाषांचें किंवा प्रांतभाषांचें सार्वभौमत्व हवें आहे. सुरुवातीपासून शेवटपर्यंतचें सारें शिक्षण मातृभाषेंतूनच दिलें जाणार, असें त्यांनीं गृहीत धरलें आहे व म्हणूनच त्यांच्या मतें राष्ट्रभाषेला घरांत प्रवेश नाहीं. परंतु ज्या वेळीं हिन्दी-भाषी लोक ' राष्ट्रभाषा ' हा शब्द वापरतात, तेव्हां त्यांच्या मनांत सबंध हिंदुस्तानची एकमेव भाषा हिन्दीच आहे अथवा होणार आहे, अशा प्रकारची सुप्त अथवा जागृत कल्पना असते. अनेक हिन्दी-भाषी लोकांशीं या विषयावर बोलण्याची संधि मला मिळाली आहे व त्या अनुभवाच्या आधारावरच मी हें म्हणत आहें. आपल्या मातृभाषेची पायमल्ली अथवा ऱ्हास होण्याची जी भीति अ-हिंदीभाषीयांना सतावीत आहे, तिची कल्पनाच ते करूं शकत नाहींत. आणि म्हणून 'एक राष्ट्र, एक भाषा' अशी घोषणा ते बिनदिक्कतपणें करूं शकतात. हिंदी साहित्य-सम्मेलनाच्या कोटा अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष श्री. बुद्धसिंह बापना हे आपल्या भाषणांत म्हणतात :

" यद्यपि यह बात निर्विवाद है कि देशकी सांस्कृतिक एकता के लिअे एक भाषाका होना अत्यावश्यक है, परंतु भारत जैसे विशाल देशमें यह बिलकुल स्वाभाविक है कि सारे राष्ट्र की भाषा एक होने पर भी उच्चारण आदि की दृष्टिसे उसमें विविधता तथा भिन्नता रह सकती है । "

याच भाषणांत श्री. बापना पुढें म्हणतात, " राष्ट्रभाषाद्वाराही हमें अपने सांस्कृतिक पुनरुत्थानकी आशा करनी चाहिये और इसी पुनरुत्थानसे भारतमें शांति अेवं समृद्धि का सच्चा स्वर्ण-युग लाया जा सकता है ! "

म्हणजे आमच्या प्रांतीय भाषांनीं आजपर्यंत सांस्कृतिक पुनरुत्थानाच्या बाबतींत जें कांहीं कार्य केलें असेल तें फुकटच गेलें ! रानडे, गोखले, आगरकर, टिळक, बंकिम, रवींद्रनाथ, यांच्या कार्याना तीं हिन्दींत न झाल्यामुळें, कांहींच महत्त्व नाहीं !

भाषावार प्रांतरचनेला हिंदीवाल्यांचा विरोध

आणि हिंदीवाल्यांच्या याच मनोवृत्तीमुळें ते भाषावार प्रांतरचनेला साथ देऊं शकत नाहींत. भाषावार प्रांतरचना हा संकुचितपणा आहे असें त्यांना वाटतें आणि म्हणूनच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जेव्हां जेव्हां भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न उपस्थित करण्यांत आला, तेव्हां तेव्हां हिंदीभाषी लोक-प्रतिनिधींनीं त्याला विरोध केला व त्यांचें बहुमत असल्यामुळें तो प्रश्न दर खेपेस लांबणीवर पडत गेला. (गुजरात हा सलग प्रांत असल्यामुळें भाषावार प्रांतरचना न झाल्यानें गुजराती लोकांचें प्रत्यक्ष कांहींहि नुकसान होत नाहीं. यामुळें त्यांना या प्रश्नाची आंच लागलेली नाहीं व म्हणून तेहि या

बाबतींत विरोधी किंवा तटस्थ राहूं शकतात, ही गोष्ट आपण लक्ष्यांत ठेविली पाहिजे.)

ही गोष्ट एका निष्पक्ष हिंदी विद्वानाच्या लक्ष्यांत आली व त्यानें ती जाहीर रीत्या बोलूनहि दाखविली. हे विद्वान् म्हणजे सुप्रसिद्ध इतिहासज्ञ श्री. जयचंद्र विद्यालंकार होत. हिंदी साहित्यसम्मेलनाच्या कोटा अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणांत ते या विषयासंबंधीं म्हणतात :

"भाषा-प्रांतोंका संघर्ष हिंदीवालोंका अपना संघर्ष था, क्यों कि यदि प्रांतोंमें भारतीय भाषाअें स्थापित हो जायें तो उन सबका परस्पर-संबंध बनाये रखनेको केंद्रमें हिन्दी आपसे आप स्थापित हो और सारे भारतमें एक-सी कानूनी शब्दावली चल जाय। मुझे दुःखसे कहना पड़ता है कि हिन्दी-प्रेमी नेता इस प्रसंगमें साधारण-सी दूरदर्शिता भी नहीं दिखा सके और अंग्रेजीवालों द्वारा बुरी तरह बनाये गये। जब भाषा-प्रांतोंका प्रश्न आया तब उन चतुर लोगोंने उसे प्रांतीय भाषाअें बनाम संघ-भाषाका रूप दे दिया। कुछ हिन्दीवालोंने सोचा, संघभाषा तो हिन्दी होगी ही, सो क्यों न वही सारे भारतमें जम जाय ? यह अत्यंत गलत लालसा थी, क्यों कि दो-दो हजार वर्ष पुरानी भाषाओं को हिन्दी उखाड़ नहीं सकती। प्रांतीय भाषाओं-वालोंने देखा, हिन्दीवाले उनकी भाषाओंको उनके प्रांतोंमें भी दबाना चाहते हैं। इस प्रकारसे रुष्ट प्रांतीय भाषाओंवालोंको संघभाषाका प्रश्न आनेपर उन्हीं चतुर अंग्रेजीवालोंने हिंदीवालोंसे भिड़ा दिया और यों अंग्रेजीकी प्रभुताको कमसे कम पंद्रह बरसके लिअे बढ़ाकर अपने जीवन-कालके लिअे सुरक्षित कर लिया। हिन्दीवाले यदि दूसरी भारतीय भाषाओंके तई अपना कर्तव्य निभाते तो उन्हें इस तरह पछाड न खानी पडती।"

परंतु श्री. जयचंद्र विद्यालंकार यांचा हा उपदेश अरण्यरुदनच ठरला आहे, असें गेल्या कांहीं महिन्यांतील हिन्दीवाल्यांच्या हालचालीवरून दिसून येत आहे. कॉंग्रेसचे अध्यक्ष व हिन्दी साहित्यसम्मेलन-सूत्रधार श्री. पुरुषोत्तमदास टंडन यांनीं प्रजासत्ताक दिनाचे दिवशीं लाल किल्ल्यांत जें भाषण केलें, त्यांत त्यांनीं आपलें जुनेंच धोरण पुढें चालविल्याचें स्पष्ट दिसतें. भारताच्या सांस्कृतिक पुनरुत्थानाचें कार्य हिन्दीच करूं शकेल असा त्यांचा दावा आहे. मुंबईला आणि वर्ध्याला त्यांनीं जीं भाषणें केलीं त्यांतहि हाच सूर दिसून येतो. यावरून हिन्दी-वाल्यांच्या मनोवृत्तींत कांहीं सुधारणा होत आहे, असें मानण्यास जागा नाहीं. जोंपर्यंत या बाबतींत अहिन्दी भाषी जनता संघटित होऊन या भाषिक आक्रमणाला तोंड देण्यास सुसज्ज होत नाहीं, तोंपर्यंत हिन्दीवाल्यांचे डोळे उघडतील असें वाटत नाहीं. यावर कोणी असें म्हणेल कीं, आपण सर्व भाऊभाऊच आहोंत, तेव्हां थोडीशी देवाणघेवाणीची वृत्ति आपण बाळगिली पाहिजे व भाषिक आक्रमणाचा आरोप कोणी कोणावर करूं नये. ज्यांना, भारत हें आधुनिक युरोपियन अर्थानें 'एक राष्ट्र' (इंग्लंड, जर्मनी, फ्रान्सप्रमाणें) आहे व तें बलिष्ठ बनविण्यासाठीं त्याची एक भाषा होणें जरूर आहे असें वाटतें, अशा लोकांच्यासाठीं हें विवेचन नाहीं. त्यांनीं खुशाल एक भाषेचा प्रचार करावा. परंतु आजच्या अहिन्दी-भाषिक प्रांतांना हें तत्त्वज्ञान मान्य नाहीं. त्यांना आपापली भौतिक व आध्यात्मिक उन्नति आपापल्या प्रान्तभाषांच्या द्वारेंच करून घेण्याची इच्छा आहे. म्हणून ज्यायोगें हिन्दी प्रांत-भाषांच्या हितामध्यें थोडाहि अडथळा निर्माण होईल अशी भीति त्यांना वाटते, अशी कोणतीहि गोष्ट स्वीकारण्यास ते तयार नाहींत. मराठी आणि हिन्दी-मध्यें फारसा फरक नसल्यामुळें मराठीवाल्यांना हिन्दी शिकण्यांत फारशी अडचण वाटत नाहीं व हिन्दीबद्दल विशेष परकेपणाहि वाटत नाहीं. म्हणून हिन्दीचें आक्रमण आपल्याला इतकें जाचत नाहीं. परंतु ज्या द्राविडी भाषांचा हिन्दीशीं कांहीं संबंध नाहीं, त्यांना हिन्दीच्या आक्रमणाची सदैव भीति वाटत आलेली आहे. परवांच्या हिन्दी साहित्य-सम्मेलनाला श्री. चक्रवर्ती राजगोपालाचार्य यांनीं जो संदेश पाठविला आहे त्यावरून दक्षिण भारतीयांच्या मनांतील भीति व्यक्त होते. श्री. राजाजी आपल्या संदेशांत म्हणतात :

"हिन्दीला जी प्रतिष्ठा लाभली आहे तिच्या अनुसार हिन्दीची प्रगति लौकर होवो. साहित्य-संपदा, सुंदर व कोमल शैली वगैरे गुणांमुळें बुद्धिमान् व उत्साही

भारतीयांना इंग्रजी भाषेविषयीं आकर्षण वाटतें. हे सर्व गुण हिन्दीमध्येंहि आले पाहिजेत. हिन्दीप्रेमी (हिन्दी भाषी) लोकांना माझा एक नम्र इशारा आहे. भारताच्या असंघटित लोकांवर त्यांनीं आपल्या बहुसंख्येच्या जोरावर कसलेंहि दडपण आणतां कामा नये. त्यायोगें देशामध्यें एकतेऐवजीं दुही व विरोध निर्माण होईल. हजारों वर्षांपासून हिन्दीच्या बरोबरीनें इतर भाषाहि या देशांत चालू आहेत. केवळ संख्येच्या जोरावर हिन्दी या भाषांना नष्ट करूं शकलेली नाहीं. या ऐतिहासिक घटनेकडून आपण धडा घेतला पाहिजे. घिसाडघाई केल्यानें कांहीं फायदा होत नाहीं. हिन्दीच्या बाबतींतील घाई पाहून पूर्वभारत आणि दक्षिण भारत येथील लोकांच्या मनांत हिन्दीभाषियांचें प्रभुत्व आणि जुलूम यांविषयीं भय निर्माण होईल कीं काय, अशी आशंका मला वाटते. त्यांची ही भीति दूर केली पाहिजे. घाई करण्याऐवजीं हळूहळू परंतु निश्चितपणें होणारे स्वयंप्रेरित प्रयत्नच या कामीं उपयोगी पडतील असें मला वाटतें. माझे हे विचार कदाचित् तुम्हांला आवडणार, पटणार नाहींत. परंतु माझे हे प्रामाणिक विचार आहेत. मीं गेलीं तीस वर्षें दक्षिण भारतांत हिन्दी प्रचाराचें काम केलें आहे आणि त्याबाबतींत माझा उत्साह आजहि पूर्वीप्रमाणेंच कायम आहे.''

राजभाषा व राष्ट्रभाषा यांतील फरक

राजभाषा आणि राष्ट्रभाषा यांतील मुख्य फरक असा कीं, राजभाषा ही सरकारनें ठरवावयाची असते आणि राष्ट्रभाषेचें स्वरूप जनतेच्या इच्छेनें व सोयीनें ठरवावयाचें असतें. यामुळें राजभाषा ही एकाद्या चौकटींत बसल्यासारखी निश्चित व चपखल असते तर राष्ट्रभाषा ही सर्वसंग्राहक, समावेशक व लवचिक असते. उदाहरणार्थ, सरकारनें 'घटना' (Constitution) या शब्दासाठीं 'संविधान' हा शब्द राजभाषेचा म्हणून मान्य केला, तर सरकारदरबारीं तोच शब्द वापरावा लागेल, दुसरा शब्द त्याच्याऐवजीं चालणार नाहीं. परंतु राष्ट्रभाषा हिन्दीमध्यें 'विधान', 'घटना' किंवा अशाच अर्थाचे इतर शब्द चालू शकतील. जास्तींतजास्त लोकांना समजणारे शब्द वापरण्याकडे राष्ट्रभाषेची प्रवृत्ति असेल, तर सरकारनें मान्य केलेलेच शब्द लोकांनीं वापरले पाहिजेत अशी राजभाषेची अपेक्षा असेल. राष्ट्रभाषा ही गेल्या अनेक शतकांपासून बनत आहे व ती पुढेंहि बनत राहाणार आहे. नामदेव, तुकाराम, नरसिंह मेहता यांनीं राष्ट्रभाषेंत काव्य केलें (व त्याला 'हिन्दुस्तानीं पदें' असें नांव दिलें.). त्यांच्या भाषेंत मराठी व गुजराती शब्दच नव्हे तर त्या भाषांची धाटणीहि दिसून येते. इतका लवचिकपणा राजभाषेंत ठेवून चालणार नाहीं. कारण त्यायोगें सरकारच्या कामकाजांत गोंधळ माजेल. अर्थात् राजभाषेची आवश्यकता, मुख्यतः प्रांतांना केंद्रसरकारशीं व इतर प्रांतांशीं संबंध ठेवता यावा, यासाठींच आहे. पंधरा वर्षांच्या मुदतीनंतर जेव्हां मध्यवर्ती सरकारचें कामकाज हिन्दींत चालूं लागेल तेव्हां अहिन्दी प्रान्तीय सरकारांना आपल्या कांहीं विभागामध्यें (ज्यांचा संबंध केंद्रसरकारशीं येईल अशा) राजभाषा हिन्दी सुरू करावी लागेल. म्हणजे राजभाषा ही मुख्यतः सरकारी नोकरांच्या गरजेची गोष्ट आहे, तर राष्ट्रभाषा ही लोकांच्या सर्वसामान्य उपयोगाची वस्तु आहे. राजभाषा न आल्यास सरकारी नोकरांना कदाचित् आपल्या नोकरीस मुकावें लागेल, परंतु राष्ट्रभाषा न आल्यानें आम जनतेचें कांहीं भयंकर नुकसान होईल असें नाहीं. ज्यांचा परप्रांतीयांशीं संबंध येणार असेल असे लोक आपल्या गरजेप्रमाणें राष्ट्रभाषेचें ज्ञान मिळवितील आणि प्रांतांचा राज्यकारभार प्रान्तीय भाषांतून होणार असल्यामुळें प्रांतांतील जनतेचीहि कांहीं कुचंबणा होणार नाहीं.

प्रांतीय हिन्दी व राष्ट्रीय हिन्दी

आपल्यापैकीं पुष्कळांची अशी समजूत आहे कीं, आज जी हिन्दी (पुस्तकें व नियतकालिकें यांच्या द्वारें) लिहिली व वाचिली जाते तीच हिन्दी उत्तर भारतांतील लोकांची मातृभाषा आहे. परंतु ही समजूत चुकीची आहे. ज्याप्रमाणें आपल्याकडील गोमांतकीय लोक घरीं व आपापसांत 'कोंकणी' भाषा बोलतात परंतु लिहिण्या–वाचण्यासाठीं पुस्तकी 'मराठी'चा उपयोग करतात, त्याप्रमाणें उत्तर भारतांतील हिन्दीवाले आपापल्या घरीं वेगवेगळी 'बोली'–बोलभाषा वापरतात. या बोलभाषा अनेक आहेत. यासंबंधीं

श्री. जयचंद्र विद्यालंकार यांनीं त्यांच्यावर उल्लिखित भाषणांत जें म्हटलें आहे त्याचा आशय असा :

" बुद्धाच्या काळीं भारताचा जो मध्यदेश होता त्यांतच सध्यां लिहिण्यावाचण्याची भाषा हिन्दी चालू आहे. भाषाशास्त्रज्ञांच्या मतें यांत चार भाषा आहेत : हिन्दी, राजस्थानी, कोशली व बिहारी.

हिन्दीच्या पांच बोलभाषा आहेत : खडी बोली, व्रजभाषा, कनोजी, बुंदेली व बांगरू.

कोशलीच्या तीन बोलभाषा आहेत : अवधी, बघेली आणि छत्तीसगढी.

बिहारीच्याहि तीन बोलभाषा आहेत : भोजपुरी, मगही व मैथिली.

राजस्थानीच्याहि सहा बोलभाषा आहेत. "

या बोलभाषाच मुख्यतः ' हिन्दीवाले ' आपापल्या घरांतून बोलत असतात आणि अशिक्षित जनतेला तर पुस्तकी हिन्दी शिकण्यासाठीं जवळ जवळ मराठी–गुजराती भाषिकांइतका प्रयत्न करावा लागतो.

बिहारी लोक हिन्दी भाषा बोलतांना इतक्या चुका (विशेषतः लिंगांच्या) करतात कीं, तो एक विनोदाचा विषय होऊन बसला आहे. शिवाय यांपैकीं कांहीं बोलभाषा आजच्या हिन्दीपेक्षांहि समृद्ध आहेत. तुलसीदासांचें ' रामचरितमानस ' (रामायण) आणि मलिक मुहम्मद जायसीचें ' पद्मावत ' हीं दोन अग्रगण्य महाकाव्यें अवधीमध्यें आहेत व त्यांची भाषा समजणें इतर बोलभाषावाल्यांना खूपच जड जाते. संतकवि सूरदासांचें सर्व साहित्य (' सूरसागर ') व्रज भाषेंत आहे. छन्दःशास्त्रावरील सर्व जुने ग्रंथ व्रजभाषेंत आहेत आणि राजस्थानीमध्येंहि विपुल साहित्य आहे. म्हणजे वस्तुतः या बोलभाषांच्या अनुसार उत्तरभारताचे भिन्न भिन्न प्रांत करून त्यांना आपापल्या लोकभाषांची उन्नति करण्याची संधि दिली गेली पाहिजे. या बोलभाषा बोलणाऱ्यांची संख्या लाखांनीं मोजतां येण्यासारखी असल्यानें त्यांचें स्वायत्त व स्वावलंबी प्रांत बनूंहि शकतील. परंतु जोंपर्यंत बहुसंख्येचा सैतान हिन्दीवाल्यांच्या मानगुटीवर बसलेला आहे, तोंपर्यंत ते आपल्या घरचे दोष तसेच दाबून ठेवणार. तें जरी झालें नाहीं तरी एक गोष्ट निर्विवाद आहे कीं, प्रांतीय हिन्दी व राष्ट्रीय हिन्दी यांत फार मोठा फरक आहे. प्रांतीय हिन्दीचें स्वरूप ठरविण्याची जबाबदारी हिन्दीवाल्यांची आहे व त्यासाठींच वस्तुतः हिन्दी साहित्यसम्मेलनाचा उपयोग केला गेला पाहिजे. परंतु भाषिक साम्राज्यवादाच्या मदामुळें सम्मेलनाला ही साधी गोष्ट समजत नाहीं. श्री. दिवाकर यांनीं आपल्या भाषणांत म्हटल्याप्रमाणें, ' हिन्दीप्रचाराचा सर्वांत महत्त्वाचा मार्ग म्हणजे भारतीय विषयांवर चांगले ग्रंथ हिन्दींत निर्माण करणें हा होय. ' परंतु नेमकी एवढीच गोष्ट आज हिन्दीवाले करीत नाहींत. वस्तुतः बंगाली, मराठी, तेलुगु, तामिळ, उर्दू वगैरे अन्य भाषांतील साहित्याच्या मानानें आजच्या हिन्दीचें साहित्य इतकें दरिद्री व भिकारडें आहे कीं, साहित्याचा आस्वाद घेणाऱ्याला हिन्दी पुस्तक हातांत घरण्याची इच्छा होऊं नये. परंतु केवळ संख्याबलाच्या जोरावर हिन्दीवाले आपलें वैगुण्य लपवूं पाहात आहेत. त्यांना आपण त्यांच्या या चुकीची कल्पना आणून दिली पाहिजे.

घटनासभेनें संघभाषाविषयक आपल्या ठरावांत हिन्दीचीं हीं दोन रूपें मान्य केलीं आहेत, असें आपल्याला दिसून येईल. नाहीं तर ३५१ व्या कलमांत हिन्दी भाषेच्या विकासासाठीं आठव्या परिशिष्टांतील भाषांची मदत घेण्याचा जो उल्लेख केला आहे त्याला कांहीं अर्थ उरत नाहीं. कारण, आठव्या परिशिष्टांतहि हिन्दी भाषा आलेली आहे. हिन्दीच्या मदतीनें हिन्दीचा विकास करणें याचा अर्थ काय ? याचा अर्थ एवढाच कीं राजभाषा हिन्दीचा विकास करतांना प्रांतभाषा हिन्दीची मदत घेण्यांत यावी.

आतां प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, ही प्रांतभाषा हिन्दी जर राजभाषा म्हणूनहि मान्य होणार नाहीं, तर तिला आपण राष्ट्रभाषा कां व कसें मानावें ? हिन्दी प्रांतभाषेचें स्वरूप ठरविण्याचा अधिकार व जबाबदारी ही कदाचित् हिन्दी साहित्यसम्मेलनाची असूं शकेल (' कदाचित् ' अशासाठीं

कीं सम्मेलनाचा हा अधिकार न मानणारेहि अनेक हिन्दीभाषी लोक आज आहेत). परंतु राष्ट्रभाषा हिन्दीचें स्वरूप ठरविण्याचा अधिकार सम्मेलनाला आहे, हें अहिन्दीभाषी लोकांनीं काय म्हणून मान्य करावें ? आजपर्यंत हिन्दीचा राष्ट्रभाषा म्हणून प्रचार मुख्यतः अहिन्दी भाषिकांनीच केलेला आहे व गांधींच्या आशीर्वादानें त्यांत त्यांना चांगलेंच यशहि लाभलें आहे. परंतु हिन्दी प्रचाराचीं सूत्रें अखिलभारतीय हिन्दी साहित्यसम्मेलनाच्या हातीं सोपवितांना भावी अनिष्टाची गांधीजींना त्या वेळीं कल्पनाहि आली नसेल. दक्षिण भारत हिन्दी प्रचार-सभेप्रमाणें सिंध, गुजरात, महाराष्ट्र, उत्कल, बंगाल व आसाम या अहिन्दी प्रांतांत हिन्दीचा प्रचार करण्यासाठीं गांधींनीं जर स्वतंत्र समिति नेमिली असती, तर या प्रश्नाला असे फाटे फुटले नसते आणि राष्ट्रभाषेचें स्वरूप ठरविण्यांत अहिन्दी भाषिकांच्या सोयी-गैरसोयींना प्राधान्य मिळालें असतें. आपण होऊन आपली शेंडी हिन्दी साहित्य-सम्मेलनाच्या हातांत दिल्याचेंच हें फळ आहे.

त्यांतून मार्ग एकच

यांतून एकच मार्ग आहे. तो म्हणजे हिन्दी ही राजभाषा आहे, असें समजूनच आपण तिच्या प्रचाराकडे पाहिलें पाहिजे. किंवा मग राष्ट्रभाषा म्हणून तिचा प्रचार करावयाचा असेल, तर तिचें स्वरूप ठरविण्यामध्यें ज्यांची भाषा हिन्दी नाहीं, अशा लोकांना प्राधान्य दिलें गेलें पाहिजे. त्यासाठीं सर्व अहिन्दी भाषिकांनीं आपली एक स्वतंत्र संघटना बनवून तिच्याच मार्फत राष्ट्रभाषेचा प्रचार केला पाहिजे. आमच्या मातृभाषेवर किंचित्‌हि आक्रमण हिन्दीकडून होणार नाहीं, याची आपण दक्षता बाळगली पाहिजे. आमच्या प्रांतांची (राज्यांची) राजभाषा त्या त्या प्रांतातील लोकांची भाषा शक्य तितक्या लौकर कशी बनेल, याचा आपण विचार व प्रयत्न केला पाहिजे. सर्व प्रकारचें शालेय व उच्च शिक्षण मातृभाषेंतून मिळण्याची त वडतोब व्यवस्था झाली पाहिजे. आमचीं प्रांतीय विद्यापीठेंहि इंग्रजीचा मोह अद्यापि सोडीत नाहींत, ही कांहीं मोठी शुभ गोष्ट नाहीं. त्यासाठीं आपण त्यांच्यावर सर्व प्रकारें दडपण आणून शिक्षणाचें माध्यम मातृभाषा हेंच बनेल, अशी व्यवस्था केली पाहिजे. तरच राजभाषेच्या आक्रमणांतून आपल्या प्रांतभाषा वांचतील. नाहींतर इंग्रजी माध्यम लौकर जाणार नाहीं व यदाकदाचित् तें गेलेंच तर इंग्रजीची जागा हिन्दी घेईल व आमच्या मातृभाषा पुनः पूर्ववत् पोरक्या व अनाथ राहातील.

राष्ट्रभाषेचा प्रचार करण्याच्या बाबतींत आजपर्यंत अितर सर्व प्रांतांपेक्षां महाराष्ट्रानेंच जास्त धडपड केली आहे. यामुळें या बाबतींत महाराष्ट्रावर विशेष जबाबदारी येऊन पडते. शिवाय मराठी प्रान्ताच्या सीमा हिन्दीभाषी प्रान्तांच्या सीमांशीं भिडलेल्या असल्यामुळें हिन्दीच्या आक्रमणाची भीति महाराष्ट्राला अितरांपेक्षां अधिक आहे. मध्यप्रान्तामध्यें अशा प्रकारें हिन्दीनें पद्धतशीर आक्रमण सुरू केल्याच्याहि बातम्या अनेक दिवसांपासून येऊं लागल्या आहेत. आजपर्यंत हें आक्रमण छुप्या स्वरूपाचें होतें. मराठी शाळा बंद पाडून त्यांच्या जागीं हिन्दी शाळा सुरू करण्यापुरतेंच तें होतें. परंतु आतां मध्यप्रदेशाची मुख्य राजभाषा हिन्दी झाल्यानें सरहद्दीवरील मराठी नामशेष होईल कीं काय, अशी भीति निर्माण झाली आहे. म्हणून हिन्दीच्या बाबतींत ज्या कांहीं योजना योजावयाच्या त्यांत महाराष्ट्रानें पुढाकार घेतला पाहिजे. लवकरच कारवारला महाराष्ट्र साहित्यसम्मेलनाचें अधिवेशन भरणार आहे. त्या वेळीं या प्रश्नाचा गंभीरपणें विचार झाला पाहिजे. मराठीवरील कानडीचें किंवा गुजरातीचें आक्रमण आपण सहज थोपवूं शकूं. पण राजभाषा आणि राष्ट्रभाषा असें दुहेरी चिलखत चढवून आक्रमण करणाऱ्या हिंदीचा प्रतिकार सहजासहजीं करतां येणार नाहीं, ही गोष्ट आपण विसरतां कामा नये.

अनुक्रमणिका

ग्रंथपरीक्षण[1] : प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर

आचार्य बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर

सुमारें बत्तीस वर्षें झालीं. तो काळ सातारा जिल्ह्यांतील सत्यशोधक चळवळीचा व ब्राह्मणांच्या घरांची होळी करण्याचा होता. तेव्हां एकदां या विषयावर खासगी चर्चा चालू असतां एक विद्वान् व विचारी म्हणून प्रसिद्ध असलेले इतिहाससंशोधक म्हणाले कीं, "हे ब्राह्मणेतर चळवळ्ये आम्हां ब्राह्मणांचा असा उच्छेद करणार असले, तर आम्हींहि मुसलमानांना मिळून त्यांच्याकडून परस्पर हा कांटा काढून टाकूं! मुसलमानांत बुद्धिज्ञानाचाच अभाव आहे, तेवढा ब्राह्मणांनीं पुरविला म्हणजे ते अल्पसंख्याक असूनहि सत्यशोधकांना पुरून उरतील!" अर्थात् हे उद्गार खासगी संभाषणांतील कांहींशा बेजबाबदार वृत्तीनें रागाच्या भरांत काढलेले होते. पण ते या स्वरूपांत उपरि-

---

१ 'लोकशिक्षणा'चे सुप्रसिद्ध संपादक श्री. गणेश गंगाधर जांभेकर यांनीं संशोधिलेल्या व संपादिलेल्या 'आचार्य बाळ शास्त्री जांभेकर (१८१२–१८४६)' यांचें 'जीवनवृत्त व लेखसंग्रह' या शताब्दी-स्मारकग्रंथाचे तीन खंड नुकतेच बाहेर पडले आहेत. पहिला खंड उपोद्घातात्मक ३९२ पानांचा असून त्यांत श्री. ग. गं. जांभेकर यांनीं गेल्या शंभर वर्षांतील (१८४६–१९४६) चरित्रसाहित्याचें सिंहावलोकन केलें आहे. दुसऱ्या खंडाचीं ३३६ पानें असून त्यांत आचार्य बाळ गंगाधर शास्त्री यांचे इंग्रजी व मराठी निवडक लेख दिले आहेत. तिसऱ्या खंडांत 'चरित्रसाहित्य (सटीक)' संगृहीत केलें असून त्याचीं ५१५ पानें आहेत. यानंतरचा चौथा खंड बाळ शास्त्र्यांचें 'चरित्र व काल' हा संकल्पित आहे.—सध्यां बाहेर पडलेला हा बाराशें पानांवरील त्रि-खंड व्यापी ग्रंथ श्री. ग. गं. जांभेकर यांच्या प्रदीर्घ व्यासंगाची, अमाप परिश्रमांची, कांटेकोर बारकाव्याची, आणि निष्ठुर सत्यान्वेषित्वाची मूर्तिमंत साक्ष असून, साहजिकच तो तज्ज्ञांच्या प्रशंसेस पात्र झाला आहे. आचार्य बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर हे 'पश्चिम भारतांतील नवयुगप्रवर्तक आणि आधुनिक महाराष्ट्राचे जनक होऊन गेले' असा श्री. जांभेकरांच्या साधार प्रतिपादनाचा निष्कर्ष आहे. प्रा. प. म. लिमये यांनीं आपल्या अभिप्रायांत म्हटल्याप्रमाणें 'इंग्रजी राजवटीच्या अगदीं प्रारंभकाळीं होऊन गेलेल्या एका थोरांत थोर महाराष्ट्रीयाला उपेक्षेच्या व अर्धवट विस्मरणाच्या सांधीकोपऱ्यांतून मृत्यूनंतर शंभर वर्षांनीं स्वच्छ प्रकाशांत आणून श्री. जांभेकर यांनीं महनीय समाजकार्य व राष्ट्रकार्य साधिलें आहे.'

आचार्य बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर यांची १०५ वी श्राद्धतिथि येत्या मे १७ ला पडत आहे. 'नवभारता'च्या या मेच्या अंकांत बाळ गंगाधर शास्त्री यांच्या पुण्यस्मरणानिमित्त श्री. जांभेकरांच्या या अपूर्व ग्रंथावर प्रा. शेजवलकर यांच्या तज्ज्ञ, शैलीदार लेखणींतून उतरलेला समीक्षणात्मक लेख वाचकांना सादर करायला मिळत आहे, या सुयोगाबद्दल आनंद वाटतो. —कार्यकारी संपादक

निर्दिष्ट गुणांच्या व्यक्तीकडून काढले गेले होते, एवढीच बाब आपणांस लक्षांत ठेवावयाची आहे. तदनंतर कांहीं वर्षांनीं दुसऱ्या एका इतिहासकाराशीं शिवकालासंबंधानें वादविवाद चालू असतां तेहि असें म्हणाले कीं, " जर औरंगजेबाच्या वेळीं सर्व हिंदुस्थान त्याच्या इच्छेप्रमाणें मुसल्मानी धर्म स्वीकारून एक मनाचें व एकमार्गी झालें असतें, तर आपल्या राष्ट्राची झपाट्यानें प्रगति होऊन व तें बलिष्ठ होऊन पाश्चात्यांच्या लोभाला बळी पडलें नसतें ! " त्यांच्या मनात त्या वेळीं आपल्या पारतंत्र्याची, फुटीची व विस्कळितपणाची चीड मुख्यत्वेंकरून होती. वृत्तीनें सुधारक, विश्वकुटुंबवादी असल्यामुळें त्यांच्या तोंडून असे उद्गार बाहेर पडले असावे.

या आठवणी सांगण्याचें प्रयोजन असें कीं, ऐतिहासिक घटनेचा विवेक किती दुष्कर आहे, ही गोष्ट वाचकांसमोर यावी. इतिहासांत मुरलेल्या माणसांची ही स्थिति, तर सामान्य जनांची गोष्ट काय बोलावी ? त्यांच्यांत प्रचलित होणारीं मतें, पुष्कळ वेळीं अशाच धाडशी विधानांचा ठसा मनावर उमटल्यामुळें, निर्माण झालेलीं असावयाचीं. समाजांत उघड बोललीं, मांडलीं, प्रतिपादित केलीं जाणारीं मतें वेगळीं, व समाजांतील गटांच्या अंतर्मनांत वावरत असलेलीं, धुडगुस घालणारीं, सत्य व खात्रीलायक वाटणारीं व भावनांचा विषय होऊन ऐन महत्त्वाच्या घटनांच्या वेळीं स्फोटरूपानें प्रकट होणारीं मतें वेगळीं, हेंहि आपण सतत लक्षांत बाळगिलें पाहिजे.

आज महाराष्ट्रांत जीं धार्मिक, सामाजिक, राजकीय, नैतिक व आतां त्यांच्या जोडीला आर्थिक मतें प्रचलित आहेत व ज्यांमुळें महाराष्ट्रसमाज विस्कळित, बेकीपूर्ण, हेव्यादाव्यांनीं भरलेला, मतामतांच्या गलबल्यानें पोखरलेला व परिणामीं कोणतेंहि कार्य करण्यास असमर्थ असा बनलेला दिसत आहे, तीं मतें पाश्चात्त्य संस्कृतीशीं आलेल्या आपल्या संबंधाचा परिपाक आहे. या मतांचे प्रवर्तक व पक्षसंस्थापक हे प्रायः कमीजास्त प्रमाणांत पाश्चात्यांच्या मतांचें अनुकरण करणारे आहेत. एका संस्कृतीचा दुसऱ्या दूरच्या संस्कृतीशीं संबंध आला असतां तिनें स्वसंस्कृति व समाज टिकविण्यासाठीं कसें धोरण स्वीकारावयाचें, हा जीवनमरणाचा प्रश्न असतो. जर त्या वेळीं योग्य ज्ञाते नेते नसले, तर त्या समाजाचें गाडें खडकाळास लागतें व त्या संस्कृतीचें भवितव्य संशयास्पद होतें. जाणूनबुजून आपण होऊन परक्यांच्या चांगल्या गोष्टी आपणांला हव्या त्या प्रमाणांत व तऱ्हेनें उचलणें वेगळें व परक्यांच्या आक्रमणामुळें त्या आपणांवर लादल्या जाणें वेगळें. आपला समाज आपली संस्कृति टरविण्यासाठीं नेहमीं स्वतंत्र ठेवणें, हें समाजांतील शहाण्या लोकांचें व नेत्यांचें काम असतें. त्यासाठीं चौफेर नजर जागरूकपणें ठेवावी लागते. हिंदुस्थानांतल्या चांगल्या गोष्टी बगदादच्या खलिफांनीं इकडून ब्राह्मण नेऊन व त्यांच्याकडून ग्रंथांचीं भाषांतरें वा रूपांतरें करवून स्वीकारल्या, तशाच पाश्चात्त्यांतील ग्रीक ऊर्फ युनानी गोष्टीहि त्यांनीं स्वीकारल्या. हिन्दी दशमानपद्धति व युनानी वैद्यक आणि राजकीय तत्त्वज्ञान, तसेंच शिस्तीची व कवायतीची युद्धपद्धति स्वीकारल्यामुळें इस्लाम जगज्जेता झाला आणि पूर्वीच्या रोमन, यहुदी, मिसरी, इराणी व हिन्दी-चिनी संस्कृतींवरहि कांहीं काळ कुरघोडी करूं शकला. पण या संस्कृतीचा व तत्प्रवर्तक लोकांचा हिंदुस्थानाशीं संबंध येऊन आतां बाराशेंवर वर्षे लोटलीं तरी, तिच्याशीं कसें वागावयाचें व तिच्यावर तोडगा काय, हें अजून हिंदवासीयांना उमगलेलें दिसत नाहीं. त्यांपैकीं निदान हिन्दी मुसलमानांना ओळखून, त्यांच्याशीं कसें वागावयाचें हें ठरवून, उपाययोजना करणारा एकमेव भारतीय पुरुष शिवाजी हा झाला. पण त्याचा मार्ग हिंदुस्थानांत समजून फैलावणें दूरच राहिलें, पण त्याच्यामागून आलेल्या मराठ्यांनींहि तो अनुसरला नाहीं. तो अनुसरला जाता तर हिंदुस्थान बलिष्ठ होण्यास, आरंभीं उल्लेखिलेल्या इतिहासकारांचा मार्ग—म्हणजे त्यासाठीं सर्व हिन्दी लोकांनीं आधीं मुसलमान होणें, हा—मनांतहि येण्याचें कारण उरलें नसतें. आज विसाव्या शतकांतहि मुसलमानांचा अन्याय्य अनुनय महात्मा गांधींनाहि करावासा वाटला याचेंहि कारण हेंच आहे—त्यामुळेंच गांधीतत्त्वांचें पालन करूं म्हणणाऱ्या

काँग्रेस-सरकारला आजहि कश्मीरप्रश्न सोडवितां येत नाहीं, इतकी चुकलेल्या ऐतिहासिक संततीची कठीण समस्या होऊन बसते !

कोणतीहि परकी गोष्ट—शुद्ध शास्त्रीय स्वरूपाची सुद्धां—आपल्या संस्कृतींत घेण्यापूर्वीं त्याचा आपल्या समाजावर काय परिणाम होणार आहे, हें वस्तुतः समाजधुरंधरांनीं पाहिलें पाहिजे. पण हल्लींच्या मनूंत तरी ते तसें करतांना दिसत नाहींत. नवीन आलेली पहिली युक्ति, पहिलें यंत्र तात्रडतोब स्वीकारून त्याची मागणी तात्रडतोब परदेशांत नोंदविली जाते असा तडाखा सुरू आहे. आपल्या समाजाची ऐपत, आपल्या समाजाचा वकूब या नव्या गोष्टी विकत घेण्याइतका आहे किंवा काय, तो नसला तर आधीं तो आणण्याची व्यवस्था करणें या गोष्टी घडतच नाहींत असें दिसतें. या नव्या सुखसोयींसाठीं आपला देश परक्यांकडे गहाण पडतो, आपलें स्वावलंबित्व नष्ट होतें व त्याचे सामाजिक व राजकीय परिणाम समाजाला भेगा जाण्यांत होतात, हें राजकीय मुत्सद्दी वा अर्थशास्त्रज्ञ लक्षांत घेतांना दिसत नाहींत. एवढे यांत्रिक सुधारणेचे द्वेष्टे महात्मा गांधी, पण त्यांचीहि देशभक्तीची व जग सुधारण्याची सर्व चळवळ आधुनिक पद्धतीनें, सर्व आधुनिक सुखसोयी अवलंबून चालविण्यांत आली. त्याचा स्पष्ट दुष्परिणाम म्हणजे आजचे हिंदुस्थानांतील दरिद्रनारायण देशी व परदेशी भांडवलवाल्यांचे गुलाम होण्यांत झाला आहे. महत्त्वाकांक्षी पुरुषांना 'याचि देहीं याचि डोळां' सर्व इष्ट गोष्टी आपल्या हातून पूर्ण झालेल्या पाहावयाची अदमनीय इच्छा असते. त्यामुळें त्यांना, सबुरी किंवा दहा अंक मोजून पाहणें हा एक गुण असतो, हें पटतच नाहीं. जर काँग्रेसच्या नेत्यांना आपल्या हातीं सत्ता घेण्याची विसाडघाई लागली नसती, तर हिंदी स्वातंत्र्याचा लढा आणखी दहा वर्षें लढून पाकिस्तानचें हीण त्यांत भस्म करतां आलें असतें. पण मग याच नेत्यांच्या हातीं सत्ता आली असती असें सांगतां येणार नाहीं ! हिंदुस्थान हा देश अनेक योग्य गोष्टी त्या त्या वेळीं न करीत गेल्यामुळें सांप्रतच्या स्थितीस येऊन पोहोंचला आहे.

किनाऱ्यावरून येणाऱ्या अरब दर्यावर्द्यांकडून नूतन इस्लामी संस्कृतीचें ज्ञान करून घेणें राहो, पण उत्तरेंत तुर्की मुसलमानांनीं बादशाही स्थापन केल्यानंतरहि त्या संस्कृतीचा कानोसा सिंघण व हेमाद्रि यांना घ्यावासा वाटला नाहीं, म्हणून महाराष्ट्र चौदाव्या शतकाच्या आरंभीं परतंत्र झाला. ज्या गोष्टी आम्ही स्वबुद्धीनें घेतल्या नाहींत त्या परक्या राज्यकर्त्यांनीं आम्हांवर लादून आम्हांस शिकविल्या. या शाळेंत महाराष्ट्राचीं तीन शतकें गेल्यावर शिवाजी जन्मला. त्यानें सर्व गोष्टींचा अंदाज बांधून या देशांत बद्धमूल झालेलें इस्लामी संकट कोणत्या युक्तीनें नाहींसें करावें त्याचा आराखडा ठरवून नवीन हिंदु संस्कृतीचा पायाहि घातला. आपल्या कामांत त्यानें पश्चिम किनाऱ्यावर नव्यानें येऊन बसलेल्या यूरोपीय संस्कृतीचीहि मदत घेतली व एका वर्धिष्णु स्वतंत्र राज्याची प्राणप्रतिष्ठा केली. पण १८ व्या शतकांत शाहू व पेशवे या अनभिज्ञ लोकांनीं मराठी राज्याचें आत्मिक व नैतिक स्वरूप न ओळखून सभोंवतालच्या मुसलमानांप्रमाणेंच एक नवें तसलेंच राज्य पुढें चालविलें. नवीन पाश्चात्त्य संकटांचा या लोकांनीं यथातथ्य विचार केलाच नाहीं व कोणतेंहि नवीन परकी संकट त्या संस्कृतींतील इष्ट भाग आत्मसात् केल्याखेरीज टाळतां येत नाहीं, हा संस्कृतीचा सिद्धान्त न ओळखून तसेंच रेटारेटीनें राज्य पुढें चालविण्याची उमेद धरली. त्यामुळें ते अंतीं पराभूत होऊन इंग्रजांचें राज्य या देशांत झालें. ज्या गोष्टी १८ व्या शतकांत शिकून घेतल्या नव्हत्या त्या आतां तरी घ्याव्या असा समय येऊन ठेपला.

या काळाच्या आरंभीं महाराष्ट्राच्या सुदैवानें मागील राजवटीचा घातक दुरभिमान ज्याला मुळींच शिवला नव्हता, असा एक पुरुष पुढें आला. पाश्चात्त्य संकट राजकीय व लष्करी उपायांनीं आतां उखडून टाकतां येणार नाहीं, याबद्दल विचारी माणसांची खात्री पटली होती. प्रथम आपणांस पाश्चात्त्य संस्कृति तिच्या शास्त्रीय अंगोपांगांसहित जाणून घेतली पाहिजे, हें या पिढीस उमगलें होतें. कोंकणांतील व विशेषतः मुंबईतील बहुसंख्य लोकांस मराठी राज्याच्या वा पेशवाईच्या अभिमानानें कधींच फारसें झपाटलें नव्हतें. येथून जे लोक देशावर जाऊन सर्व हिंदुस्थानभर पसरले, त्यांची

गोष्ट अर्थातच वेगळी. पण ते खऱ्या अर्थानें कोंकणी राहिलेच नव्हते. कोणत्याहि कारणामुळें असो, कोंकणांतील कोणत्याहि जातीचा सामान्य माणूससुद्धां इतर महाराष्ट्रांतील माणसांपेक्षां जास्त सुबुद्ध असतो. याउलट तेच लोक जसजसे मूळ प्रदेशाहून दूरदूर गेले, त्या त्या प्रमाणांत क्रमाक्रमानें बथ्थड होत गेले, असें इतिहासावरून दिसतें. हा क्रम आजतागायत सुरू आहे—पण तो आपला मुख्य विषय नव्हे. या विषयाचा प्रपंच येथें करण्याचें कारण एवढेंच कीं, त्यामुळें महाराष्ट्रांत वेगवेगळ्या वैचारिक निष्ठा निर्माण झाल्या आहेत व त्या महाराष्ट्राला विभागलेला ठेवीत आहेत. आर्थिक स्वास्थ्यामुळें वा राजकीय प्रतिष्ठेमुळें ज्यांची बुद्धि मलिन झाली नाहीं, असे लोक फक्त कोंकणांत शिल्लक राहिले होते आणि त्यांतूनच नवीन कालाचें यथार्थ आकलन होणारा पुरुष निर्माण व्हावा हें क्रमप्राप्तच म्हटलें पाहिजे.

आचार्य बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर हे ते पुरुष होत. या पुरुषाच्या मोठेपणाची जाणीव केवळ साफ बुजालेली होती असें न म्हटलें, तरी ती यथार्थपणें सर्वांच्या डोळ्यांसमोर राहिली नव्हती, ही गोष्ट खरीच आहे. गेल्या चार पिढ्यांतील जाणकार लोकांत बाळशास्त्र्यांचें महत्त्व समजणारे शहाणे पुरुष मधूनमधून होतच राहिले तरी, खंडनमंडनपूर्वक त्यांच्या चरित्राचें असाधारण महत्त्व वाचकांस सामर्थ्यानें पटवून देणारा लेखक निर्माण झाला नव्हता. तो जांभेकरकुळांतच निघावा, ही कौतुकाची तशीच चिंतनीय गोष्ट समजावी लागेल. पण हें व्हावयाला चरित्रनायकाच्या मृत्यूनंतर पुरें एक शतक जावें लागलें. ज्यांप्रमाणें विष्णुशास्त्री चिपळूणकरांचें चरित्र त्यांच्याच धाकट्या बंधूंनीं मृत्यूनंतर एक तपानें प्रसिद्ध करून आपल्या कुळाचें नांव इतिहासांत दाखल केलें, तशी गोष्ट बाळशास्त्र्यांच्या बाबतींत न झाल्यामुळें त्या पुरुषाचा मोठेपणा महाराष्ट्राला अज्ञात राहिला. हेंच काय, तर त्यामुळें ज्याचें चरित्र पुढील तरुण माणसांनीं गिरवावें, अशा एका आदर्श पुरुषाच्या कित्यास पुढील पिढ्या मुकल्यानें महाराष्ट्राचें फार नुकसान झालें, असें आम्हांस वाटतें. ज्याप्रमाणें रामचंद्रपंत अमात्यांचें चरित्र व त्याहून त्यांची राजनीति अज्ञात राहिल्यामुळें सबंध पेशवाई शिवाजीच्या खऱ्या राजनीतीस व मराठी राज्याच्या पायाभूत तत्त्वज्ञानास व इतिहासास पारखी झाली व त्याचा दुष्परिणाम राष्ट्राची गाडी वक्री होऊन पुनः शिवपूर्वकालीन राजकारणांत घोटाळत राहण्यांत झाला, तोच परिणाम गेल्या शतकांतील महाराष्ट्रावर प्रस्तुत अज्ञानाचा झाला आहे.

कारण, त्यामुळें विष्णुशास्त्र्यांचा स्वयंमन्यतेचा, खोट्या देशाभिमानाचा, वाङ्मयैकज्ञानाचा, वावदूकतेचा, अज्ञानमूलक प्रतिपक्षटवाळीचा व शास्त्रज्ञानविरहित लेखनकामाठीवर शिवाजी बनण्याचा चुकीचा आदर्श महाराष्ट्रासमोर ठेवला जाण्यास सवड मिळाली, कीं ज्याचे दुष्परिणाम आजतागायत महाराष्ट्राला बाधले आहेत व पुढें बहुतकाळ बाधतील. आपल्या देशाची व समाजाची स्थिति त्याकाळीं अभिमानाच्या गोष्टी बोलण्याची नसून मागें पडलेल्या गोष्टी भरून काढण्याची होती. शास्त्रांचें व जगाबद्दलचें अज्ञान हे आपल्या राष्ट्राचे दोन प्रमुख दोष काळानें वाढत आले होते. ते नाहींसे करण्यासाठीं प्रथम शिक्षणप्रणाली सुधारणें, जगांतील प्रमुख भाषांचें ज्ञान करून घेऊन परकीय समाजाची खरी स्थिति मुळांतूनच समजून घेणें, व नंतर आपल्या आळींत, आपल्या वाड्यांत बसून जगाची चर्चा व कुत्सित टवाळी करण्याचा व इतरांस तुच्छ लेखण्याचा, आत्मसंतुष्टतेचा व खोट्या समाधानाचा मार्ग सोडून परदेशांत जाऊन तेथल्या चांगल्या गोष्टी शिकून त्या या देशांत आणणें, हा मार्ग त्या काळीं चोखाळण्याचा होता. तो मार्ग स्वतःच्या चरित्रानें बाळशास्त्री यांनीं जसा दाखवून दिला, तसा विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रादर्शानें तो मिळण्यासारखा नव्हता ही गोष्ट, महाराष्ट्रात बद्धमूल झालेली व सबंध ब्राह्मणजातीला पछाडून तिला चुकीच्या मार्गावर नेणारी दुरभिमानी पंथनिष्ठा आजहि कबूल करण्यास राजी नसली, तरी खरी आहे, हें इतिहासानें सिद्ध केलें आहे.

बाळशास्त्र्यांचें चरित्र तरी किती अद्भुत! कोंकणांत जन्मून बालपण तेथें गेलेला एक मुलगा मुंबईस येतो काय, इंग्रजी शाळेंत दाखल होतो काय, आणि चार वर्षांत इंग्रजी भाषा आत्मसात् करून व शास्त्रीय

विषयांचें शाळेंत शिकविलें जात नसलेलें शास्त्रज्ञानहि संपादन करून बाहेर पडतो काय आणि सतराव्या वर्षीं मराठी, संस्कृत, इंग्रजी याच काय पण शिवाय गुजराती, बंगाली व फारसी याहि भाषांत प्रवेश करून घेतो काय; तसेंच अंकगणित, बीजगणित, भूमिति या विषयांत प्रावीण्य संपादितो काय ! सर्वच एकपाठीपणाचा प्रकार दिसतो. यामुळें त्यांची नेमणूकहि तावडतोब डेप्युटी नेटिव्ह सेक्रेटरी म्हणून दरमहा पन्नास रुपयांवर झाली व नंतर दोन वर्षांनीं म्हणजे एकोणिसाव्या वर्षी त्यांस शंभर रुपयांवर पूर्णाशानें नेटिव्ह सेक्रेटरी नेमण्यांत आलें. त्या काळीं ऐवढें वेतन पोक्त वयाच्या एतद्देशीय माणसासहि क्वचितच मिळत असें. ज्या बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे ते चिटणीस झाले, तिच्या कारभारीमंडळांत मुंबईतील तत्कालीन अत्युच्च यूरोपियन अधिकारी, सर्वश्रेष्ठ आणि धनाढ्य पारशी, आणि हिंदु व मुसलमान सद्गृहस्थ यांचा समावेश असे. अर्थात् समाजांतील सर्व क्षेत्रांतील नेत्यांशीं बाळशास्त्र्यांचा कार्यकारित्वाच्या दृष्टीनें आरंभापासूनच संबंध आला. बहुतेक जाडे विद्वान् पुस्तकांतील किडे, आपला विषय तेवढा जाणणारे व आपल्या विशिष्ट कामापलीकडे जगाशीं संबंध न येणारे असतात. याउलट, बाळशास्त्र्यांच्या आयुष्याचा आरंभच समाजाचा मूलभूत व आद्य प्रश्न जो शिक्षण, त्याच्या प्रवर्तक संस्थेपासून झाला. भाषाज्ञानांत त्यांचें प्रावीण्य जाणून मुंबईच्या रॉयल एशिॲटिक सोसायटीच्या पौरस्त्य-भाषांतरसीमतीचे नेटिव्ह सेक्रेटरी म्हणूनहि त्यांची याच वेळीं निवड करण्यांत आली. यामुळें त्यांचा समाजधुरीणांशीं व शिष्टांशींच नव्हे, तर विद्वान् संशोधकांशींहि घनिष्ठ संबंध आला. अति लहान वयांत भराभर मोठेपणास चढलेले न्यायमूर्ति तेलंग यांच्याशीं तुलतांहि बाळशास्त्री कमी ठरणार नाहींत व चिपळूणकरांसारखा एकांगी विद्वान् तर त्यांशीं तुलतांहि येणार नाहीं असें म्हटलें तर त्यांत अतिशयोक्तीचा दोष वाटण्याचें कारण नाहीं. कारण बाळशास्त्र्यांचा काळ युनिव्हर्सिटी-स्थापनेच्या पूर्वींचा, जेव्हां शालोपयोगी पुस्तकेंहि उपलब्ध नव्हतीं तेव्हांचा, आगगाड्या, तारायंत्र व फोटोग्राफी हिंदुस्थानांत येण्यापूर्वींचा होता, हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

तेलंगांप्रमाणें बाळशास्त्री प्रामुख्यानें केवळ विद्वान् नव्हते. समाजसेवेची वृत्ति आरंभापासूनच त्यांच्या अंगीं होती. आपल्या निर्वाहासाठीं नोकरी करून व शालोपयोगी पुस्तकें, कीं जीं त्या वेळीं अत्यावश्यक होतीं, तीं तयार करूनच ते स्वस्थ बसले नाहींत, तर त्यांनीं नवीन काळ ओळखून वयाच्या २० व्या वर्षींच मराठींतील पहिलें वर्तमानपत्र 'दर्पण' सुरू करण्याचा उपक्रम केला. पहिले चार महिने पाक्षिक व नंतर साप्ताहिक असें हें इंग्रजी मराठी वर्तमानपत्र होतें. त्याची वर्गणी सालीना २४ रुपये व ग्राहकांची संख्या पहिल्या सालअखेर सुमारें तीनशें होती. पानाचे दोन स्तंभ करून एका बाजूस मूळ इंग्रजी व दुसऱ्या बाजूस त्याचेंच मराठी रूपांतर दिलेलें असे. बाळशास्त्र्यांचें या वेळचें इंग्रजी पाहिलें तर, तें आजच्या एम्. ए. च्या तोडीचें वाटतें. विष्णुशास्त्री चिपळूणकरानीं यानंतर चाळीस वर्षांनीं निबंधमाला काढली. पण त्यांच्याजवळ स्वतःचेंच पैशांचें भांडवल होतें, तें कोंकणच्या भटाजवळ कोठून असणार ? पण मुंबईच्या अठरापगड जातींतहि आत्मीयता उत्पन्न करण्याइतकी मृदु वाणी व सौजन्य यांचें भांडवल त्यांच्याजवळ होतें. त्यामुळें बाळशास्त्र्यांचें कोठलेंच कार्य अडून राहिलें नाहीं. तसेंच त्यांच्या कोणत्याहि कृत्यांत जातीयता शिरूं शकली नाहीं. त्यांचे सहकारी हिंदु, मुसलमान, पार्शी, खिस्ती, महाराष्ट्रीय, गुजराती, कानडी सर्वच तऱ्हेचे राहिले. आठ वर्षें चाललेल्या 'दर्पणा'चे व्यवस्थापक रघुनाथ हरिश्चंद्रजी हे मुंबईकर सद्गृहस्थ होते. या उद्योगापासून त्यांना आर्थिक लाभ बहुधा झाला नसावा. कारण, अखेरीस पुरेसा लोकाश्रय नाहीं म्हणून 'दर्पण' बंद पडलें असें दिसतें. यावरून त्या काळच्या समाजांत वाचनाभिरुचि किती कमी होती व सामान्य माणसास जड अशी वर्गणी देण्याची ऐपत असणारे मुंबईतहि किती थोडे लोक होते, याचा अंदाज होतो.

त्या काळीं शिकलेले लोक सरकारला जितके हवे होते तितके उपलब्ध नव्हते. म्हणून एकाच माणसावर अनेक कामें करण्याचा प्रसंग येई. बाळशास्त्री वर्तमानपत्र एक वर्ष चालवितात तोंच सरकारनें

त्यांची नेमणूक अक्कलकोटच्या बालमहाराजांचे शिक्षक म्हणून केली व बाळशास्त्र्यांनीं ती पत्करली. त्या काळीं आगगाडी नव्हती. त्यामुळें या प्रवासास-सुद्धां महिनाभर वेळ लागत असे. ते प्रथम साताऱ्यास जाऊन तेथून अक्कलकोटास गेले. हें गुरुत्व त्यांनीं वीस महिने केलें. या नोकरीमुळें त्यांचा संस्थानी वातावरण व राजकारण यांशीं प्रत्यक्ष परिचय झाला व जुन्या मराठेशाहीचे दोष त्यांना प्रत्यक्ष अनुभवानें कळून चुकले. बहुधा हें जाणून घेण्या-साठींच त्यांनीं ही जागा पत्करलेली असावी. बाळशास्त्री विष्णुशास्त्र्यांप्रमाणें घरे, एकलकोंडे नसून प्रवासानें ज्ञान मिळविण्याचीहि त्यांस हौस होती, हें त्यांच्या चरित्रावरून समजतें. ज्यांना कोंकणस्थांच्या मायभूमींत, रत्नागिरीस राहाणेंहि असह्य झालें व फणसाचा गरा खाण्याचीहि भीति वाटत असे, त्या विष्णुशास्त्र्यांहून बाळशास्त्री अगदींच वेगळे होते. समाजांतील सर्व तऱ्हांच्या घडामोडींत प्रत्यक्ष शिरून ज्ञान मिळविण्याचा व तद्द्वारें लोकसेवा करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. सर्वांशीं मिसळण्या-मुळें बाळशास्त्र्यांना संपूर्ण महाराष्ट्रसमाजाचें जसें ज्ञान झालें होतें व त्याच्या गरजांची खरी जाणीव आली होती, तशी विष्णुशास्त्र्यांना यानंतर चाळीस वर्षांनींहि येणें अशक्य झालें. याचें कारण हा दोघांतील फरकच होय. म्हणूनच वर आम्ही धाकट्या शास्त्रीबुवांस एकांगी म्हटलें आहे. शास्त्र-ज्ञान, भाषाज्ञान व लोकज्ञान, अशीं तिन्ही अंगें बाळशास्त्र्यांनीं शक्य तितकीं आत्मसात् केलीं व आपल्या ज्ञानाचा व गुणांचा उपयोग समाजाच्या सर्वांगीण प्रगतीस व्हावा, असा हव्यास धरला. भांडारकर, रानडे, तेलंग यांच्याप्रमाणें द्रव्याचें अधिष्ठान आयुष्यांत आद्य न मानून समाजसेवेचें अधिष्ठान त्यांनीं मुख्य मानिलें. त्यामुळें त्या काळच्या मानानें चांगलेंच वेतन मिळविणारे बाळशास्त्री पदरास खार लावून घेण्याच्या आपल्या स्वभावामुळे कफल्लकच राहिले ! म्हणजे त्यांची समाजसेवा व देशसेवा हिशेबी माणसाप्रमाणें कृपण नव्हती. लक्ष्मणराव चिपळूणकरांनीं लिहिलें आहे तसा तेलंगां-प्रमाणें दोन लाख रुपये भांडवल झाल्यानंतर देशसेवेस वाहून घेण्याचा इरादा त्यांनीं धरला नाहीं किंवा अतोनात द्रव्यसंचय करणाऱ्या व 'खाऱ्या पाण्याचा समुद्र' म्हणून तत्कालीं लोकप्रसिद्ध झालेल्या राव-बहादुरांचें अनुकरण त्यांच्या पूर्वीच्या काळांतहि त्यांनीं केलें नाहीं, हें व्यक्तिमाहात्म्याचा विचार करतांना अवश्य लक्षांत ठेवलें पाहिजे.

अक्कलकोटहून बाळशास्त्री मुंबईस परत आले. कारण, त्यांची विलायतेहून येऊं घातलेल्या एल्फि-न्स्टन् प्रोफेसरांचे ॲसिस्टन्ट म्हणून नेमणूक झाली. ते नोव्हेंबर १८३४ मध्यें या आपल्या जागीं रुजूं झाले. पुढें ऑर्लेबार व हार्कनेस् हे प्रोफेसर आले, पण त्यांना योग्य असे शिष्यच मिळेनात ! कारण, पूर्वतयारी झालेले विद्यार्थींच मुंबईत फारसे नव्हते व जे अत्यल्प होते ते द्रव्यार्जनाकडे झुकत होते. या अकल्पित गोष्टीचा फायदा बाळशास्त्र्यांनीं स्वतः करून घेतला. ते स्वतः ऑर्लेबार यांचे शिष्य होऊन पाश्चात्य गणित व ज्योतिष यांत आपल्या गुरु-प्रमाणेंच प्रवीण झाले. त्यांचें वेतनहि त्यामुळें दीड-शेंचें तीनशें, पंचविसाव्या वर्षींच झालें. नंतर त्यांनीं उच्च शास्त्राध्ययन करण्यास समर्थ असे विद्यार्थी तयार करण्यासाठीं एक स्वतंत्र 'ज्यूनिअर कॉलेज स्कूल' सुरू केलें व या संस्थेचे प्रमुख बाळशास्त्री नेमले. पुढें १८४० सालीं सर्व शिक्षण 'एल्फि-न्स्टन् नेटिव्ह एज्युकेशन इन्स्टिटयूशन' या संस्थेंत केंद्रित केलें गेलें व सरकारनें 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' नव्यानेंच निर्माण करून त्याच्याकडे सर्व व्यवस्था सोंपविली. बाळशास्त्री हे विद्यालयांत वाङ्मय व विज्ञान या दोन्ही बाजूंचे विषय शिकवीत व इंग्रज शिक्षकांपेक्षां कोणत्याहि गोष्टींत ते मागें दिसले नाहींत. पुढें १८४२ सालीं प्रोफेसर ऑर्लेबार आजारी पडून विलायतेस रजेवर गेले, तेव्हां त्यांच्या जागीं दरमहा ४५० रुपयांवर ॲक्टिंग प्रोफेसर म्हणून बाळशास्त्र्यांचीच नेमणूक झाली व अशा रीतीनें अखिल हिंदुस्थानांत ते पहिले एतद्देशीय प्रोफेसर ठरले. या वेळच्या त्यांच्या शिष्यांतच दादाभाई नौरोजी, केरुनाना छत्रे वगैरे पुढें नामांकित झालेले व त्यांच्याचप्रमाणें गणिताचे प्रोफेसर नेम-लेले शिष्य होते. दादाभाईंना सत्तर वर्षांनंतरहि आपल्या गुरूचें आदरपूर्वक स्मरण होतें. बाळ-शास्त्र्यांत शिकविण्याची हातोटी विशेषच होती.

ज्ञान व बुद्धि असलेल्या सर्वच शिक्षकांत ती नसते. पण यांहून विशेष म्हणजे त्यांचें सौजन्य व त्यांची विद्यार्थ्यांबद्दलची आपुलकी. ‘ विद्या विनयेन शोभते ’ असें आपण म्हणतों, पण नामांकित विद्वान् देशभक्त व कर्ते पुरुष क्वचितच या वचनाची साक्ष पटवितात. बाळशास्त्री हे त्यांत अपवादादाखल होते.

हें सर्व सरकारी काम सुरू असतांना ‘ दर्पण ’ साप्ताहिकांत लिहिण्याचें व ग्रंथलेखनाचें त्यांचें कार्य चालूंच होतें. चुरचुरीत लेख न लिहितां ज्ञानपर व बोधपर लेख लिहिणाऱ्या बाळशास्त्र्यांचें लिखाण लोकप्रिय झालेलें दिसत नाहीं. पैशाच्या दृष्टीनें खर्चाची तोंडमिळवणी तरी होत होती कीं नाहीं याची शंका. त्यांनीं स्वतः कधीं याबद्दल चकारशब्द काढला नाहीं. पण त्यांच्या मृत्यूनंतर लिहिलेल्या लेखांत ‘ ज्ञानोदया ’नें तसें स्पष्ट म्हटलें आहे. तरीहि त्यांनीं वाचकांचा अखेर निरोप घेतांना दिलेल्या मदतीबद्दल त्यांचे आभार मानून, आपल्या लेखनानें आपण एकहि मित्र गमाविला नाहीं, असें समाधानानें म्हटलें आहे व केलेल्या कार्याचा धाकट्या शास्त्रीबुवांप्रमाणें आत्मश्लाघापर शब्दांत गर्व न दाखवितां, पत्राचा हेतु जो अशा तऱ्हेच्या लिखाणाबद्दल लोकाभिरुचि उत्पन्न करणें व धर्म आणि राजकारण यांबद्दलच्या समजुती सुधारणें व प्रगत करणें, या किती सिद्धीस गेल्या तें सांगण्याचें काम लोकांवरच सोपविलें आहे. कार्याबद्दल निरभिमान हें जर लोकसेवावृत्तीचें खरें गमक मानिलें तर, बाळशास्त्र्यांच्या लोकसेवेमागील वृत्ति, विनय व सौजन्य यांचें दुसरें कोणतें उदाहरण पाहिजे ? इंग्रजी राज्याबद्दल आपण कोणती वृत्ति धारण केली पाहिजे व त्याचा फायदा कोणत्या रीतीनें करून घेतला पाहिजे यांचें कथन त्यांनीं कायावाचामनें-लेखनें केलें. ‘ दर्पण ’ बंद झाल्यानंतर त्यांनीं वर्तमानपत्री धंदा त्यांचे सहायक मित्र भाऊ महाजन यांकडे सोपवून स्वतः ‘ दिग्दर्शन ’नामक मासिक सुरू केलें. त्यांतहि टीकात्मक लिखाणापेक्षां ज्ञानप्रसाराचाच हव्यास त्यांनीं धरला. ‘ दिग्दर्शना ’च्या प्रस्तावनेंतच त्यांनीं आपल्या जुन्या विद्या व शास्त्रें व आधुनिक पाश्चात्त्य ज्ञान यांतील फरक सांगितला आहे. ‘ आपल्या जुन्या ज्ञानाचा मुख्य हेतु परमार्थसाधन हा होता, तर पाश्चात्त्यांच्या ज्ञानाचा हेतु इहलोकींची सोय हा आहे. विद्या ही श्रीमंतांस भूषण, गरीबांस पोटाचें साधन, तरुणांस उत्तम उद्योग, वृद्धांस विश्रांति आणि सर्वांस मोक्षप्राप्तीचा उपाय होय ’ असें ते सांगतात. चित्रें, नकाशे, आकृति घालून विषय सुबोध करण्याचा प्रकारहि त्यांनीं आपल्या लेखनांत अवलंबिला होता. एवंच, पाश्चात्त्य ज्ञानांत आधुनिक महाराष्ट्राचा प्रवेश करून देण्याची पायाभूत कामगिरी त्यांनीं केली. अर्थात्, त्यांस आधुनिक महाराष्ट्राचे जनक व पश्चिम भारतांतील नवयुगप्रवर्तक असें जें ग्रंथलेखकांनीं संबोधिलें आहे, तें सार्थ नव्हे असें कोण म्हणेल ?

याच वेळीं बाळशास्त्री ह्यांना मुंबईचे जे. पी. नेमून सरकारनें त्यांचा गौरव केला. त्या वेळीं हा एकच बहुमानाचा प्रकार या देशांत रूढ होता. हा बहुधा समाजांतील श्रीमंत पुढारी यांनाच देण्यांत येत असे. एतद्देशीयांत जातवारीनें पाहातां, पारशी हे त्यांत बहुसंख्य; व मुसलमान हिंदूंहून लोकसंख्येनें किती तरी कमी असतां त्यांचेहि प्रतिनिधी जवळजवळ हिंदूंइतके नेमण्यांत येत. अगदीं प्रथम १८३४ सालीं सरकारनें जे. पी. नेमले त्यांत तेरांतील नऊ पारशी व दोनच हिंदू-जगन्नाथ शंकरशेट व धाकजी दादाजी-दोन मुसलमानांबरोबर नेमले होते. नंतर १८४० सालीं नवे दहाजण नेमले त्यांतहि पांच पारशी, दोन मुसलमान व तीन हिंदू—बाळशास्त्री, श्रीमंत विनायकरावशास्त्री पटवर्धन व मनमोहनदास देवीदास-हे होते. पहिल्या नेमणुकींत गुजराती हिंदु श्रीमंत नव्हता. म्हणजे इतकें त्यांचें महत्त्व मुंबई शहरांत कमी होतें. या सर्व गृहस्थांमध्यें बाळशास्त्र्यांखेरीज इतर थोर कुळ, द्रव्यमत्ता वा जातीचें पुढारीपण या तत्त्वांवर नेमलेले होते. बाळशास्त्री मात्र केवळ वैयक्तिक गुणांवर नेमलेले पहिले पुरुष समजले पाहिजेत. सर्व क्षेत्रांतील बाळशास्त्र्यांची लोकसेवा हेंच त्यांचें सामाजिक अधिष्ठान होतें. बाळशास्त्र्यांनीं १७ व्या वर्षी केलेल्या अर्जांत सहा भाषा ज्ञात असल्याचें म्हटलें आहे. त्यांची संख्याहि पुढें वाढतां वाढतां अखेरीस दुप्पट झाली. लातिन, ग्रीक व फ्रेंच या पाश्चात्त्य भाषा व कानडी, हिंदु-

स्तानी व अरबी याहि भाषा त्यांनीं परिचित करून घेतल्या होत्या. मुंबईची रॉयल एशिॲटिक सोसायटी त्या काळीं युरोपीयांचीच संस्था होती. तरीहि तिच्या संशोधनकार्यांत बाळशास्त्र्यांनीं भाग घेतला व कांहीं ताम्रपट उतरून प्रसिद्ध केले. एतद्देशीयांत हेंच असलें काम करणारे पहिले असून भाऊ दाजी, मंडलिक, भांडारकर, तेलंग हे नंतरचे होत. तसेंच जिऑग्रॅफिकल सोसायटीची जी शाखा मुंबईस होती तिचे ते सदस्य व कारभारीमंडळाचे पदाधिकारी होते व तिच्या शोधक शाखेंत त्यांनीं भाग घेतला होता. प्रवास करून प्राचीन स्थळें पाहाणें व तेथील शिलालेख व ताम्रपट आदि गोळा करणें या गोष्टी त्यांनीं केल्या. त्यांची शेवटची नोकरी नवीन स्थापन केलेल्या अध्यापकवर्गाचे डिरेक्टर म्हणून झाली होती व अशा रीतीनें मुंबई इलाख्यांतील पहिला मराठी, गुजराती व कनडी अध्यापक वर्ग योग्य रीतीनें निर्माण करण्याचें कठिण श्रेयहि त्यांनीं मिळविलें. यांतील मुलांसाठीं एक विद्यार्थिवसतिगृहहि त्यांनीं चालू केलें होतें व तेथील शिस्त ते जातीनें पाहात असत. पण दुर्दैवानें हें काम त्यांनीं फक्त एकच वर्ष केलें. प्रोफेसरीचें काम करीत असतांना दक्षिण विभागांतील शाळांच्या परीक्षकाचें व तपासनिसाचें काम त्यांनीं चार वर्षें केलें होतें. त्या काळीं आगगाडी झाली नसल्यामुळें हा लांबचा प्रवास बैलगाडी, टांगे, मेणे यांतून व कित्येक वेळां पायींच होत असे. मुंबई शहरांतील प्राथमिक शाळांच्या तपासणीपासून अत्युच्च एल्फिन्स्टन् प्रोफेसराच्या जागेपर्यंतची सर्व शैक्षणिक कामें बाळशास्त्र्यांनीं स्वतः केलीं असल्यामुळें व या गोष्टींत त्यांस प्रेम व उत्साह वाटत असल्यामुळें शिक्षणशास्त्रांतील ते तज्ज्ञ बनले असल्यास नवल नाहीं. अर्थात्, अशा गुरुबद्दल दादाभाईप्रभृति अनेक शिष्यांनीं त्यांची शिक्षणपद्धति आठवून पुढें चांगले उद्गार अनेक वर्षांपर्यंत काढले, यांत आश्चर्य कसलें ?

शास्त्रीबुवांचें ग्रंथकर्तृत्व त्यांच्या सबंध हयातभर चालूंच होतें. अर्थात् या ग्रंथकर्तृत्वाचें स्वरूप त्या काळीं भाषांतर-रूपांतररूप असणें अपरिहार्य होतें. दादोबांच्या पूर्वींच बालव्याकरणापासून सुरुवात करून नीतिकथा, सारसंग्रह, भूगोलविद्या, इंग्लंड देशाची बखर, भूगोलशास्त्र (गणित-भाग), इंग्रजी व्याकरण, एल्फिन्स्टनच्या मुसलमानी रियासतीचें संक्षिप्त रूपांतर, हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास, शून्यलब्धिगणित, मूलपरिणतिगणित, समीकरणाविषयींचीं टिपणें, ज्ञानेश्वरी, पुनर्विवाहप्रकरण व मानसशक्तीविषयींचे शोध वगैरे अनेक विविध विषयांवर त्यांनीं सुबोध लेखन करून महाराष्ट्रांतील शिक्षणप्रणालीचा पाया घालण्यांत मुख्य भाग घेतला. ज्योतिषविषयक व गणितविषयक परिभाषा त्यांनीं एतद्देशीय प्रतिशब्द तयार करून नव्यानेंच रचिली. शून्यलब्धि ही अशीच संज्ञा होय.

इंग्रजांच्या शेजारीं उभें राहाण्यास शास्त्रमत्तेनें आपली पायरी चढेपर्यंत त्यांच्याशीं आपले सबंध सलोख्याचे व गोडीचेच ठेवले पाहिजेत, असें बाळशास्त्र्यांचें स्पष्ट मत दिसतें. अभिमानानें भांडण उकरून काढण्याची व प्राचीन अभिमानावर तत्कालीन इंग्रजांस ‘ तागडीतुक्ये ’ म्हणून हिणविण्याची पुणेरी वृत्ति त्यांच्यांत नव्हती. मग याला कोणी स्वाभिमानाचा व देशभक्तीचा अभाव म्हणेल तर म्हणो ! त्या काळास अनुरूप असे ते राजकारणी व समाजसुधारक पुरुषहि होते. पहिल्या वर्षींच्या ‘ दर्पणां ’त रेव्हरंड विल्सनसारख्या मिशनरी माणसाचे इंग्रजी लेखहि संपादून प्रकाशित करणारे बाळशास्त्री, मिशनऱ्यांच्या अज्ञधर्मपरिवर्तनास विरोध करण्यास मागें सरले नाहींत. श्रीपत शेषाद्रि या लहानग्या मुलाच्या सुटगुकीसाठीं व शुद्धीसाठीं त्यांनीं पदरमोड करून कोर्टदरबार करविले व त्यास सोडवून व पूर्वांगप्रायश्चित्त देऊन पूर्णशुद्धीसाठीं काशीस रवाना केलें. या त्यांच्या उपक्रमामुळें अखिल ब्रह्मवृंद खळबळून गेला होता. कांहीं सुजाण शास्त्री व जगन्नाथ शंकरशेट आणि ब्रिवलकर दिवाणजी यांसारखे कांहीं पुढारी त्यांस अनुकूल होते, तरी बहुसंख्य ब्रह्मवृंदाकडून त्यांच्यावर वाळी घालण्यांत आली. सनातनी ब्राह्मणांनीं बाळशास्त्री व त्यांचें सहायक यांस ‘ सरकारचाकरशास्त्री ’ असा टोमणा मारणारा किताबहि दिला ! जणूं इंग्रज सरकारची ख्रिस्ती माणसाला हिंदु करून घेण्यांत फूस होती ! केवळ ब्राह्मणच नव्हत, तर ‘ परभू

शेणवी व सोनार ' हेहि या शुद्धीमुळें ब्राह्मणांची निर्भर्त्सना करीत होते व त्यांचे पुढारी धाकजी दादाजी होते. या खळबळींत शास्त्र्यांचे परभूतट व शास्त्रीतट असे दोन भेद पडले होते. मुख्य कार्य सिद्धीस गेल्यावर बाळशास्त्री हटाग्रही नव्हते याचें निदर्शक त्यांचें पुढील वर्तन झालें; म्हणजे त्यांनीं पूर्ण शुद्ध न झालेल्या ख्रिस्ती माणसाशीं आपला संसर्ग घडला या दोषाबद्दल ' विष्णवे नमः ' म्हटलें, म्हणजे प्रायश्चित घेतलें. शुद्धीप्रमाणें पुनर्विवाहविषयक वादाचाहि बाळशास्त्र्यांनीं पुरस्कार केलेला दिसतो. पण प्रत्यक्ष पुनर्विवाह झालेला नसल्यामुळें तो केवळ धार्मिक वादच त्या काळीं होता.

बाळशास्त्री ता. १७ मे १८४६ रोजीं प्रवासांत सुरू झालेल्या व वेळींच योग्य उपचार न झाल्यामुळें वाढलेल्या विषमज्वरास बळी पडले. त्यांच्या मृत्यूनंतर जे लहान-मोठ्यांचे उद्गार बाहेर पडले त्यांवरून या पुरुषाचें तत्कालीन स्थान उत्तम दिसून येतें. सर अर्स्किन् पेरी या मुख्य जज्जानें, ' बाळशास्त्र्यांच्या मृत्यूमुळें पश्चिम हिंदुस्थानची हानि झाली आहे, तशी हानि यूरोपीय वा हिंदी दुसऱ्या कोणत्याहि माणसाच्या मृत्यूनें झाली नसती ', असे उद्गार काढले. पार्शी, गुजराती व इंग्रजी तसेच ख्रिस्ती मिशनरी वर्तमानपत्रांनींहि अशाच तऱ्हेचे उद्गार काढून आपला शोक व्यक्त केला होता. अकस्मात् मृत्यूनें व बाळशास्त्र्यांच्या वदान्यतेमुळें उघड्या पडलेल्या त्यांच्या बायकोस व मुलांस याच इंग्रज गृहस्थाच्या सूचनेवरून पेन्शन देण्यांत आलें, इतकी त्यांची गोष्ट विशिष्ट समजण्यांत आली. अशा पुरुषाला जर पुढील महाराष्ट्र विसरला असला व समाजेतिहासांतील योग्य स्थान त्यांना न देतां त्या गोष्टीचा अवस्त्वारोप इतर पुरुषांवर करीत असला, तर तो गाजरपारखीच झाला असें म्हटलें पाहिजे !

अशा या अद्वितीय पुरुषाचें संपूर्ण कर्तृत्व लोकांसमोर हुडसूनखडसून मांडण्यासाठीं अनेक वर्षें अपूर्व मेहनत घेऊन व त्यांच्या चरित्राचीं साधनें तळघरांतून शोधून काढून विचारी जनतेपुढें प्रस्तुत ग्रंथांत मूळ स्वरूपांत ठेवण्यांत आलीं आहेत. असें करतांना जें इतिहाससंशोधन करावें लागलें, तें सर्व करून उदाहरणपद्धतीनें वाचकांच्या संशयनिवृत्तीसाठीं पुनरुक्तिदोष स्वीकारूनसुद्धां त्या त्या जागीं सिद्ध करून दाखविण्यांत आलें आहे. या ग्रंथाचें स्वरूप हें केवळ बाळशास्त्री असें न राहातां ' बाळशास्त्री व त्यांचा काळ ' या स्वरूपाचें झालें आहे. म्हणजे या ग्रंथाला अव्वल इंग्रजींतील ' महाराष्ट्राच्या इतिहासाचीं साधनें ' असें नामाभिधान अयोग्य ठरणार नाहीं. ग्रंथाची रूपरेषा एखाद्या विषयावरील प्रबंध व त्याचीं आधारभूत साधनें अशी आहे. गेल्या शंभरांवर वर्षांत बाळशास्त्र्यांसंबंधानें ज्या ज्या कोणी लहानमोठे उद्गार काढले व लेखनाविष्ट केले, त्या सर्वांची सटीक छाननी स्वतंत्र उपोद्घात लिहून सोदाहरण करण्यांत आली आहे. मराठी वाङ्मयेतिहासाचा एक उभा छेद या उपोद्घातांत दृष्टीस पडतो व त्यावरून महाराष्ट्रांतील विद्वानांची, साहित्यिकांची व लेखकांची एकतऱ्हेची परीक्षा आपोआपच होऊन जाते. यांत गत आणि हयात असे सर्वच लेखक आले असून त्यांत लहान-मोठा, मित्र-अमित्र, असा कोणताच भेद करण्यांत आलेला नाहीं. मृत लेखकांच्या लेखनाचे वाभाडे अशा तऱ्हेनें काढावे किंवा काय असा विचार कोणांस सुचेल; पण इतिहासदृष्टीनें पाहातां त्यांत कांहीं गैर वाटूं नये. अशा गोष्टी नित्य व प्रत्येकानें करण्याच्या नसतात. तसें झाल्यास तें वाङ्मयदूषण ठरेल. पण सर्वांचा राग ओढवून घेऊन इतिहाससंशोधन व भाषाशुद्धि यांबाबत मराठी लेखकांची हजेरी एकदां कोणी तरी कोणत्यातरी प्रसंगानें कोठें तरी घ्यावयास पाहिजे होती. ती एकवार या ग्रंथांत घेतली गेल्यानें ग्रंथकाराविषयीं कांहींहि मत झालें, तरी त्यामुळें महाराष्ट्रवाङ्मयाचें हितच साधेल, यांत आम्हांस शंका वाटत नाहीं.

प्रस्तुत शताब्दीग्रंथ गेलीं पांच वर्षें छापला जात असल्यामुळें त्यांतील लहानमोठे भाग व विशेषतः हा विद्वज्जनपरीक्षक उपोद्घात बऱ्याच व्यक्तींच्या अवलोकनांत येऊन त्यांचा राग ग्रंथलेखकास थोडाबहुत बाधला असल्याचें आमच्या कानांवर आलें आहे व पंतप्रधान खेर यांच्या पुरस्कारांत त्याचा उल्लेख नापसंतीदर्शक शब्दांत व्यक्त झाला आहे. म्हणून या विषयाचें येथें थोडें सविस्तर विवरण अस्थानीं ठरणार नाहीं. ज्या तऱ्हेची बाळशास्त्री-

विषयक लिखाणाची छाननी उपोद्घातांत करण्यांत आली आहे, तशी ती करण्याचें आमच्या स्वतःच्या मनांत कधीं आलें असतें, असें आम्हांला खास वाटत नाहीं. प्रस्तुत ग्रंथाचे लेखक श्री. ग. गं. जांभेकर यांनीं जर आम्हांस याबाबत पूर्वी पुसलें असतें, तर आम्ही त्यांस असें लिहिण्यास उत्तेजन दिलें असतें असेंहि नाहीं. आधीं बिलकुल सुगावा लागूं न देतां छापील लेख ग्रंथकारांनीं आम्हांपुढें ठेवला ! यांत त्यांचा हेतु आमच्यापुरता व्यक्तिविषयक असावा, कारण आम्हांसहि त्यांनीं या छाननींत वगळलेलें नव्हतें ! आमच्या लेखांत आमचा हेतु लिहितांना काय होता, याचें संपूर्ण ज्ञान आम्हांस असल्यानें व्यक्तिशः आमच्यापुरता अन्याय जांभेकरांच्या छाननींत झाला आहे, असें आमचें मत आहे. विशेषतः खासगी संभाषणांत आधीं सर्व बातमी काढून घेवून नंतर त्या माहितीचा उपयोग आम्हांविरुद्ध पुराव्यांत करून घेणें यास काय म्हणावें हें आम्हांस कळत नाहीं. प्रत्येक वर्तमानपत्राचा दरेक अंक विद्वानांकडूनहि पाहिला जातो, असें गृहीत धरण्यांत जांभेकरांची भूल होत आहे. माझ्यावर टीका करीत असलेले 'विविधवृत्ता'चे अंकहि मी सर्व पाहिलेले नाहींत. 'दर्पणा'चे अंक रेकॉर्डमध्यें जावून मी शोधले नाहींत;कारण, मराठी वर्तमानपत्रांचा इतिहास लिहिण्यास मी निघालों नव्हतों. यदृच्छया अवलोकनांत आलेल्या वर्तमानपत्रांपुरताच मी बोलत होतों. असतु. श्री. जांभेकरांची लिहिण्याची, बोलण्याची व वागण्याची रीत त्यांच्या व्यक्तित्वानें संपूर्ण दर्शन घडविते व प्रस्तुत ग्रंथानें जसें बाळशास्त्र्यांचें तसेंच ग्रंथकाराचेंहि स्वरूप डोळ्यांसमोर उभें राहाण्यास अडचण पडणार नाहीं हें स्पष्ट आहे.

असें असलें तरी, या उपोद्घातासारखी छाननी अनेक विषयांत यापूर्वींच होणें जरूर होतें कीं, जेणें करून अनेक घर करून बसलेले लोकभ्रम उद्ध्वस्त होवून आमचें समाजजीवन निर्मळ होतें व आरोग्याच्या मार्गास लागतें. ज्याप्रमाणें रोग शरीरांत निर्माण झालेलीं विषें बाहेर टाकण्यासाठीं निर्माण होतात, त्याचप्रमाणें वाङ्मयीन टीकेचें प्रयोजन समजलें पाहिजे. पण ती अर्थातच सरळ मनांच्या माणसांकडून झाली पाहिजे आणि सरळपणा ही कल्पनागम्य सरळरेषेप्रमाणें साहित्यिकांत दुर्मिळ वस्तु आहे. असा सरळपणा बाळशास्त्र्यांच्या काळीं होता, पण तो लोकप्रिय किंवा फायदेशीर नव्हता. म्हणून त्याला लोकछंदानुवर्तित्वाचें रूप देवून तो यशस्वी व फायदेशीर करण्यांत आला. यांत बावदूकपणानें सत्याची असत्याशीं अशी भेसळ करण्यांत आली कीं, त्यांत सत्य कोठें पार लोपून गेलें ! विष्णुशास्त्री चिपळूणकर हे या नवीन तंत्रज्ञांचे मुकुटमणी होत. हिंदुस्थानांतील ब्राह्मणजातींत गेल्या दोन हजारांवर वर्षांत असे लोक बरेच होऊन, त्या त्या वेळीं त्यांनीं सत्य नाहींसें करण्यांत यशहि मिळविलें, असें इतिहासावरून दिसतें. एरवीं अशोकासारख्या राजाचें व बुद्धाला दश अवतारांत घेऊनहि त्याच्या धर्माचें नांव हिंदुस्थानांतून कसें नायनपेट करण्यांत आलें, याचा बोध होत नाहीं. न जाणो, कोणी अशोकाचे शिलालेख वाचून बदलेल, म्हणून ते वाचण्याची कलाहि हिंदुस्थानांतून हांकून लावण्यांत आली ! इतकी कीं, गेल्या शतकांत इंग्रजांनीं पुनः शोधून काढीपर्यंत तिच्या अस्तित्वाचा थांगहि या भरतभूमींतील अहंमन्य व सर्वज्ञ ब्राह्मणांत उरला नव्हता ! ज्यांनीं असे पराक्रम केले, त्यांनीं गरीब व सालस बाळशास्त्र्यांचें नांव दडपून टाकण्यांत यश मिळविलें, यांत अपूर्व तें काय ? सबंध ब्राह्मणजातीच्या या देशांतील इतिहासाचाच तो एक चालत आलेला भाग आहे.

जर चिपळूणकरांच्या लिखाणाची जांभेकरांप्रमाणें छाननी करण्यांत आली असती, तर त्याच्या दुष्परिणामांपासून महाराष्ट्र बचावला असता व त्याचें खरें स्वरूप लोकांसमोर येवून या नूतन साहित्यपंथाचें बूड स्थिरावलें नसतें. 'श्रीवर्धनकर कुळकर्ण्यांचा पणतू शहाजहानच्या तक्तावर बसला' या ऐतिहासिक थापेपासून या नूतन साहित्यिक बंडाची सुरवात करण्यांत आली. चाळीस हजार लोक जमवून वसईस चार हजार परक्या पोर्तुगीजांचा पराभव करणें वा तितक्याच मोठ्या फौजांनीं इंग्रजांच्या तेवढ्याच लहान फौजेचा स्वतःच्या दारांत पराभव घडविणें या नांव घेण्यासारख्या ऐतिहासिक गोष्टी ठरविण्यांत आल्या ! 'राजनीति म्हणजे दुसऱ्याचें पागोटें घेण्याची विद्या' अशी

अनुक्रमणिका

त्याख्या सांगण्यांत आली व ' या देशास कांहीं एक झालेलें नाहीं ' असें निदान करण्यांत आलें ! ' हल्लीं जी आमच्या राष्ट्रास विपत्तीची स्थिति प्राप्त झाली आहे, ती आमच्या अंगच्या कांहीं अनिवार्य दोषांमुळें आली नसून, ती यदृच्छया कोणत्याहि राष्ट्रास येण्यासारखी आहे...... आमचें दैव फिरल्यामुळें हल्लींच्या अवस्थेंत आम्ही येवून पडलों आहों...... कालगति विचित्र आहे. त्या वैचित्र्यांतीलच आमची प्रस्तुतची स्थिति आहे ' असें दीर्घ इतिहासाध्ययनांतून सार निघालें ! पण हें सांगावयास शास्त्रीबोवा नको होते. हिंदुस्थानांतील अज्ञांतील अज्ञ याच समजुतीवर आपली निष्ठा ठेवून आजवर जगत आला आहे.

रानडे-महाजनीप्रभृति ज्या अनेक लोकांस विष्णुशास्त्र्यांची विचारसरणी पटत नव्हती, त्यांनीं वरील विचारमुक्तावलीची परीक्षा न करुन दाखविल्यामुळेंच ती खोटी प्रणाली खरी ठरली व तिचे परिणाम महाराष्ट्रास भोगावे लागत आहेत. आणि म्हणूनच प्रस्तुत ग्रंथांत श्री. जांभेकरांनीं केलेलें उद्घाटन आम्हांस अनिष्ट वाटत नाहीं. कारण, महाराष्ट्रसाहित्यिकांचा जो परिचय आम्हांस आहे, त्यावरुन पुरें माप प्रत्येकाच्या पदरांत घातल्याशिवाय ते कोणतीहि गोष्ट कबूल करतील, वावदूकपणा करुन पुन: फांटे फोडणार नाहींत, असा विश्वास आम्हांस नाहीं. उलट, इतकें करुनहि त्यांच्या अहंगंडाचे चाळे बंद पडतील किंवा काय, याचीच शंका आहे. हल्लीं महाराष्ट्रांत विद्वान् हा शब्द इतका स्वस्त झाला आहे कीं, आतां अविद्वान् म्हणण्यास कोण उरला, असें म्हणण्याची पाळी आली आहे ! इतिहासांत नांव दाखल होण्यास कोणते गुण अवश्य मानावे याचा विवेक इतिहासकारास करावा लागतो. पुष्कळ वर्षांपूर्वीं एक इतिहाससंशोधक म्हणाल्याचें स्मरतें कीं, " काय, तुम्ही ' शिवाजी ' ' शिवाजी ' सारखें चालविलें आहे ! शिवाजीचें राज्य तें केवढें आणि त्याचें स्तोम एवढें ! पेशवे नानासाहेब यांच्या राज्याचा विस्तार सिंधुनदापर्यंत पसरला, तरी तुम्ही शिवाजीच्या चतुर्थांश वेळहि त्यांच्या गुणसंकीर्तनाला देत नाहीं ! "

बाळशास्त्र्यांना त्यांचें योग्य स्थान प्राप्त करुन देऊन त्यांची स्मृति जागृत करावी व ती कायम राहावी म्हणून कांहीं स्मारकयोजनाहि सिद्ध व्हावी, असा प्रस्तुत ग्रंथ लिहिण्यांत ' लोकशिक्षण 'कार जांभेकरांचा हेतु आहे. तो सारखा डोक्यांत संचार करीत असल्यामुळें आपल्या हेतूच्या सिद्ध्यर्थ आलेली कोणतीहि संधि ग्रंथकार हातची जाऊं देत नाहींत. त्यामुळें या इष्ट गोष्टीचें वेगवेगळ्या प्रसंगांनीं बरेंच चर्वितचर्वण प्रस्तुत ग्रंथांत झालें आहे व तो एक ग्रंथदोष गणला जाईल. ग्रंथकार बहुभाष आहेत. विशेषणाची खैरात करण्याचा त्यांचा स्वभाव आहे. सूत्रमय लेखनपद्धति त्यांस मंजूर नाहीं. इंग्रजी-मराठी दोनहि बाजू देण्याच्या हव्यासामुळें एक प्रकारची द्विरुक्ति सर्व ग्रंथभर पसरली आहे. या वाङ्मयदोषाचा संशोधनकार्यप्रचारास उपयोग होण्यासारखा आहे. पण पुष्कळ वेळीं खरी व इष्ट गोष्टहि कंटाळा येण्याइतक्या पद्धतीनें सांगण्यानें ऐकणाराच्या मनावर विपरीत परिणाम होण्याचा संभवहि थोडा नसतो व व्यवहारांत या गोष्टीचे अनिष्ट परिणाम होतात, हें विसरुन चालणार नाहीं. तशी कांहींशी भीति आम्हांस वाटते.

या ग्रंथाच्या तीन खंडांपैकीं पहिल्यांत पंतप्रधान खेर व ना. जयकर यांचे इंग्रजी पुरस्कार, ग्रंथकर्त्याचें आत्मनिवेदन व सुदीर्घ उपोद्घात असून खेरीज बाळशास्त्र्यांचीं इंग्रजी-मराठी छोटीं चरित्रें आहेत. दुसऱ्यांत बाळशास्त्र्यांच्या लेखनांतील इंग्रजी मराठी वेंचे व त्यांच्या दोन्हीहि भाषांतील सूचना आहेत. ग्रंथांचें स्वरुप लक्षांत येण्यासाठीं त्यांच्या मुखपृष्ठांचे ब्लॉकमुद्रा यांत छापले आहेत. मराठी नियतकालिकांचा आरंभ कसा झाला व आरंभीं गद्यरचना कशी असे, याचें स्वरुप यांवरुन कळतें. तिसऱ्या खंडांत, बाळशास्त्रीविषयक सर्व उल्लेख, त्यांच्या चरित्रांतील घडामोडींवर प्रकाश टाकणारा अस्सल पत्रव्यवहार, त्यांचे शिष्य नागपुरचे भवाळकर यांनीं लिहिलेल्या आत्मचरित्रांतील बाळशास्त्री व त्यांचे सहकारी भाऊ महाजन यांबद्दलचे सटीप उतारे, तसेंच शास्त्रीबोवांच्या गणितज्योतिषविषयक लेखनाचे मूळ नमुने वगैरे बहुमोल साधनांचा संग्रह आहे. हा अव्वल इंग्रजींतील इतिहासाचा भाग

होय. त्या काळाची कल्पना येण्यासाठीं व निःशंकता निर्माण करण्यासाठीं मूळांचे ब्लॉक्स, कांहीं थोर सद्गृहस्थांचीं दुर्मिळ छायाचित्रें वगैरे देण्यांत आलीं आहेत. एखाद्या गोष्टीचा छडा कसा लावावा, संशोधकीय बारकावा कसा घ्यावा इत्यादि गोष्टींचे धडे विद्यार्थ्यांस जांभेकरांच्या लेखनावरून मिळूं शकतील. याच दृष्टीनें या ग्रंथाचें महत्त्व विशेष आहे. स्वतः विशेष संशोधन न केलेल्या व मुख्यतः पदामुळें विद्वान् या संज्ञेस पात्र झालेल्या लोकांचेहि स्मृतिग्रंथ प्रसिद्ध होण्याचा प्रस्तुत काळ आहे. पण दुसऱ्यांच्या लेखांनीं स्वतांची स्मृति चिरजीवी करण्याची अपेक्षा प्रस्तुत ग्रंथकारांनीं ठेवलेली नाहीं. त्यांच्या या ग्रंथानेंच त्यांनीं आपलें स्मारक स्थापन केलें आहे. जेथें ग्रंथकाराचें स्मारक होतें तेथें वर्ण्य व्यक्तीचें स्मारक झाल्यावांचून कसें राहील? या ग्रंथानें बाळशास्त्री जांभेकरहि आद्य अष्टपैलु विद्वान्, गणितज्योतिषज्ञ, पुराणेतिहाससंशोधक, फर्डे इंग्रजी लेखक, सर्वांगीण शिक्षणतज्ज्ञ, हिंदुस्थानांतील पहिले प्रोफेसर, मराठी वर्तमानपत्र-व-मासिक-कार, इतिहासलेखक, व्याकरणकार, समाजसुधारक, शुद्धिकार्यकर्ते, धर्मनिर्णयकर्ते, राजकारणी व राजदरबारी पुरुष व पश्चिम हिंदुस्थानांतील पहिल्या आधुनिक पिढीचे गुरु म्हणून निःसंदेह ज्ञात होतात व होत राहातील. त्यांचें दृश्य व उद्घोषक स्मारक जर याउपरहि महाराष्ट्रानें करण्याचें नाकारलें, तर तो त्याचा, साठ वर्षांपूर्वींच शास्त्रीबोवांच्या एका सहाध्यायानें म्हटल्याप्रमाणें काळिमा ठरेल! ज्याचें स्मारक झालें पाहिजे असें तत्कालीन गुजराती, पारशी पत्रांनीं सुचविलें होतें तें कां होवूं शकलें नाहीं, याचा विचार समाजेतिहासदृष्ट्या चिंतनीय आहे व तेणेंकरून इतिहासविकृतीचें उत्तम आविष्करण होवूं शकेल. ज्याप्रमाणें शिवाजीचें स्मारक न करतां एखाद्या पेशव्याचें केलें म्हणून ऐतिहासिक महाराष्ट्राचा जनक कोण, हें दडून राहूं शकत नाहीं, त्याप्रमाणेंच आधुनिक महाराष्ट्राचा जनक कोण, हेंहि यापुढें छपणार नाहीं.

अशा या अपूर्व ग्रंथाचें चीज मराठी भाषिक करोत व ग्रंथकर्त्यांच्या इच्छेप्रमाणें बाळशास्त्र्यांचें योग्य स्मारक विश्वविद्यालयांत त्यांच्या नांवानें गणितपीठ स्थापून होवो, अशी इच्छा प्रदर्शित करून हें परीक्षण पुरें करितों.

धन्य हें सतीत्व !

धडाड धडाड
समोर माझीया
नवविवाहित
रमणी त्यांतली
निरक्षर दोघें
लाजरी अंगुलि
मधुमय रवें
‘ पहा ना ’ म्हणते
पती तिचा परी
बिडी मुखामधें
धडाड धडाड
रांकट कुरूप
हालवी हळूच

चाले आगगाडी
बसलें युगल
नवपरिचित
स्वभावें रसिक
रसिक अेकच
पतीला स्पर्शीत
तयाला वदते
‘ चांदणी रात ’
हालेना बोलेना
दृष्टि धूरावर.
चाले आगगाडी
रमण पेंगतो.
लाजऱ्या करानें

म्हणे ‘ पहा तरी
जीवनाचा साथी
आंब्यांनीं दाखवी
धडाड धडाड
किरणें रवीचीं
म्हणें ‘ पहा तरी
सिंगल चहाची
‘ मुकाट बस ना !
कुरूप मुद्रेनें
घगीनें दुहेरी
परी न ढळतें
धन्य सतीपण
धडाड धडाड

गुलाबी पहांट ’
भुंवया संकोची
उदास अंतर
उगवला दीस
कमल-तळ्यांत
पहा शोभा रम्य
वल्लभा तहान !
किती बटबट ! ’
पहातो रागीट
पोळतें जळतें
धन्य हें सतीत्व
यथार्थ जीवन
तुटलें अंतर !

—जयंत जोग.

श्री. सुदर्शन[1] : अनुवादक : श्री. मनोहर देखणे

मशीन (एकांकिका)

(प्रोफेसर झैदी आपल्या हॉलमध्यें कोणाची तरी प्रतीक्षा करीत बसले आहेत. त्यांच्या हातांत ताजें वृत्तपत्र आहे. समोरच, त्यांचे दोन स्नेही कुठलींतरी सचित्र मासिकं चाळताहेत. हॉलमधील फर्निचर उंची असून, अभिजात अभिरुचीचें तें एक द्योतक आहे. भिंतीवर कांहीं घरगुती फोटो आहेत. त्यांतील एक त्यांचा–झैदींचा–आहे व दुसरा मोठा त्यांच्या पत्नीचा आहे. प्रो. झैदी अधूनमधून दरवाजाकडे दृष्टि वळवतात व मग निराशेनें पुन्हां वाचनांत गढून जातात. घड्याळांत पांचाचे ठोके पडतात. प्रो. झैदी चमकून आपलें डोकें वर्तमानपत्रांतून काढून–)

झैदी–पाहा ५ वाजले, पण अद्याप कमलकान्तचा पत्ता नाहीं. मला अशा लोकांचा तिटकारा वाटतो, ते पदवीधर होऊनसुद्धां वक्तशीर वागूं शकत नाहींत. या लोकांना केवळ सुंदर कपडे घालून सुबक इंग्रजी बोलायला सांगा ! परंतु नियमितपणाचं नांव नको. पावणेपांचला येणार होता तो नि आतां झालेत पांच पंधरा !

किशोर–झैदी, तुमच्याकडे आणखी सचित्र मासिकं नाहींत ?

झैदी–(साश्चर्य) हो, आणखी आहेत कांहीं. पण कां ?

अहमद–किशोरला सुचवायचंय कीं, तुम्हींहि त्यांतलीं चित्रं पाहात बसावं. वेळ जायला तें उत्तम साधन आहे. वाट पाहाणं सुलभ होतं.

झैदी—मला वाटतं, आपण चहाला सुरुवात करावी आतां आणि आपलं चहापान चालूं असतांच कमल आला, तर त्यानंहि घ्यावा. नाहींतर उडत गेला तो !

किशोर—अन् जेव्हां शेवटीं तो येईल, तेव्हां त्याचा राग आपण त्याच्यावर गरम होऊनच थंड करूं.

अहमद:—वा ! वा ! ! किशोर, तूंहि एकूण कवि बनलास तर ? माझ्या ऐकण्यांत होतं, ऊन चहाचा परिणाम गरमींत थंडपणाकडे होतो. पण तूंहि गरम माणसांना गरम शब्दांनीं गार करूं शकतोस हें नव्हतं माहीत. हा गाढवपणा आजकाल सर्वमान्यपणें काव्यात्म समजला जातो !

झैदी—मित्रांनों, आता काय करायचं ? बोला.

किशोर—मला वाटतं, आपण त्याच्यासाठीं जरासं थांबावं. त्याला फक्त १५ मिनिटं उशीर झालाय. म्हणजे कांहींच नाहीं.

झैदी—एक क्षणाचाहि उशीर म्हणजे उशीरच. पण तुम्ही थांबूं म्हणत असाल, तर माझं पामराचं काय चालणार ?

---

१ दिल्लीच्या Caravan या इंग्रजी मासिकांत श्री. सुदर्शन यांची ‘ Machine ’ ही एकांकिका सप्टेंबर १९५० च्या अंकांत प्रसिद्ध झाली. तिचा श्री. देखणे यांनीं केलेला प्रस्तुत मराठी अनुवाद ‘ नवभारतां ’त प्रसिद्ध करण्यास परवानगी दिल्याबद्दल श्री. सुदर्शन व Caravan चे संपादक यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोंत. —का. सं.

अहमद—अन् समजा, त्याचं घड्याळच मागं असलं तर ?

झैदी—म्हणून आपल्या घड्याळाप्रमाणें आपण चालूं नये कीं काय ? दुसऱ्यांच्या चुकांसाठीं आपण कां त्रास सोसावा ?

किशोर—बरोबर ! झैदी, तुम्ही मानव नसून मशीन आहांत !

झैदी—हो, या यंत्रयुगांत आपण साऱ्यांनींच मशीन व्हायला हवं. आणि जो मनुष्य असं बनूं शकणार नाहीं, तो कधींच यशस्वी होऊं शकणार नाहीं.

अहमद—पण तुम्ही विचार करा...

झैदी—(मध्येंच त्याला थांबवून)-मी मशीन आहे आणि मशीन विचार करूं शकत नाहीं. तुम्हांला माहीतच आहे हें. (अब्दूलला बोलवीत) अब्दूल, चहा आण. (मित्रांना पुन्हां) आतां त्याच्यासाठीं वाट पाहाण्यांत अर्थ नाहीं.

[कमल पडदा सरकवून आंत येतो.]

किशोर—पाहा, हा आलाच... !

अहमद—हॅलो, कमल ! झैदींनीं तुझ्यावर भाडिमार चालूं केला होता.

झैदी—त्यांत चूक कोणाची ? तुझी कीं या तुझ्या चमकदार घड्याळाची ! (ते त्याला आपल्या सोफ्यावर जागा देतात बसायला.)

कमल—(खालीं बसत) खरं म्हणजे हा सारा दोष एका तिसऱ्याच व्यक्तीचा आहे.

झैदी—कुणाचा आहे दोष ? अन् तिसऱ्याचा असेल, तर तुझ्याऐवजीं त्याला चहाला उशीर व्हायला हवा. तूं रस्त्यांत कां थांबलास ?

कमल—तुम्हांला श्याम माहीतच आहे ?

अहमद—तोच ना, तो शिष्ट गृहस्थ ?

कमल—तोच. तो आज सर्वस्वीं बुडाला

[अब्दूल चहाचं साहित्य ठेवतो व सगळे टेबलाकडे जातात.]

झैदी—आधीं काय घडलं तें सांग बघूं ? मग आपण ठरवूं त्याचा सर्वस्वीं नाश झाला कीं नाहीं !

[एव्हांना सारेजण टेबलाजवळ आलेले असतात.]

कमल—(खुर्चीवर बसत) श्यामला संशय वाटतोय् कीं, त्याच्या बायकोचं अन्य कोणाशीं अनैतिक वर्तन आहे !

अहमद—कोणाशीं ?

कमल—हरदेवरायशीं !

किशोर—हरदेवराय खरंच फार डॅंबिस आहे. तो या जगांत काय वाटेल तें करणं शक्य आहे. त्याला कशांतच पाप वाटत नाहीं.

अहमद—होय बुवा ! तो दारू पितो, खोटं बोलतो, फसवतो, जुगार खेळतो आणि कुणालाच जुमानीत नाहीं. त्याला वाटतं, आयुष्य केवळ मजा मारण्यासाठीं आहे. अन् ज्याचा यावर विश्वास नसेल, त्यानें आत्महत्या तरी करावी किंवा कुठं हिमालयांत जाऊन बसावं...इतका धोकेबाज इसम मी अजून दुसरा पाहिला नाहीं.

किशोर—मी त्याला मनुष्य म्हणायलाच तयार नाहीं. मी त्याला सैतान म्हणतो.

झैदी—पण श्यामनं त्याला घरीं यायला बंदी करावी.

कमल—त्यानं तसं केलं आणि त्याची बायकोच हरदेवरायला भेटायला त्याच्या घरीं जाते आतां ! आज श्यामनं सारं कांहीं आपल्या डोळ्यांनीं पाहिलं. सांगा, आतां त्यानं काय करावं ?

झैदी—(कमलला चहाचा कप देत) त्यानं गप्प बसण्यापेक्षां वाईटांतलं वाईट देखील हवं तर करावं.

कमल—त्यानं गप्प राहाणं म्हणजे दुर्वर्तनाला वाव देणं आहे. अन् असं दुराचरण असलं म्हणजे कटुता आलीच आणि या कटुतेचा परिणाम भांडणंतंडणं, मारामाऱ्या नि कधीं खून !

झैदी—(किशोरच्या हातीं कप देत) दुसरा मार्ग म्हणजे त्यानं बायकोला सोडणं नि मजेंत राहाणं ?

अहमद—(रागानं) म्हणजे काय ?

झैदी—(त्याच्याहि हातीं एक कप देत) म्हणजे सरळ आहे माझं म्हणणं अगदीं. त्यानं आपल्या बायकोला हरदेवरायबरोबर जाऊं द्यावं व स्वतःसाठीं दुसरी कोणी स्त्री हुडकावी. स्त्रियांचा नेहमींच सुकाळ असतो.

अहमद—(खवचटपणें) वा ! सुंदर कल्पना !

झैदी—नाहींतरी अशा स्त्रीशीं तुम्ही किती काळ जखडून राहाणार, जिचं तुमच्यावर प्रेम नाहीं

व जीवर तुमचा अविश्वास आहे ? अशा वेळीं कोणी घाईनें निर्णय न घेतां शांतपणें विचार करावा. घाई फार वाईट !

कमल–(चहाचा एक घोट घेत) तुम्ही रागावणार नसाल, तर तुम्हांला एक प्रश्न विचारायचाय ?

झैदी–बेलाशक.

कमल–तुम्हांला असं कळलं कीं, तुमच्या पत्नीचें कोणा दुसऱ्यावर प्रेम आहे, तर तुम्ही काय कराल ?

अहमद्–मोठा मार्मिक सवाल आहे हा.

झैदी–(एक बिस्किट बुडवीत) जबाब त्याहून मस्त आहे.

किशोर–सांगा तर मग तुम्ही काय केलं असतं ?

झैदी–ज्या दिवशीं मला असं समजेल कीं, माझ्या अर्धांगीचं मजवर प्रेम नाहीं, त्या दिवशीं मी तिला नि तिच्या त्या प्रियकराला बोलावून सांगेन : 'आतां तुम्ही कुठंहि जाऊं शकता. देव तुमचं भलं करो !'

कमल–आणि मग ?

झैदी–(हंसत) अन् मग मी माझा उंची पोशाख चढवीन नि सिनेमाला जाईन. आणि तिथं जे कुणी मला भेटतील त्यांना सांगेन : 'I am for sale now ! (मी विकाऊ आहे.)'

अहमद्–मला खेद होतोय, आपल्या सौ. नजमाभाभी आज गैरहजर आहेत. नाहीं तर, त्यांच्याबद्दल तुम्हांला काय वाटतं, हें तरी त्यांना कळलं असतं !

झैदी—तिला माझे विचार चांगले ठाऊक आहेत व तिचा माझ्या बुद्धिचातुर्यावर विश्वास आहे. माझाहि तिच्यावर पूर्ण विश्वास आहे.

कमल—आपल्या पत्नीला सोडल्यावर, एके काळीं ती आपली होती, याचं तुम्हांला कांहीं दुःख वाटणार नाहीं ?

झैदी—(सिगारेटचा एक लांब झुरका घेत) मी असं समजेन कीं, तिचं आपल्यावर प्रेम नव्हतं.

कमल—शिवाय तुमचं तिच्यावर प्रेम होतं, त्याबद्दल... ?

झैदी—मला कळेल कीं मी अज्ञानांत होतों !

कमल—तुमचे विचार फार असामान्य आहेत.

किशोर—मला वाटतं, झैदी स्वतःबद्दल खूप बोलतात व खूप विचार करतात. पण–उद्यां त्यांच्यावरहि असाच प्रसंग आला, तर श्यामइतकेच ते वेडे होतील अन् तितकेच दुःखीहि बनतील. त्यांना वाटतं आपण यंत्र आहों आणि हीच त्यांची फार मोठी चूक आहे. मनुष्य अगदीं खडकाप्रमाणें कठोर बनूं शकेल, पण केवळ–मशीन ? अशक्य ! नि समजा ज्या दिवशीं मानव यंत्र बनेल, त्या दिवशीं ह्या जगाची राख व धूळ झालेली असेल !

झैदी—तुम्हांला असं कधीं वाटलंय का कीं, जगांतलीं सारीं दुःखं आपण 'माणसं' असल्यानं उद्भवलीं आहेत...? मानव हा संवेदनाक्षम आहे, बुद्धिमान् आहे. तो सर्व गोष्टींचा आपल्याच दृष्टिकोनांतून विचार करीत असतो. आणि जेव्हां कधीं त्याला एखाद्याबद्दल प्रेम वाटतं–जास्त बरोबर बोलायचं तर, जेव्हां एखाद्या गोष्टीबद्दल त्याला दुर्बलता येते, त्याच्या भावना हळुवार होतात, तेव्हां ती वस्तु त्याला हवी असते. अन् जेव्हां त्याला ती मिळत नाहीं, तेव्हां तो संतापतो व त्यांतूनच जगांतलीं युद्धं सुरू होतात. जगांत जर नुसतीं यंत्रच असतीं तर या भूतलावर शांतता व सलोखा सदैव नांदता ! युद्धं झालींच नसतीं !

अहमद्—पण माझ्या लाडक्या दोस्ता, एवढी घोडचूक करूनहि मानवाला त्याचा धिक्कार करायचा मार्ग देवानें बाकी ठेवलाच नाहीं !

झैदी—माणसानं देवाची एक चूक सुधारली आहे. त्यानं लोखंडाचीं-पोलादाचीं मशीन्स बनवलींत. त्याची पुढची पायरी म्हणजे त्यानं स्वतः मशीन बनणं, म्हणजे त्यानं हृदयांतल्या साऱ्या भावना–कल्पना नष्ट करणं व केवळ प्रज्ञेच्या बळावर काम करणं. अन् ज्या दिवशीं त्याला ह्यांत यश येईल, त्या दिवसापासून जग शांततेनं चालेल.

कमल—पण मनुष्य कधीं मशीन बनणं शक्य आहे ?

झैदी—मला तें शक्य वाटतं. निदान मी तरी तसं मशीन पाहिलंय– आणि तें तुमच्यापुढं उभं आहे.

अहमद्—ही स्वतःची फसवणूक आहे ! तुमच्यावर प्रेम केलेलं तुम्हांला आवडत नाहीं ? कशाचा विषाद वाटत नाहीं ? राग नाहीं येत ?–एकदां आपलं हृदय नीट शोधा.

झैदी-- मला वाटतं, मी या साऱ्या गोष्टी-पासून अलिप्त आहे. इतरांपेक्षां मी स्वतःस जास्त चांगला ओळखूं शकतों.

[टेलिफोनची घंटा वाजते व झैदी उठून रिसीव्हर घेतात.]

झैदी— हॅलो, होय...झैदीच मी...हं... काय? ओः! तूं आहेस तर--हो...हो, आम्ही चौघेजण आहोंत. आम्ही साऱ्यांनीं आलं तर चालले? टीक--ओ.के.-थँक्यू! [रिसीव्हर ठेवून देतात.]

कमल-- कोण होतं?

झैदी-- (मोठयानें) अब्दूल, आम्ही बाहेर चाललोंत. अन् जेव्हां बेगमसाहेबा येतील तेव्हां त्यांना सांग कीं, आम्ही जेवायच्या वेळेपर्यंत येत आहों. अन् हें बघ, हे सारेजण इथंच जेवण करतील. (मित्रांना) चला आतां जाऊं.

[ते सर्वजण बाहेर जातात. स्टेजवर काळोख होतो. पुन्हां स्टेज उजळतं तेव्हां भिंतीवरील घड्याळांत सव्वाआठ झाले असून टेबलावरील सर्व वस्तू काढल्या गेल्या आहेत. नजमा व पर्वेझ बोलत प्रवेश करतात.]

नजमा-- मिस्टर पर्वेझ, या जगांत मी अगदीं एकटी आहे असं मला वाटतं. माझं म्हणणारं हृदयच नाहीं मला कुठें!

पर्वेझ-- तूं फार पुढें चालली आहेस, नजमा. झैदी कांहीं एवढा वाईट माणूस नाहीं.

नजमा-- मला तें समजतं, मि. पर्वेझ. जगाला ते फार उत्तम आहेत, पण मला नव्हे. व जो मनुष्य माझ्याशीं वाईट आहे, त्याला मी चांगलं कसं म्हणावं?

पर्वेझ-- हें नवल आहे!

नजमा-- मला या आयुष्याचा वीट आलाय. त्यांना माझ्याविषयीं काडीइतकीहि किंमत वाटत नाहीं.

पर्वेझ-- नजमा, झैदीचं तुझ्यावर प्रेम नाहीं हें नक्की?

नजमा--हो, मला अगदीं पक्की खात्री आहे कीं, त्यांचं माझ्यावर मुळींच प्रेम नाहीं. मी कुठें जातें याची त्यांना फिकीर नसते. मी काय करतें याची त्यांना पर्वा नसते. ते कधीं माझ्याशीं भांडत नाहींत वा कधीं मजवर रागावतहि नाहींत. जेव्हां ते ऑफिसा-तून घरीं येतात आणि मी घरांत नसतें, तेव्हां सुद्धां नाहीं. छेः! त्यांना माझी यत्किंचितहि जरूरी नाहीं.

पर्वेझ-- हो, तें कळतं मला.

नजमा—एकदोन वेळां मला बाहेरून यायला उशीर झाला. नि मी उशीरां कां आले तें सांगूं लागले. परंतु त्यांनीं तें ऐकलं तर नाहींच, उलट-" मला ठाऊक आहे, कांहीं तरी कामामुळें तुला उशीर झाला असेल. एरवीं रस्त्यावरनं उगाच भटकत जायची तुला संवय नाहीं, हें मला पूर्ण माहित आहे" असं बोलून तो विषयच बंद केला. आतां सांगा, याचा काय अर्थ होतो?

पर्वेझ—म्हणजे त्यांना तुझी फिकीर नाहीं, असंच ना?

नजमा—निदान त्यांना माझी आवश्यकता नाहीं. माझ्याशिवाय त्यांचें कांहींहि अडूं शकत नाहीं.

पर्वेझ—(विचार करीत) कदाचित् तुझं बरोबर असेल.

नजमा—(सद्गदित कंठानें) आणि त्याचंच दुःख होतं. कधीं कधीं तें अगदीं मरणप्राय वाटतं मला!

पर्वेझ—(एकदम उठून) एक गोष्ट कर तूं आज.

नजमा—(एक दीर्घ उसासा सोडून) काय करावं तेंच तर मला कळत नाहीं. कुठल्याच गोष्टीचा विचार नको वाटतो.

पर्वेझ—जेव्हां एखाद्या माणसाला कळतं कीं, त्याची पत्नी कोणा परपुरुषावर प्रेम करते आहे, तेव्हां मत्सरानें तो जळूं लागतो, बेफाम होतो. तर आतां झैदींना मत्सर वाटेलसं कर. त्यांना मत्सर वाटला तर त्यांचं तुझ्यावर प्रेम आहे, हें तूं अगदीं नक्की समज. तसं त्यांना वाटलं नाहीं तर मात्र त्यांचं तुझ्यावर प्रेम नाहीं, असं तूं समजायला हरकत नाहीं. मग तूं त्यांना सोडून ज्या कुणाचं तुझ्यावर प्रेम आहे, असा दुसरा मनुष्य शोधावास हें बरं. झैदी कांहीं एकटाच पुरुष नाहीं या जगांत.

नजमा—पण तेंच कसं जमायचं?

पर्वेझ—झैदींना एक पत्र लिही नि त्यांत असं म्हण कीं, त्यांना तुझी जरूरी नाहीं म्हणून तुलाहि

त्यांची गरज नाहीं. त्या पुरुषाचं–म्हणजे मी म्हणतों, ज्याला ते ओळखतात अशा एखाद्या माणसाचं नांव लिही—तुला वाटलं तर माझंहि लिहूं शकतेस. त्यांना असं लिही कीं, तूं माझ्याबरोबर जाते आहेस, त्यांच्या आणि तुझ्या सुखासाठीं.

नजमा—आणि मग ?...

पर्वेझ—असं पत्र लिही अन् तें टेबलावर ठेव, ते येईतोंवर थांब अन् पाहा काय होतंय तें.

नजमा—(थरथरत) पण असं करणं फार धोक्याचं आहे, नाहीं ?

पर्वेझ—होय, परंतु विषानंच विष मरतं. (खिशांतून फौंटनपेन काढून) हें पेन घे. (एक लिहायचं लेटर-पॅड देत) हा घे कागद अन् लिही पाहूं पत्र. या प्रश्नाचा निकाल आज लागायलाच हवा.

[नजमा पत्र लिहिते. पर्वेझ उठून इकडेतिकडे फिरूं लागतो. त्याच्या ओंठावर मिस्किल हास्य आहे. नजमा पत्र पर्वेझला दाखविते. तो पत्र वाचून घडी करून टेबलावर ठेवतो.]

पर्वेझ—हें एकदम ठीक आहे. आतां याचा सोक्षमोक्ष आज होणार:–झैदीचं तुझ्यावर प्रेम आहे कीं तुला अन्यत्र प्रीतीचा आधार शोधावा लागणार ? (पेन खिशाला अडकवीत) तुझं सारं जीवन तूं निष्प्रेमावस्थेंत कां काढावंस ? अजून केवढं आयुष्य तुला जगायचं आहे ! अन् असं एकट्यानं तें जगणं किती मुष्किल आहे ?

[पावलांचा आवाज येतो. नजमा घाबरून टेबलावरचं पत्र उचलून घेते.]

पर्वेझ—(पुढें येत) आण इकडं तें पत्र.

नजमा [पत्र त्याच्या हातीं देते. तो तें टेबलावर ठेवतो. झैदी व त्याचे स्नेही आंत येतात. नजमा बावरून जाते व पर्वेझ तिला धीट बनण्याचा इषारा देतो.]

पर्वेझ—हॅलो, मंडळी !

झैदी—(हंसून) हॅलो, केव्हां आलास तूं ?

पर्वेझ—(त्या प्रश्नास दुर्लक्षून) तिथें टेबलावर आपलं एक पत्र आहे. तें वाचा. आम्ही जातों आहों.

झैदी—(पत्र घेत) तुझा केव्हांपासून 'तुम्ही' झाला ?

पर्वेझ—आजपासूनच.

झैदी—(पत्राची घडी उलगडीत) तूं मला अगदीं आव्हान दिल्यासारखं बोलतोयस आज ? अं ?–
[किशोर, कमल व अहंमद सोफ्यावर बसतात.]

पर्वेझ—विवाहित पुरुषाला त्याच्या बायकोखेरीज कोणीच आव्हान देऊं शकत नाहीं ! (नजमाकडे जाऊन) भ्यायचं नाहीं. भ्यालीस तर सारा खेळ खलास होईल !

[झैदी पत्र संपवून खिशांत ठेवतो. तो नजमापुढं जाऊन उभा राहातो. नजमा आपली नजर खालीं वळवते.]

झैदी—तुझं पत्र मी वाचलं.

नजमा—पण...(घाबरत) इकडं पाहा...

झैदी—(अगदीं शांतपणें) हें तुझं अखेरचं सांगणं असेल नि या मार्गानं तुला आनंद लाभेल असं वाटत असेल, तर माझी मुळींच हरकत नाहीं. तूं बेशक जा. पण तुझं पाऊल चुकीच्या रस्त्यावर पडत नाहीं ना, याची खात्री ठेव. मी अजूनहि तुझं पत्र नष्ट करून सारं कांहीं विसरायला तयार आहे.

कमल—(पुढें येऊन) काय प्रकार आहे ?

नजमा—(नर्व्हस होऊन) कांहीं नाहीं.

झैदी—उद्यां साऱ्या गावांत चर्चेचा विषय होणारी गोष्ट लपवून ठेवण्यांत काय फायदा आहे ? (कमलला) नजमा मला सोडून पर्वेझबरोबर राहूं इच्छीत आहे.

अहमद—म्हणतां काय तुम्ही ?

झैदी—मी असं म्हणतोंय कीं, जर नजमाला पर्वेझबरोबर जायचं असेल नि तो तिला न्यायला तयार असेल, तर माझी कांहीं एक ना नाहीं !

पर्वेझ—(नजमाला) ऐकलंस तूं त्यांचं म्हणणं ? त्यांची कांहीं आडकाठी नाहीं. तूं अकारण त्यांच्यासाठीं वेडी बनली आहेस. त्यांना तुझी काडीचीहि किंमत वाटत नाहीं.

नजमा—(रागानें) मला माहीत आहे त्यांना माझी पर्वा नाहीं तें. आज तुम्ही साऱ्यांनीं आपल्या डोळ्यांनीं पाहिलंय तें. चला पर्वेझ. आतां एक निमिषहि या घरांत राहायची माझी तयारी नाहीं.

किशोर—नजमाभाभी, इतकं बेफाम नका होऊं. एक मिनिट आणखी विचार करा तुम्ही काय करतांहा याचा !

नजमा—मी पुष्कळ विचार केला आणि म्हणूनच जाते आहे.

अहमद—(रस्ता रोखीत) तुम्ही अशा जाऊं शकत नाहीं.

नजमा—कां नाहीं ? कोण अडवूं शकतं मला ?...

अहमद—मी तुम्हांला थांबवितों आहे.

पर्वेझ—तूं कोण तिला अडवणार ?

कमल—(पुढें होत) झैदी तुम्हांला अडवतील. (झैदींना) झैदी, तुम्ही पति आहां. तुमचा नवरेपणाचा हक्क गाजवा. एका दोरखंडानं जखडून ह्यांना एका खोलींत डांबा ! त्या तुमच्या इच्छेविरुद्ध कशा जातात पाहूं ?

नजमा—(त्वेषानें ओरडून) कोण खेंचणार मला मागं ? कोण बांधणार मला दोरानं ? हे—ज्यांनीं कधीं माझी कदर केली नाहीं ? ज्यांनीं कधीं माझ्याबद्दल विचारहि केला नाहीं ?

किशोर—(शांतपणें) नजमा, हें फार झालं. कशावरनं तुम्ही असं म्हणतां कीं, त्यांना तुमची कदर नाहीं ? त्यांनीं तुमच्यासाठीं सारं कांहीं केलंय. उंची वस्त्रं, अमोल अलंकार—अन् ह्या घराच्या तुम्ही स्वामिनी आहां. ते कधीं तुम्हांला पैशाला नाहीं म्हणाले नाहींत. तुम्हांला हवं तें तुम्ही करूं शकतां, हवं तें विकत आणतां अन् तरीहि तुम्ही म्हणतां कीं, झैदींना तुमची किंमत नाहीं ? खरंच, ही फार खेदाची गोष्ट आहे.

नजमा—(ओरडून) पण स्त्रीला नुसते दागिने अन् पैसे नको असतात. तिला पतीचं प्रेमहि हवं असतं. अन् हेंच काय तें नेमकं झैदींनीं मला दिलं नाहीं.

किशोर—नजमा, म्हणजे याचा अर्थ असा कीं, इतकीं वर्षं त्यांच्या सांनिध्यांत राहून तूं त्यांना ओळखूं शकली नाहींस, कधीं त्यांच्या भावनांचा विचार केला नाहींस.

नजमा—(त्वेषानें) त्यांच्यांत माझ्या प्रेमाचा एक बिंदु असता तरी, हें पत्र वाचून त्यांना संताप येता. पण पाहा त्यांची चर्या. आहे तिथं दुःखाचं चिन्ह ? जणुं मी नव्हे, एखादी बाहुलीच बाहेर निघालीय ? हें त्यांचं प्रेम !

अहमद—(गंभीरपणें) असं पाहा, नजमा...

नजमा—(किंचित् नमून) तुम्हीच सांगा, तुमच्या बायकोनं असं पत्र लिहिलं असतं, तर काय केलं असतं तुम्ही ?

अहमद—मी तिला साखळीनं जखडलं असतं.

नजमा—विचारा, ह्यांची आहे का हिम्मत तशी ?

झैदी—(थंडपणें) नाहीं, माझा असा विश्वास आहे कीं, माणसांना साखळदंडानें बांधायचं नसतं. तें केवळ पशूंच्यासाठीं आहे.

नजमा—(चिडून) याचा अर्थ ह्यांना माझी कदर नाहीं नि काळजी पण नाहीं.

किशोर—नजमा, असा राईचा पर्वत करण्यांत काय हंशील आहे ? आपल्या घरांत राहा आणि मग थोड्या अवधींत तुम्हांला समजेल कीं, झैदी नुसते माणूस नसून संत-माणूस आहेत.

नजमा—(आवाज चढवीत) कुणी म्हणोत त्यांना संत. ते शुद्ध यंत्र आहेत. त्यांना स्त्रीची जरूरी नाहीं. त्यांना ती एक मशीन म्हणून हवीय्. छे, मी इथं थांबूं शकत नाहीं. नि थांबलेंच, तर मला आत्महत्या करावी लागेल.

कमल—झैदी, आपण पति आहां. कुठंय् तुमचा स्वाभिमान ? तुम्ही मानव आहां. कुठंय् तुमचा राग ? तुम्ही माणूस आहां. कुठं आहे तुमच्या हृदयांतली ठिणगी ? बोलत कां नाहीं ? कुठें आहे तुमच्यांतला बहिरा, मुका, स्वार्थी असा तो आंतला माणूस ? कुठवर त्याला तुम्ही असा झोंपूं देणार ? त्याला जागा होऊं द्या, नाहींतर तुमचं हें सोन्यासारखं जग कोसळून पडेल,

झैदी—(शांतपणें पर्वेझजवळ जाऊन) तुझं हिच्यावर प्रेम आहे ?

पर्वेझ—हो !

झैदी—(नजमाकडे जात) तुला मला सोडायचं आहे ?

नजमा—(सरोष) हें तुमचं माझ्या प्रश्नांचं उत्तर असेल, तर खरोखरींच मी तुम्हांला सोडूं इच्छितें.

झैदी—तूं माझ्या संगतींत बरींच वर्षं काढ-लींस–व मला तूं खूप सुख दिलं आहेस. तेव्हां तुला वाटेल तें तूं या घरांतून नेऊं शकतेस. मी तुला देतों. सांग, तुला काय पाहिजेय ?

नजमा—(संतापानें) मला घटस्फोट पाहिजे आहे.

झैदी—तो तुला उद्यां मिळेल. यापेक्षां तुला कांहीं हवंय ?

नजमा—तुमच्यापासली कोणतीहि वस्तु मला नकोय. मी आहे अशी रिकाम्या हातानंच जातें, बरं !

झैदी—(नजमाचा सोफ्यावरील ओव्हरकोट तिला देत) बाहेर थंडी आहे. नि तुला थंडी लगेच बाधते.

नजमा—(झैदीकडे रोषानें बघत) मला त्याची फिकीर नाहीं !

[नजमा पर्वेझबरोबर निघून जाते. थोडावेळ झैदी सुन्नपणें उभे राहातात; नंतर मित्रांकडे जातात. सगळेजण स्तब्धपणें कोचावर बसतात.]

किशोर—आतां काय करणार आहां, झैदी ?

झैदी—त्यांत काय करायचंय ? अब्दूल जेवा-यला आणील व आपण मजेंत त्यांवर ताव मारूं. (सिगारेट-केस उघडतात)

कमल—पण तुम्ही आज कांहीं जेवूं शकाल ?

झैदी—(सिगारेट शिलगावीत) नुसतं जेवणच करणार नाहीं, तर सुंदरसा सूट चढवून सिनेमास देखील जाईन. अन् जो कोणी मला तेथें भेटेल, त्याला मी सांगेन कीं, मी आतां विकावूं आहे, I am for sale now ! (मोठ्यानें) अब्दूल !

अब्दूल—(दरवाजांतून डोकावत) आणखी थोड्याच टाइमांत आणतों, साहेब.

झैदी—एवढा उशीर कां केलास आज ?... तुला हें ठाऊक आहे ना, कीं मी रोज साडे-आठला जेवतों, का नाहीं ? आटप लौकर नि जेवणाचं आण. (मित्रांना) माफ करा हं, मी जरा कपडे बदलून येतों.

अहमद—(सहानुभूतीनें) हें पाहा, झैदी, आज तुम्हांला जबरदस्त धक्का बसला आहे.

झैदी—परंतु मला त्याचा यत्किंचित्‌हि विषाद वाटत नाहीं. (क्षणैक थांबून) माफ करा, हा आलोंच मी ! (झैदी जातात.)

अहमद—झैदी फार हट्टी आहेत. त्यांच्यांत भावनेचा अंशहि नाहीं. एवढा जबर आघात होऊन-देखील माणसाला कांहीं न वाटणं, हें त्याला कमी-पणा आणणारं आहे. ही कल्पनाच मला असह्य होते.

कमल—हा सारा नजमाचा दोष आहे.

किशोर—जरा तुझा गैरसमज होतोय्, कमल. त्यांत झैदीसुद्धां तितकेच दोषी आहेत. त्यांना स्त्रीचं अंतःकरणच समजत नाहीं. स्त्रीला फक्त प्रीति नको असते, तर तिचा योग्य आविष्कारसुद्धां हवा असतो.

अहमद—स्त्री ही स्वभावतःच अभिनयोत्सुक असते.

किशोर—अगदीं बरोबर. अन् त्याच्या उलट झैदींचं वर्तन एकाद्या मशीनसारखं !

कमल—आणि आतां यापुढं त्यांना मशीन बनून वागणंच भाग आहे. नाहींतर हा आघात त्यांना असह्य होईल.

[शेजारच्या खोलींत पिस्तुल उडाल्याचा ध्वनि होतो. ते तिघे एकमेकांकडे बघतात, दचकतात व सगळेजण त्या शेजारच्या खोलीकडे धांवतात. थोड्याच वेळानंतर ते सारे दुःखी चेहेऱ्यानें बाहेर येतात....किशोर रिसीव्हर उचलतो व डायल फिरवतो...]

किशोर—हॅलो...तुम्ही पोलीस स्टेशनमधून बोलत आहां काय ? मी रतनरोड नं. ६७ मधून बोलतों आहे. एका इसमानं या घरांत आत्महत्या केली आहे. तरी त्या शवाचा ताबा घेण्यासाठीं कोणी पोलीस अधिकारी त्वरित पाठवा !

[पडदा पडतो.]

सारसंकलन

नवकवितेमागील प्रेरणा

' आर्द्रा ' या नवकवितासंग्रहाचे कर्ते प्रा. य. द. भावे यांचा ' हळवें भिंग ' हा दुसरा काव्यसंग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे. या काव्यसंग्रहाच्या आपल्या प्रस्तावनेंत प्रा. भावे यांनीं नवकवितेच्या वैशिष्ट्यासंबंधीं उद्बोधक विचार प्रकट केले आहेत. त्या प्रस्तावनेंतील कांहीं भाग पुढें उद्धृत केला आहे.

" जुनी कविता आणि नवकविता यांमधला फरक नुसता कालनिदर्शक नाहीं. कारण, १९५० सालांतहि असे कांहीं कवी आहेत कीं, जे अजूनहि जुने सूर आळवीत आहेत. नवकवितेचें वैशिष्ट्य केवळ वृत्तवैचित्र्यांत, मुक्तछंदाच्या उपयोगांत, किंवा वृत्ताच्या विरुद्ध पुकारलेल्या बंडखोरींतहि नाहीं. कारण मुक्तछंदांतच काय, पण शुद्ध गद्यांतहि लिहिलेलीं काव्यें पारंपरिकतेनें भरलेलीं आढळतील. नवकवितेचें वैशिष्ट्य कांहीं एक तऱ्हेच्या शब्दप्रयोगांतहि नाहीं किंवा यांत्रिक युगाच्या प्रतिमांच्या सढळ आणि सवंग वापरांतहि नाहीं. कारण अशा शब्दांचा आणि प्रतिमांचा वापर, 'गुलाबी गाल', 'पोवळ्यांचे ओठ', ' हरिणाचे डोळे ', वगैरे शब्दसमुच्चयाच्या उपयोगाइतकाच सोपा आहे. हें सर्व वरवरचें, पोशाखी आहे. ' नवकविता ' आणि ' जुनी कविता ' यांमधला फरक बाह्याचा नाहीं. तो आंतरिक आहे. तो वैचारिक क्रांतीचा निदर्शक आहे. तो वेगळेपणा ' नवकवि ' आणि ' जुने कवि ' यांची तत्त्वज्ञानाची बैठकच निरनिराळी असल्यानें निर्माण झाला आहे.

" अंतिम वास्तवा-(Reality)चें स्वरूप समजून घेणें आणि त्या अनुभूतीची यथार्थ अभिव्यक्ति करणें हें कलेचें वा काव्याचें कार्य नव कवी आणि जुने कवी या दोघांनाहि सारखेंच अभिप्रेत असतें. पण जुन्या कवीच्या वास्तवाबद्दलच्या कल्पना संकुचित नसल्या तरी अपुऱ्या असतात. इतकेंच नव्हे, तर अंतिम वास्तवाचें रूप समजून घेतांना तो आपल्या व्यक्तिमत्त्वा-(Poetic Personality)चा अर्धामुर्धा भागच उपयोगांत आणतो. त्यामुळें दुहेरी तऱ्हेनें त्यानें घेतलेला वास्तवाचा मागोवा हा अपूर्ण असतो. त्या मानानें नवकवीचा मागोवा हा पूर्ण असतो. कारण त्याच्या वास्तवाबद्दलच्या कल्पना गतिमान् (dynamic), क्रान्तिकारक, पुरोगामी आणि शास्त्रीय असतात. वास्तवाचें रूप समजून घेतांना आणि त्यामुळें आलेल्या अनुभूतीची अभिव्यक्ति करतांना तो आपली ' कवि-अस्मिता ' किंवा आपलें ' कवि-व्यक्तिमत्त्व ' पूर्णतया उपयोगांत आणीत असतो.

" नवकवीचें कार्य अवघड आणि निराळें असतें. प्लेटोपासून आजतागायत तत्त्वज्ञांनीं, शास्त्रज्ञांनीं, मानसशास्त्रज्ञांनीं आणि मनोविश्लेषणी पंडितांनीं वास्तवासंबधीं जें जें काय सांगितलें आहे त्याचा तो यथार्थतेनें विचार करतो. त्याचप्रमाणें पौर्वात्य तत्त्वज्ञानानें काढलेलीं प्रमेयेंहि तो मनन करतो आणि वास्तवाच्या कल्पनेचा एक प्रकारचा मेळ बसवितो. वास्तवाचें स्वरूप समजावून घेण्यासाठीं तो जागृत मनाइतकाच सुप्त वा अर्धसुप्त मनाचा उपयोग करून घेतो. पदार्थविज्ञानांत ' पॅरललोग्राम ऑफ फोर्सेस ' म्हणून एक प्रकरण आहे. त्यावरून ' प्रेरणांचा परिणामदर्शक '('रिझल्टंट ऑफ फोर्सिस') कसा काढावयाचा, हें समजतें. नवकवीला असाच प्रेरणांचा परिणामदर्शक काढावयाचा असतो. या कार्यासाठीं भावना, कल्पना, बुद्धि वा पृथक्करणाची शक्ति, अंतःप्रेरणा (Intuition) आणि संयोजना करण्याची शक्ति (Synthesis) हीं एकसमयावच्छेदेंकरून तो कार्यप्रवण करतो. जागृत मन आणि अर्धसुप्त वा सुप्त मन यांच्या अनुभवाचा मेळ

काढून, आलेल्या अनुभूतीचा तो आविष्कार किंवा अभिव्यक्ति करीत असतो. त्यासाठीं मानवी अस्मितेच्या वा व्यक्तिमत्त्वाच्या सर्वच्या सर्व पैलूंचा तो वापर करीत असल्यानें, त्याचें संपूर्ण कविव्यक्तिमत्त्व या कामीं लागलेलें असतें. पूर्वीचे कवी, जुने कवी आपल्या मनाचा म्हणजे पर्यायानें कविव्यक्तिमत्त्वाचा एकादाच भाग कार्यप्रवण करीत असत. त्यामुळें त्यांनीं वास्तवाचा घेतलेला मागोवा अपूर्ण होता. नवकवि ह्या ह्या बाबतींत (म्हणून सर्व बाबतींतच) जुन्या कवींच्यापेक्षां या अर्थानें पुरोगामी असतो...

" संपूर्ण कविव्यक्तिमत्त्वाचा उपयोग करून, वास्तवाचें संशोधन करून आलेली अनुभूति यथार्थ अभिव्यक्त करावयाची हेंच नवकवीचें कार्य. हें कार्य करण्यासाटीं मनाची शक्ति वाढली पाहिजे हें उघड आहे. तेव्हां ही जबाबदारी नवकवीवर साहजिकच आहे. मनाची शक्ति सहजप्रवृत्तीं-(Instincts) ना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन, त्यांच्यावर अनैसर्गिक दडपण न आणतां, त्यांच्या आविष्काराला योग्य वाट देऊन, त्या शुद्ध करीत करीतच, त्यांचें उदात्तीकरण (Sublimation) करण्यानें वाढते.

" पूर्ण वाढलेलें मन वास्तवशोधनाच्या कामीं संपूर्णतया नवकवि लावीत असतो. जागृत आणि अर्धसुप्त मनाच्या अनुभवांच्या अनुभूतीचा आविष्कार करतांना त्याला साहजिकच प्रतिमा आणि प्रतीकें यांचा उपयोग करावा लागतो.

" हीं प्रतीकें किंवा प्रतिमा किंवा प्रतीकरूप बनलेल्या प्रतिमा यांचें स्वरूप एका विशिष्ट तऱ्हेचेंच असावें, असें म्हणणें सयुक्तिक नाहीं. मनाची घडण निरनिराळ्या संस्कारांच्या रासायनिक प्रक्रियेनें होते. नवकवीनें नेहमींच यंत्रयुगाशीं निगडित असलेल्या, आजच्या जीवनाचा भाग बनलेल्या यंत्रांचा किंवा तद्विषयक प्रतिमांचा वापर करावा, असें म्हणणें एकांगी होईल. आजच्या कवीचें, विशेषतः मराठी कवीचें मन तर फारच भानगडीचें. त्याच्या मनावर पौर्वात्य आणि पाश्चिमात्य संस्कारांच्या विचित्र मिश्रणाचा परिणाम झालेला असतो. शिवाय दर वटकेला आवतींभोंवतीं घडणाऱ्या गोष्टींचाहि त्याच्या मनांवर परिणाम होत असतो. तेव्हां त्याला आलेल्या ' अनुभूती 'ला अभिव्यक्त करतांना त्यानें आजच्या जीवनाशीं निगडित झालेल्या यंत्रादिविषयक प्रतिमांचा उपयोग करणें जितकें योग्य, तितकेंच पौर्वात्य संस्कृतीचा एक जो महत्त्वाचा भाग भागवत-महाभारत रामायणादि महाकाव्यें, पुराणें-पोथ्या, त्यांतील कथांचा, प्रसंगांचा, व्यक्तींचा, पात्रांचा प्रतीकरूप वापर करणें नैसर्गिक होय. प्रतीकरूपी प्रतिमा जुन्या असल्या, तरी त्यांच्या वापरांतून जर नवा अर्थ बाहेर पडत असेल, तर त्यांचाहि उपयोग नवकवीला अभिप्रेत असतो. पिस्टन, चाकें, रूळ, रासायनिक मिश्रणें, नलिका, विजेची गाडी, आगिनगाडी, रस्ता दाबणारें एंजिन, खडी, धुराडीं, चाळींचे डोलारे, अणुबॉंब, हायड्रोजन बॉंब–यांचा वापर त्यानें सदाच करावा, हें म्हणणें या अर्थानें अज्ञानदर्शक होईल. नवीनता ही नव्या प्रतिमांतून जशी येते, तशीच ती जुन्या वाङ्मयांतील, महाकाव्यांतील प्रसंगांचा वा पात्रांचा प्रतीकरूप उपयोग करून नवीन अर्थ काढण्यानेंहि उत्पन्न होते. नव्या अनुभूतीशीं आणि तिच्या अभिव्यक्तीशीं निगडित असलेला नवा अर्थ हाच नावीन्याचा निदर्शक असतो. नवीनता ही अर्थावर अवलंबून असते; नुसत्या प्रतिमांवर नाहीं. कारण अर्थ हाच आत्मा. प्रतिमा हें शरीर.

" नवकवीची कलापूजकता ही निष्क्रिय स्वप्नाळूपणाची नसते. ती वास्तवपूर्ण असतेच आणि पुरोगामीहि असते. पुरोगामी दृष्टीनें विचार केला असतां, आज जें कांहीं मुख्यतः टिकवावयाचें आहे, तें म्हणजे ' मानव्य ' होय. त्या 'मानव्या'ची चूज राखायची असेल, तर आजची दोषपरिप्लुत समाजरचना बदलून टाकून दुसरी नवीन समाजरचना घडवावी, अशी नवकवीची मनीषा असते. त्याची सामाजिक जागरूकता (social consciousness) अत्यंत तरल वा धारदार असते. जें जें प्रतिगामी किंवा अधोगामी असेल त्याचा त्याला तिटकारा असतो. संकुचित राष्ट्रवाद, धार्मिक वेडगळपणा, अंधश्रद्धा, कोंजी विचारसरणी, कोणत्याहि स्वरूपांतील हुकुमशाही यांचा तो कट्टर वैरी असतो. यासाठीं त्याला एका प्रकारचें आर्थिक प्रजासत्ताक हवें असतें. ज्या समाज-

व्यवस्थेंत व्यक्तीला आपलें व्यक्तिमत्त्व सर्व तऱ्हेनें फुलवितां येईल, तीच त्याला प्रिय असते. कारण त्यावांचून मानव्याच्या मूल्यांचा उच्चारहि निरर्थक. नवकवीची मानव्यादि मूल्यावरची निष्ठा अत्यंत कडकडीत असल्यानें तो एका विशिष्ट अर्थानें ' आस्तिक ' असतो. ''

हिंदुस्थानांतील मच्छीमारीचा धंदा

हिंदुस्थान देश अन्नधान्याच्या दृष्टीनें तुटीचा देश आहे. त्यामुळें त्याला इतर नैसर्गिक अन्नसाधनांकडे विशेष लक्ष द्यावें लागणार आहे. ' अधिक धान्य पिकवा ' प्रमाणेंच ' अधिक मासे पकडा ' अशा पुकारहि अगदींच अनाठायीं ठरणार नाहीं. ज्या देशाच्या दोनतीन बाजूंना समुद्र आहे, त्याला निदान दर्यातील अन्न पकडण्याचा धंदा तरी वाढवितां आला पाहिजे. त्या दृष्टीनें प्रो. चतुर्भुज मामोरियांचा ' मॉडर्न रिव्ह्यू 'च्या फेब्रुवारीच्या अंकांतील लेख मननीय ठरावा. त्यांत त्यांनीं ' हिंदुस्थानांतील मच्छीमारी 'च्या धंद्याचीं साधनें चर्चेस घेतलीं आहेत. त्या लेखांतील महत्त्वाचा भाग सारांशानें येथें दिला आहे.

शेती आणि पशुधन यांनंतर महत्त्वाचा मासेमारीचा धंदा येतो. हिंदुस्थानांतील या धंद्याला उपयुक्त साधनें समृद्ध आहेत. खाद्य माशांचे प्रकार आणि संख्या हीं दोन्ही फार मोठीं आहेत. हिंदी मासेमारीचे मुख्य प्रकार चार आहेत : समुद्रांतील, गोड्या पाण्यांतील, खाड्या व दुआब यांतील मासेमारी आणि मोत्यांच्या शिंपल्यांचा धंदा.

खाऱ्या पाण्यांतील मासेमारीचा धंदा मद्रासमध्यें फारच संघटित प्रमाणांत चालतो. 'मद्रास-मासेमारी-खात्या'तर्फे माशांच्या तेलाची पैदास करण्याची एक प्रक्रिया विकसित करण्यांत आली आहे. मुंबईचा क्रमांक नंतर येतो. मुंबई प्रांतांत चांगलीं बंदरें आहेत व त्यांच्या अनुषंगानें मासेमारीचा धंदा चांगला चालतो. रत्नागिरी जिल्ह्यांतील मासेमार-कोळी या कामांत फारच तरबेज गणले जातात. कच्छ-काठेवाडच्या किनाऱ्यावरहि मासेमारीचा धंदा चालतो. त्रावणकोर—कोचीन राज्यांत हा धंदा संघटित स्वरूपांत चालतो. येथील मासे सिलोन, ब्रह्मदेश आणि स्ट्रेट्स सेटलमेन्ट या प्रदेशांत निर्यात होतात. त्रिवेन्द्रम् येथें 'रेफ्रिजरेटिंग' यंत्रसामग्री असून तिच्या साह्यानें ताजे मासे टिकवून ठेवले जातात. सरकारी मासेमारीखात्यातर्फे शार्क माशाच्या तेलाचें उत्पादन केलें जातें.

गोड्या पाण्याच्या मासेमारीसाठीं उत्तर प्रदेश फार समृद्ध आहे. गंगा, यमुना, शारदा, घोग्रा, राप्ती आणि बटवा या नद्यांत मासेमारीच्या जागा खूपच आहेत. ट्राउट् जातीच्या माशांची वाढ हिमालयांतील असंख्य नद्यांत करतां येण्यासारखी आहे. बंगालमध्यें गोड्या पाण्याचे मासे मारण्याच्या जागा चांगल्या आहेत. त्यांतून वाहणाऱ्या महान् नद-नद्यांचीं पात्रें, त्यांचीं मुखें व दुआब यांत खूप मच्छी मिळते. बंगाल्यांत मत्स्याहाराविरुद्ध धार्मिक बंधनें नसल्यामुळें तेथें मच्छीमारीला चांगला वाव आहे. त्रावणकोरमध्यें मोठालीं सरोवरें असून त्यांतील एक तर ३० मैल लांब व १० मैल (जास्तींत जास्त) रुंद आहे. मद्रास प्रदेशांतील गोदावरी, कृष्णा, कावेरी या पूर्वाभिमुख नद्या, इतर पश्चिमाभिमुख नद्या व नीलगिरींतील नद्या यांमध्यें मासेमारी चांगली चालते. नीलगिरींमध्यें सरकारी खात्यामार्फत ट्राउट् माशांची पैदास होते व ती सरकारला मोठी उत्पन्नाची बाब झाली आहे.

खाड्या व दुआब यांतील मासेमारीसाठीं महानदी, गंगा व ब्रह्मपुत्रा यांच्या मुखांजवळचा पुरीपासून हुगळीपर्यंतचा पट्टा फार प्रसिद्ध आहे. मोत्यांचे शिंपले पकडण्याचा धंदा हिंदुस्थान व सिलोन यांमधील समुद्रपट्टींत, काठेवाडच्या अरबी समुद्रालगतच्या किनाऱ्यावर आणि कच्छच्या आखातांत चालतो. मद्रासमधील पनबानमधील कुसादी बेटांत मोत्यांच्या शिंपल्यांची पैदास होते. मुंबई बेट व ठाणें येथेंहि मोत्यांचे शिंपले पकडण्याचीं केंद्रें आहेत.

मासेमारीच्या धंद्याची आतांची स्थिति मुळींच समाधानकारक नाहीं. याचीं कारणें विविध आहेत. मासेमार-कोळी हा धंदा सबंध वेळ करीत नाहींत व त्यांच्या पद्धतींत सुधारणा होत नाहीं. ते कर्जबाजारी असतात आणि धंद्याचीं सूत्रें ठेकेदारांच्या किंवा ' महाजनां 'च्या हातीं जातात; अशिक्षितपणामुळें त्यांच्यांत संघटितपणा येत नाहीं. मासेमारीच्या

धंद्याला उत्तेजन मिळेल अशा दळणवळणाच्या सोयी, नवीन पद्धती आणि नवीन तऱ्हा दाखल केल्या जात नाहींत. मासेमारीच्या जागांचे मालक त्या जागा खंडानें देत असल्यामुळें त्यांची वाढ करण्याकडे त्यांचें लक्ष नसतें. लहान ठिकाणीं सारखी मासेमारी करण्याच्या जुन्या पद्धतीमुळें त्या स्थळांतील माशांच्या मूळ साधनांचाच नाश होतो. बंगाल्यांतील मासेमारीचीं तळीं बुजवून तेथें शेतीची लागवड करण्याकडे प्रवृत्ति झाल्यानें तेथें हा धंदा खालावत आहे; तसेंच तागाच्या लागवडीमुळेंहि असाच परिणाम घडत आहे. तलाव व इतर मासेमारीचीं स्थळें यांकडे दुर्लक्ष केलें जातें; आणि नद्यांत व जलप्रवाहांत शहरांतील खताडीचें पाणी सोडल्यानें सर्वसाधारणपणें माशांच्या वाढीवर प्रतिकूलच परिणाम घडतो.

आपल्या मच्छीमारीच्या धंद्याची आंकडेवार तुलना परदेशांतील याच धंद्याशीं करणें उद्बोधक होणार आहे. आईस्लंड, न्यूफाउन्ड्लन्ड व नॉर्वे यांची गोष्टच निराळी. कारण तेथें दरमाणशीं वार्षिक ६८० पौंडांपासून ६२२३ पौंडांपर्यंत माशांची पैदास आहे. ती त्यांच्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळें होय. पण जपानांत हें प्रमाण १११ पौंड, कानडांत १०९ पौंड, डेन्मार्कमध्यें ६३ पौंड, ब्रिटिश बेटांत ४९ पौंड, पोर्तुगालमध्यें ३७ पौंड, स्पेनमध्यें ३७ पौंड, अमेरिकेंत ३५ पौंड, जर्मनींत २० पौंड, फ्रान्समध्यें २० पौंड, सोव्हियेत संघांत १८ पौंड आणि याच्याबरोबर तुलनेला हिंदुस्थान, ब्रह्मदेश व इराण यांचें एकत्र प्रमाण दरवर्षीं दरमाणशीं फक्त ५ पौंड आहे. या किमान पैदाशीचीं कारणें वर नमूद केलींच आहेत.

एकूण पैदाशीचा अर्धा भाग ताजा मासा म्हणून खाल्ला जातो; १/५ भाग मिठांत मुरवून ठेवला जातो; १/५ भाग नुसता उन्हांत वाळवला जाऊन 'सुकट' बनतो; आणि १/१० भाग माशांची पैदास वाढविण्याकडे वापरला जातो. माशांची चरबी जीवनसत्त्वें 'ए' व 'डी' यांच्यासाठीं वापरली जाते. उरलेल्या माशांचें तेल काढतात किंवा खतें ('फर्टिलायझर्स') तयार होतात. शार्क व इतर माशांचें औषधी तेल निघतें व कांहीं विशिष्ट खाऱ्या व गोड्या मच्छीपासून 'मच्छी तेल' काढलें जातें. फिशमील, फिशमॅन्युअर (खत), फिशम्यूझ, शार्कफिन्स, वगैरे व्यापारी जिनसाहि मच्छीपासून होतात. मच्छीचें तेल साबण व इतर गोष्टींसाठीं वापरलें जातें.

कच्ची मच्छी परदेशांतून आयात होत नाहींच असें म्हटलें तरी चालेल; पण मिठांत मुरलेली किंवा तशीच सुकाविलेली मच्छी, डबे भरलेली मच्छी आणि कॉडलिव्हर वगैरे सारखे पदार्थ नॉर्वे, स्वीडन, अरबस्तान व मस्कत यांतून आयात होतात. मुरलेली, टिकवून ठेवलेली (preserved) मच्छी येथून चीन, ब्रह्मदेश, सिलोन आणि स्ट्रेट्स् सेट्लमेंट या प्रदेशांत निर्यात होते. त्याचें उत्पन्न १० लाखांपर्यंत आहे.

मच्छीची पैदास व ने-आण यांची वाढ होणें अत्यावश्यक आहे व त्यासाठीं मध्यसरकारनेंच प्रांतीय सरकारांच्या सहकार्यानें उचल केली पाहिजे. देशांतील या धंद्याची संघटना अखिल भारतीय पायावर व एकसूत्रीपणानें झाली पाहिजे. मासेमारीच्या साधनांची व स्थळांची निगा राखण्यासाठीं सरकारनें योग्य ती यंत्रणा तयार केली पाहिजे. 'कार्प' (carp) व इतर प्रकारचे मासे टिकविणें अधिक सुकर असल्यामुळें त्यांची पैदास वाढविणारीं केन्द्रें सरकारनें सुरू केलीं पाहिजेत आणि यांची तूट असणाऱ्या प्रदेशांत यांचें बियाणें पुरविलें पाहिजे. अशा पैदाशीला योग्य अशा स्थळांची पाहणी त्वरित झाली पाहिजे. सरकारी सत्तेखालची व खासगी मालकीचीं पैदाशीचीं स्थळें समृद्ध होण्यासाठीं सरकारनें खटपट केली पाहिजे; बियाणें गोळा करण्याचीं केंद्रें वाढवून असलेल्या केंद्रांतील मासेमार-कोळ्यांना कमी दरांत बियाणें पुरविण्याची योजना सरकारनें केली पाहिजे. मासे मारायला उपयुक्त असणारीं सर्व तळीं, डबकीं, पुष्करिणी वगैरे रद्द पडलीं असतील तीं सरकारनें कायदा करून आपल्या ताब्यांत घ्यावीत आणि खासगी तऱ्हेनें अशीं स्थळें बाळगणाऱ्या मालकांना मदत देऊन त्या स्थळांची डागडुजी व वाढ होईल असें सरकारनें करावें.

हा धंदा भक्कम पायावर चालण्यासाठीं सरकारनें या केंद्रांना दळणवळणाचीं साधनें पुरविलीं पाहिजेत, दरांतील भयंकर तफावत नाहींशीं करण्यासाठीं

सहकारी पद्धतीवर धंदा करण्यास उत्तेजन दिलें पाहिजे. मच्छी टिकविण्याच्या पद्धती येथें सुरू करून खासगी भांडवलदारांना त्याबाबत उत्तेजन दिलें पाहिजे, यांत्रिक मोटर-बोटींचा वापर अधिकाधिक होईल असें केलें पाहिजे. शेवटीं मुख्य गोष्ट ही कीं, या मच्छीमार जमातींच्या उन्नतीकडे सरकारनें लक्ष दिलें पाहिजे. गरजू कोळ्यांना सहकारी संस्थांतून मदत मिळेल अशी योजना केली पाहिजे. त्यांच्या मुलांना शिक्षण देऊन त्यांना मासेमारीला प्रवृत्त केलें पाहिजे. नौकानयन, यांत्रिक नौकांचा वापर आणि मच्छीमारीच्या सुधारलेल्या तंत्राचा उपयोग करण्याकडे त्यांचें मन वळविलें पाहिजे. चालू मालकी-हक्कांबाबत पाहणी करून याबाबत कोळ्यांना शाश्वती वाटेल, अशी स्थिति सरकारनें उत्पन्न केली पाहिजे. कारण, त्यायोगेंच पैदास वाढणें शक्य आहे आणि या कोळ्यांना त्यांच्या धंद्याची व इतर माहिती मिळत राहावी म्हणून सरकारनें माहिती-खातें उघडलें पाहिजे.

' सिंगर '–शिवणयंत्राची शतसंवत्सरी

महात्मा गांधींचा यंत्राबाबतचा विरोधी दृष्टिकोन सर्वांनाच माहीत आहे. पण त्यांनींहि ज्या कांहीं यंत्रांची गणना मानवमात्राच्या हिताला पोषक अशा यंत्रांत केली, त्यांत शिवणाच्या यंत्राचें स्थान वरचें आहे. असें हें शिवणाचें यंत्र सुसज्ज पणें ऐझॅक मेरिट सिंगर यानें बोस्टनमध्यें १८५० सालीं तयार केलें. त्यासाठीं त्यानें ४० डॉलरची रकम उसनवार घेतली होती. त्याच्यापूर्वीं बरींच वर्षें फ्रान्समध्यें Barthelmy Thimonier यानें असें एक यंत्र लष्करी गणवेष तयार करण्यासाठीं वापरलें होतें. १८४६ सालीं एलिअस हो (Howe) यानें शिवणाचें यंत्र तयार करून पेटंट मिळविलें होतें. या यंत्रांत डोळ्याच्या आकाराच्या टोकाची सुई व शट्ल (धोटा) यांची योजना होती. पण त्या यंत्रावर एका वेळीं फक्त कांहीं इंचपर्यंतच सरळ शिवणें शक्य होई. सिंगरनें या धोट्याची योजना स्वीकारून मशीनमध्यें नवीन सुधारणा करून नवीन मशीन तयार केलें व त्यावर एकसारखी शिवण येऊं लागली. हो आणि सिंगर यांच्यांत कोर्टकचेऱ्या झाल्या, वर्तमानपत्रांत वादविवाद झाले. ही सर्व लढाई ' शिवणयंत्राची लढाई ' म्हणून त्या काळीं ओळखली गेली. शेवटीं सिंगर, हो आणि क्लार्क मिळून एक 'सोइंग मशीन कॉम्बिनेशन् कंपनी' तयार झाली. १८७७ पर्यंत त्या कंपनीनें शेवटच्या पेटन्टवरची रॉयल्टी उपभोगली. पुढें रॉयल्टी नष्ट झाली.

ही सर्व हकीगत ' रीडर्स् डायजेस्ट ' च्या जानेवारी १९५१ च्या अंकांत टॉम महोनीच्या संक्षेपित लेखांत आलेली आहे. महोनी पुढें म्हणतो :

"सिंगरच्या यंत्रांची माहिती जगांत पसरूं लागली. १८५५ च्या पॅरिसच्या जागतिक प्रदर्शनांत त्याला फार मोठें बक्षीस मिळालें. त्यानंतर लगेच सिंगरची जाहिरात रिओ डी जॅनेरो येथें झाली. १८६१ सालीं कंपनीचा स्वदेशांतील खप फार मोठा होता. पण त्यापेक्षांहि तो परदेशांत जास्त होता. स्टॅन्लीनें लिव्हिंग्स्टन्चा शोध करावयास निघण्यापूर्वीं सिंगरचे विक्रेते (सेल्स्मेन) आफ्रिकेंत गिन्हाइकांच्या शोधार्थ जाऊन पोंचले होते. आफ्रिकेंतील एका जमातीला वाटलें कीं, चांगलें लोखंड चांगला आवाज देतें. तेव्हां एका सिंगरच्या अधिकाऱ्यानें आपल्या यंत्रांत तसा खडखडाट होण्याची व्यवस्था करून दिली. इन्डोनेशियांत सिंगरच्या एका माणसाला अपघात होऊन तो इस्पितळांत पडला; तर त्यानें तेथील डॉक्टर, नर्सेस् वगैरेंना आठ यंत्रें विकलीं. जपानमध्यें लोकांचा देशी झगा ' किमोनो ' शिवण्याची पद्धत लांब लांब टांके घालून शिवण करायची होती; म्हणजे त्यामुळें त्याचे भाग सुटे करून धुतां येत. हें पाहून सिंगरच्या एका एजंटनें आपल्या यंत्रांत तसे टांके घालण्याची सोय करून घेतली. नंतर ओकुमाच्या उमरावाच्या प्रोत्साहनानें सिंगर-कंपनीनें जपानमध्यें यंत्रावर शिवणकाम करण्याचें शिक्षण देणारी शाळा चालू केली आणि हजारों लोकांना पाश्चात्य पद्धतीचे कपडे तयार करण्याची कला शिकविली. एका धाडशी एजंटानें झारच्या सैन्यासाठीं २,५०,००० तंबू शिवून दिल्यावर सिंगर-कंपनीचा प्रवेश रशियांत झाला.

" सिंगरचीं यंत्रें व सुया यांची संख्या व तऱ्हा इतक्या वाढल्या आहेत कीं त्या सर्वांचा कॅटलॉग

१२ पौंड वजनाचा भरतो. सर्वांत लहान सिंगर यंत्र म्हणजे हातांत धरतां येण्यासारखें लहान मुलांचें यंत्र होय. सर्वांत मोठें यंत्र २५२६ पौंड वजनाचें असून त्यावर दीड इंच जाडीचे कन्व्हेयर पट्टे शिवले जातात. सर्वांत जास्त किंमतीचें सिंगर यंत्र ३००० डॉलर किंमतीचें असून त्यानें उंटाच्या केसापासून बनणाऱ्या कापडावर लॉक्स्टिच् जातीचे नागमोडी टांके घातले जातात.

"अगदीं नवीन तऱ्हेच्या एका सिंगर-यंत्रांत सुई-ऐवजीं विजेच्या उष्णतेचा उपयोग केलेला आहे. त्यामुळें प्लॅस्टिकचें पापुद्र्यासारखें साहित्य शिवून किंवा दाबून त्याचें रेनकोट, पाऊस-पडदे, बल्ब्स् व अशा तऱ्हेच्या इतर जिनसा तयार होतात. दुसऱ्या खास यंत्रामुळें पुस्तकांची बांधणी होते, नायलॉनची शिवण होते आणि गोण भरल्यावर त्यांचीं तोंडें शिवलीं जातात.

"या शतकाच्या सुरुवातीला शिवणयंत्राचा बाजार अमेरिकेंत आणखी वाढणें अशक्य झालें. अ ंर्ष्केत स्त्रियांनीं शिवणकाम सोडलें व जवळजवळ एक्ां पिढी शिवणकला न शिकतां तशीच वाढली. १९२२ सालीं अमेरिकेच्या शाळांतून तपासणी करतां असें दिसलें कीं, तेथें अद्ययावत् माहितीचीं शिवणकामा-बद्दलचीं क्रमिक पुस्तकें नव्हतीं आणि शाळांतून हा विषयच जवळजवळ रद्द झाला होता. सिंगरनें 'मशिन सोइंग' नांवाचें नवें क्रमिक पुस्तक शिक्षकांसाठीं तयार केलें व त्याचीच संक्षिप्त आवृत्ति विद्यार्थ्यांसाठीं तयार केली. मोठ्या आवृत्तीच्या ५ लाख आणि लहान आवृत्तीच्या ३० लाख प्रती अजूनपर्यंत खपल्या आहेत.

"लाखों घरांतून सिंगरचें यंत्र एक आवडता पैसे देणारा पाहुणा म्हणून कायम राहाणार आहे. सिंगर-कंपनीच्या एका बड्या अधिकाऱ्यानें नुकतेंच म्हटलें आहे, 'आमचीं पहिलीं वर्षे कष्टाचीं गेलीं. आतां आम्हांला विशेष काळजी नाहीं. फक्त, सर्व जगांतच नग्नसंप्रदाय पसरला तर मात्र निरुपाय होईल !' "

गुजरातची मध्ययुगीन राजनगरी चांपानेर

आज व्यापारी मानल्या गेलेल्या गुजरातचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास अनेक लढायांनीं भरलेला आहे, त्याचप्रमाणें तो अनेक सांस्कृतिक विशेषांनीं नटलेला आहे. अणहिलवाड–पाटण, वलभी, वगैरे नगरांप्रमाणेंच इतर नगरें भरभराटीस आलीं होतीं. आतां तीं नामशेष झालेलीं आहेत. त्यांपैकीं एक सध्यांच्या पंचमहाल जिल्ह्यांतील चांपानेर हें स्थान आहे. आज तेथें एक लहान खेडेगांव मात्र आहे. सभोंवतीं जंगलें माजलीं आहेत व त्यांतूनच मध्ययुगीन रजपूतसत्ता व त्यानंतरची मोंगली सल्तनत यांचे जीर्ण पण महत्त्वाचे अवशेष नजरेस पडतात. या ऐतिहासिक स्थळाबद्दलचा माहितीपूर्ण लेख मि. एच्. गोएट्झ् या सुप्रसिद्ध कलाभिज्ञ तज्ज्ञानें 'इलस्ट्रेटेड वीक्ली'च्या १८ मार्चच्या अंकांत प्रसिद्ध केला आहे. त्यांतील कांहीं भाग संक्षेपानें पुढें दिला आहे,

"मुंबईचें आजचें जें महत्त्व आहे त्याप्रकारचें महत्त्व खंबायतच्या आखातास होतें. परंतु त्या काळीं समुद्रावरील सत्तेला महत्त्व आलेलें नसल्यामुळें बंदरांचें महत्त्व केवळ व्यापारी राहिलें. राजकीय महत्त्वाचीं नगरें देशांतील अंतर्गत भागांत निर्माण [illegible] त्यांपैकींच गिरनार, राजकोट, वलभी, अणहिलवाड-पाटण, अहमदाबाद, आणि चांपानेर हीं शहरें होतीं.

"चांपानेर हें शहर १४८२ पासून १५३७पर्यंत गुजरातची राजधानी होतें. सुलतान बेगडा यानें तें जसें लष्करी दृष्टीनें निवडलें तसेंच सौंदर्य-स्थल म्हणूनहि पसंत केलें होतें. पण १५३५ मध्यें हुमायुननें तें लुटल्यावर तें बेगडानें सोडलें. पुढील काळांत तें शिंदेसरकारचा तात्पुरता बालेकिल्ला बनलें व शेवटीं त्याचें महत्त्व जात जात आज तें केवळ खेडेगांव बनलें आहे.

"चांपानेरच्या इतिहासाची सुरुवात अंधार-युगाच्या मध्यकालांत झालेली आहे. पावागडच्या प्रख्यात कालीमाता-मंदिराची यात्रा येथूनच सुरू होते. हें मंदिर इतक्या जुन्या काळचें आहे कीं, त्या काळीं पावागडावर फक्त भिल्ल लोकांचीच वसति होती. पण त्यापूर्वींच अणहिलवाड-पाटणच्या सोळंकी-चालुक्यांनीं तेथें आपला डोंगरी किल्ला तयार केला होता आणि नंतर रजपूत चौहाणांनीं, पृथ्वीराजाच्या पराभवानंतर, आपलें राज्य येथें सुरू केलें.

" स्थानिक रजपुतांच्या आक्रमणामुळें बेजार होऊन सुलतान महमुद बेगडा (१४५८-१५११) यानें पावागडवर स्वारी केली. पण शूर चौहाणांच्या सैन्यानें तो किल्ला दोन वर्षे लढविला. शेवटीं मोंगलांनीं एका कमी सुरक्षित भागावर हल्ला चढवून तेथून त्या संरक्षक दलावर जोराचा मारा केला. पाणी नाहीं, पीछेहाट करणें शक्य नाहीं अशा स्थितींत बहुतेक रजपुतांनीं राजभवनासमोर जोहार केला व उरलेल्या रजपूतांनीं छोटा नागपूर व देवबारिया येथें जाऊन आपलीं लहान राज्यें स्थापिलीं. महमूद बेगडानें ह्या किल्ल्याला नवीन साधनसामग्रीनें समृद्ध केलें आहे. त्यानें त्याच्या पायथ्याशीं आपली नवी राजधानी बांधली. मूळच्या वेढ्याची छावणी जहांपन्हा नांवानें सुलतानांचें रहिवाशाचें ठिकाण बनली.

" पण या ऐतिहासिक परंपरेपेक्षांहि अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे येथील ऐतिहासिक सौंदर्य स्थळें होत. या प्राचीन नगराच्या आसपास मोंगली सत्तेच्या काळांत निर्माण झालेलीं अनेक कलामय स्थळें आहेत. चांपानेरमध्यें प्रमुख गोष्ट म्हणजे गुजरातच्या सुलतानांच्या राजवाड्यांचे अवशेष हे होत. आज तेथें फक्त पडक्या विहिरी, भुयारांतील तळघरें, शुष्क अवस्थेत असलेला मोठा तलाव व त्याभोंवतींच्या बागेच्या खाणाखुणा आणि तलावांतील लहान-लहान बेटांसारखे बेगमांचे महाल असलेल्या जागा-एवढेंच तेथें आपणांस आढळतें. या राजमहालाच्या पलीकडे गोध्रा-दरवाजा असून त्याच्या समोरच मोठी आकर्षक अशी मोठी मशीद आहे. इतर मशिदी सुलतानांच्या बालेकिल्ल्याच्या उत्तरेस आहेत. त्याहि सुरेख आहेत. आणि त्यापलीकडे सुलतानांचीं कबरस्तानें आहेत. जहांपन्हा बालेकिल्ल्याच्या दक्षिणेसहि अनेक मशिदी, घाटाच्या विहिरी व जुने पूल आहेत. पूर्वेस मोठा तलाव पसरला असून तो शहराला लागून आहे.

" पण प्रवाशांचें खरें आकर्षण म्हणजे कालीमातेचें मंदिर हें होय. तें गडावर आहे. गडावर जैन मंदिरेंहि बरींच आहेत, पण तींहि कशींबशीं दुरुस्त केलेलीं आहेत. या मंदिरांत आढळणारी गुजराती पद्धतीची हिंदु-मुस्लिम संयुक्त वास्तुकला म्हणजे एक आश्चर्यकारक कृति आहे. येथील मुस्लिम वास्तुशिल्प हें खरें म्हणजे हिंदु वास्तुशिल्पाचेंच केवळ रूपांतर आहे. हिंदु-जैन मंडपांतील विविध प्रकारचे भाग मुस्लिम मशिदींतील कोनाडे आणि बोळ बनले आहेत. हिंदु मंदिरांतील गोपुराच्या मजल्यावर मनोरे चढून ते ' मिनार ' बनले आहेत. त्यांतील दरवाजेच नमाज पडण्याच्या जागा झाल्या आहेत. वाटोळे कळसच मशिदींचे घुमट व मनोरे बनले आहेत. अर्थातच हिंदु मंदिरांतील ' देवमूर्ति ' नष्ट होणें अपरिहार्यच होतें, पण हिंदु कलेतील निसर्गदृश्यें मुस्लिम वास्तूंतहि सामावून घेतां आलीं आणि त्यांतच इराणी कलेच्या आलेखांची व नमुन्यांची भर पडून तीं अधिक समृद्ध झालीं.

' चांपानेरची ही कला म्हणजे गुजरातच्या स्वतंत्र कलेच्या उत्कर्षाचा उच्चबिंदु होय. जंगला-जंगलांत, सभोंवतींच्या भव्य पर्वतराजींत, पहाड, धबधबे, तलाव यांच्या अंतरंगांत, या प्राचीन नगरीच्या असंख्य भग्नावशेषांत, त्या सौंदर्यनिर्मितीचें दर्शन आजहि आपणांस परोक्षपणें होतें व त्या समृद्धि-कालाच्या स्मृती मनांत तरळूं लागतात."

श्री. नन्दलालबाबूंचें चित्रकारांना मार्गदर्शन

शांतिनिकेतनांतील श्री. अवनीन्द्रनाथ आणि श्री. नन्दलालबाबू या चित्रकारांची कीर्ति त्रिखंड पसरलेली आहे. त्यांच्या सहवासांत आलेल्या व्यक्तींचीं त्यांच्याविषयींचीं मतें समजून घेणें साहजिक मोठें उद्बोधक वाटेल. अहमदाबादच्या एका श्रीमंत व सुसंस्कृत कुटुंबांतील एक विदुषी लीना मंगलदास या शांतिनिकेतनमध्यें १९३४ सालीं असतां त्यांना श्री. नन्दलालबाबूंच्या सहवासाचा लाभ मिळाला. त्यांनीं आपल्या रोजनिशींतील कांहीं भाग गुजराती ' प्रस्थान ' मासिकांत (फाल्गुन अंकांत) दिला आहे. त्यांत नंदबाबूंचीं कलाविषयक, विशेषतः चित्रकलाविषयक, मतें तळटीपेच्या रूपानें दिलेलीं आहेत. तीं महत्त्वाचीं वाटल्यावरून पुढें सारांशरूपानें दिलीं आहेत.

गप्पागोष्टी चालल्या असतां चित्रकलेसंबंधीं खास सूचना देण्याच्या उद्देशानें मास्टर महाशय (नंदबाबू) म्हणाले :

" आतां चित्रकलेतील 'वादिस्वरा'ची गुरुकिल्ली दाखवितों.—या खिडकीबाहेरच्या दृश्यांतील प्रत्येक वस्तूचें निसर्गात सारखेंच स्थान असतें ! पण निरनिराळ्या चित्रकारांनीं काढलेल्या या दृश्याच्या वेगवेगळ्या चित्रांत फरक पडेल...प्रत्येक चित्रकार जेव्हां चित्र रेखाटतो तेव्हां प्रत्येक जण आपापल्या आंखणीप्रमाणें अतिशयोक्तिपूर्वक प्रत्येक घटना प्रधान किंवा गौण स्थानीं ठेवील. एका गोष्टीला 'वादिस्वर' करून, इतरांना 'अनुवादि-स्वर' बनवून आपला आलेख तो तयार करतो. त्याचें हें चित्र निसर्गाचें अनुकरण असणार नाहीं ! केवळ अनुकरण अशक्य आहे, असत्य आहे ! निसर्गाचें अनुकरणहि तसेंच अशक्य आहे, अनावश्यकहि आहे !

" जेव्हां एकादा माणूस प्रथमच चित्रकला शिकूं लागतो तेव्हां त्याला वाटतें कीं काजळीसारखा काळा रंगच सर्वांत दाट रंग होय. पण तसें समजणें बरोबर नाहीं. दाट आणि अस्फुट या कल्पना सापेक्ष आहेत.

"सृष्टीच्या आकारांत व रंगांत चित्रसृष्टि सामावून जाते. पण सृष्टींतील लहानमोठे आकार आणि घट्टपातळ रंग जसेच्या तसे अनुकरणांत आणणें हा चित्रकाराचा हेतु असूं शकत नाहीं. आकार आणि रंग यांमधून प्रेरणा घेऊन त्यांचें मिश्रण आणि भेद यांवरून आपण आपली सृष्टि रचावी, पण बाह्य सृष्टीचें केवळ अनुकरण करूं नये.

" कापड, लांकूड, काच, दगड, चामडें वगैरे प्रत्येक पदार्थाच्या पोती (texture) मध्यें किंवा विणीमध्यें फरक असतो. शिवाय त्या प्रत्येकाचे पोटप्रकारहि असतात. उदा० सुती, लोकरी, रेशमी कापडाच्या सपाट विणींत विविध उपप्रकार दिसून येतात. पदार्थाचा आकार (form), वर्ण colour) आणि त्यावर पडणारा प्रकाश यांमुळें सपाटींत फरक पडतो. या सपाटीचे विविध आविष्कार अवलोकनद्वारें आपण मनांत बरोबर बिंबवून ठेविले पाहिजेत. याप्रमाणें ते मनांत बिंबविल्यावर जो पदार्थ रेखाटला जाईल, त्यावरून पाहणारालाहि तसाच अनुभव येईल.

" जेव्हां एखादी वस्तु पाहाल तेव्हां तिचा आकार, वर्ण, गति आणि लयबद्धता यांकडे बारकाईनें लक्ष द्या. एकदां या गोष्टी तुमच्या मनांत पक्क्या बिंबल्या, म्हणजे तुम्ही त्यांचें चित्रण वास्तविकपणें करूं शकाल आणि त्यामुळें कमींत कमी पण अत्यंत आवश्यक तेवढ्याच रेखांच्या द्वारें तुम्हीं ती वस्तु आलेखूं शकाल. हें लाघव व गौरव हीं कलेचीं आवश्यक अंगें आहेत.

" कुशल चित्रकार वस्तूचा प्रथम अभ्यास करतो. तिची प्रत्येक मुरड बरोबर मनांत बिंबवितो. मग एकाच सपाट्यांत आपली कलम फिरवून अखंड, वेगपूर्ण रेषा तो आपोआप रेखूं शकतो.

" याचप्रमाणें रेषांत सामर्थ्य व सातत्य येण्यासाठीं हाताला तालीम देणें अवश्य असतें. ही तालीम 'अल्पने'च्या द्वारें उत्तमप्रकारें मिळते. बंगालमध्यें तांदूळ बारीक खलून त्यांचा सफेत पातळ पदार्थ बनवितात ती 'अल्पना'. या पातळ चिकीनें बोटांच्या साह्यानें जमिनीवर रांगोळी काढतात. "

नन्दबाबू 'अल्पने'चे मोठे पुरस्कर्ते आहेत. फ्री-हॅन्ड् ड्रॉइंग आणि कलम यांवरील प्रभुत्व मिळविण्यासाठीं अवश्य ती तालीम या 'अल्पने'मुळें उत्तम मिळते. आणखी म्हणजे त्यामुळें शोभा-लेखन आणि 'डिझाईन' सुचायला कल्पनेला गति मिळते. पुष्कळ स्त्रियांच्या अंगीं प्रसाधन आणि सजावट यांची स्वाभाविक शक्ति असते. म्हणूनच नन्दबाबूंच्या प्रत्येक विद्यार्थिनीच्या तालमीचें 'अल्पना' हें एक खास अंग बनतें. त्यासाठीं प्रत्येक विद्यार्थिनीला 'शांतिनिकेतनां'तील विविध इमारतींत 'अल्पना' काढण्यासाठीं आळीपाळीनें पाठविण्यांत येतें.

एम्. सी. सी. चा जन्म व वाढ

क्रिकेटचा खेळ हिंदुस्थानांतहि फार लोकप्रिय झालेला आहे. इंग्लंडचा तर तो राष्ट्रीय खेळच आहे. या खेळाच्या क्षेत्रांत सर्वश्रेष्ठ सत्ता 'एम्. सी. सी.' या संस्थेची मानली जाते. तिच्या विषयींची मनोरंजक माहिती 'भिरर' मासिकाच्या ऑक्टोबर १९५० च्या अंकांत, एरिक बेनेटच्या लेखावरून संकलित करून दिलेली आहे, ती उद्बोधक आहे. खेळासारख्या क्षेत्रांतहि इंग्रज जनतेची शिस्तप्रियता आणि व्यवस्थितपणा कसा

दिसून येतो, तें पाहावयाचें असल्यास या संस्थेच्या वाढीचा इतिहास पाहाणें अगत्याचें ठरेल.

एम्. सी. सी. चें क्रीडांगण ' लॉर्ड्स् क्रिकेट ग्राउन्ड ' नांवाचें आहे. टॉमस लॉर्ड नांवाच्या त्याच्या पहिल्या मालकावरून तें नांव पडलें. १७८६ मध्यें दोघां उमरावांनीं लॉर्डला एक क्रिकेटचें नवीन क्रीडांगण चालू करावयाची सूचना केली व हें नवें क्रीडांगण सुरू झालें. १७८७ च्या खेळाच्या मोसमांत उमरावांचा 'व्हाइट फान्डुइट क्लब' M. C. C. मध्यें समाविष्ट झाला. पुढच्याच वर्षी M. C. C. ला एवढा आत्मविश्वास आला कीं, त्या संस्थेनें क्रिकेटचे नियम सुधारले. तेव्हांपासून आजतागायत एम्. सी. सी. ही क्रिकेटच्या खेळांत प्रमाणभूत संस्था मानली जाते. M.C.C. म्हणजे Marylebone Cricket Club. हें पहिलें क्रीडांगण सध्यां डॉर्सेट स्क्वेअर असलेल्या जागीं मेरील्बोन पटांगणांत होतें.

कोणी असें विचारील कीं, M.C.C. ला क्रिकेटवर आधिपत्य गाजवायचा काय हक्क आहे ? अधिकार कांहींच नाहीं. कारण, तशी कांहीं एखादी ' घटना ' किंवा कायदेशीर योजना नाहीं. केवळ दीर्घकालानें प्रस्थापित झालेली ती रूढि आहे आणि ती रूढि सर्व जगांतील क्रिकेटप्रेमी लोक आनंदानें स्वीकारतात एवढेंच. क्लबाचें धोरण सल्ला देण्याचें व मार्गदर्शन करण्याचें आहे. तो कधींहि हुकूम करीत नाहीं. त्याचा शब्द प्रमाण मानला जातो.

गेल्या शंभर वर्षांत या क्लबाची सभासदसंख्या ५६२ वरून ७००० हून अधिकावर गेली आहे. हें सभासदत्व मिळविणें सोपें नाहीं. एकदां तर उमराव लोक मुलगा झाल्याबरोबर त्याचें नांव उमेदवारांच्या यादींत नोंदवीत. पुढें १४ वर्षें वयाची अट घालण्यांत आली. इंग्लंडचे सुविख्यात ' प्लुम ' सर पेल्हॅम वॉर्नर १८९२ सालीं रग्बी येथें शाळकरी असतांना सभासद म्हणून निवडले गेले. यांनीं कांहीं दिवसांपूर्वींच आपल्या सीनिऑरिटीबद्दल चौकशी केली आणि त्यांना असें समजलें कीं, ते अजूनहि पहिल्या शंभरांत आलेले नाहींत ! सभासदांचा पुरवठा विद्यापीठांतील व परगण्यांतील क्रिकेटसंघांमधील खेळाडूंतून होतो. अनेक सीझन्‌मध्यें क्रिकेटच्या सामन्यांत भाग घेतल्यानंतर त्या शिफारशीवरच खेळाडूला सभासद करून घेण्यांत येतें व तेंहि निवडणुकीच्या पद्धतीनें.

सुरुवातीचीं वर्षें फारशीं चांगलीं गेलीं नाहींत. १८३२ मध्यें सभासद-संख्या अवघी २०० होती. १८२६ मध्यें लॉर्ड फ्रेडरिक ब्रोक्लार्क यांना वार्षिक ६०० पौंड क्रिकेटमधील पैजा आणि शर्यती यांतूनच मिळावयाचे. लांच-आणि-लबाडीबद्दलच्या तक्रारी चालू असत. १८१३ मध्यें विल्यम लॅम्बर्टनें पहिल्यांदा दरएक डावामध्यें धांवांचें शतक काढलें, पण इंग्लंड विरुद्ध नॉट्स् या सामन्यांत 'उत्तम प्रकारें न खेळून खेळाचा बाजार केल्या'बद्दल त्याला ताकीद देण्यांत आली !

१८६३ पासून एम्. सी. सी. चें सुवर्णयुग सुरू झालें. १८७६ मध्यें सभासदांची संख्या ६२५ वरून २०८० वर गेली. त्यानंतर तिचा आर्थिक दर्जाहि वाढला. या क्लबाच्या ग्रंथालयांत जगांतील सर्व क्रिकेटविषयक पुस्तकें आहेत. क्लबाची प्रसिद्ध ' लाँग रूम ' म्हणजे एक कलामंदिरच आहे. निरनिराळ्या काळांतील क्रिकेटपटूंचीं चित्रें आणि क्रिकेटच्या खेळांचे देखावे येथें संगृहीत केले आहेत. क्रिकेट पाहात असोत वा नसोत; पण सर्व क्षेत्रांतील मोठी मंडळी येथेंच जमतात व अल्पोपाहार करतात.

स्वतःच्या व्यवहाराप्रमाणेंच एम्. सी. सी. संस्था क्रिकेटच्या खेळासाठींहि काम करण्यांत गर्क असते. टेस्ट मॅचेस्‌ची स्थायी नियामक समिति असते ती टेस्ट खेळाडू निवडते. ह्या समितीचें कार्य एम्. सी. सी. च्या विद्यमानेंच चालतें. या समिती-बरोबरच, आधींच्या क्रिकेट मोसमांत यशस्वी झालेल्या दहा परगण्यांतील प्रतिनिधीहि असतात. यांत पहिल्या प्रतीच्या सर्व परगण्यांतील सभासदां-बरोबरच तीन दुय्यम परगण्यांतील प्रतिनिधीहि असतात; आणि ही सर्व समिति एम. सी. सी. मधील अध्यक्षांच्या हाताखालीं काम करते. परदेशीं खेळावयाच्या सर्व सामन्यांची व्यवस्था एम्. सी. सी. हीच करते व साम्राज्य-क्रिकेट-परिषदेसाठीं प्रतिनिधीहि तीच निवडते.

संपादकीय

मे महिना म्हणजे मराठी साहित्यसंमेलनाचा महिना. दर वर्षीं एखाद्या थोर साहित्यसेवकाची या संमेलनाध्यक्षपदीं निवड होऊन साहित्यिकांच्या दरबारांत त्याची साहित्यसेवा रुजू होत असते. या निमित्तानें वार्षिक अग्रपूजेचा मान मिळालेल्या साहित्यसेवकाच्या साहित्यसेवेचें गुणग्रहण आणि मूल्यमापन करणें उचित व बोधप्रदहि ठरतें. असा प्रयत्न ' नवभारत ' मासिक दरवर्षीं करीत आलें आहे. यंदा कारवारला भरणाऱ्या मराठी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाचे मानकरी श्री. अ. का. प्रियोळकर यांची साहित्यसेवा सामान्य वाचकांना फारशी विदित नाहीं. आणि याची जाणीव खुद्द श्री. प्रियोळकरांनाहि आहे. नुकत्याच एप्रिलमध्यें पुणें येथें महाराष्ट्रसाहित्यपरिषदेतर्फें झालेल्या त्यांच्या सत्कारसमारंभांत उत्तरादाखल भाषण करतांना श्री. प्रियोळकर म्हणाले कीं, " मीं जें कांहीं ललित लेखन केलें आहे, त्यापैकीं बरेंचसें अनामिक राहून केलें आहे, म्हणून तें फारच थोड्यांना माहीत आहे. जें संशोधनक्षेत्रांत लेखन केलें आहे, तें कांहीं तज्ज्ञांनाच परिचित आहे. त्यामुळें माझा परिचय कसा करून द्यायचा ह्याचा वक्त्यांना प्रश्नच पडतो ! "

या दृष्टीनें प्रस्तुत अंकांत प्रा. वसंतराव नाईक यांनीं श्री. प्रियोळकर यांच्या वाङ्मयाचा व व्यक्तिमत्त्वाचा करून दिलेला परिचय वाचकांस महत्त्वपूर्ण वाटेल. त्यावरून श्री. प्रियोळकर यांच्या वैविध्यपूर्ण वाङ्मयसंसाराची आणि त्यांच्या शांत, क्रियाशील व्यक्तिमत्त्वाची वाचकांस कल्पना येईल. प्रा. वसंतराव नाईक हे एक व्यासंगी, चिकित्सक आणि विद्वान् लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचा व श्री. प्रियोळकरांचा दीर्घकालीन परिचय असून त्यांनीं श्री. प्रियोळकर यांची साहित्यमार्गावरील प्रगति जवळून पाहिलेली आहे. म्हणूनच त्यांच्या लेखाला एक प्रकारचें वैशिष्ट्य आहे.—प्रस्तुत अंकांतील श्री. प्रियोळकर यांचा लेख त्यांच्या संशोधनविषयक वैशिष्ट्याचा निदर्शक आहे. ख्रिस्ती लोकांनीं सोळाव्या व सतराव्या शतकांत जें मराठी वाङ्मय लिहिलें, तें श्री. प्रियोळकरांचें एक अत्यंत आस्थेचें व जिव्हाळ्याचें संशोधनक्षेत्र आहे. प्रस्तुत अंकांतील त्यांच्या लेखाच्या द्वारें सेंटअँथनी-पुराणाचा मराठी वाचकांस प्रथमच परिचय होत आहे.—कांहीं वर्षांपूर्वीं श्री. प्रियोळकर यांनीं आपल्या एका लेखांत, इटॅलिअन जेसुइट रॉबर्ट डी नोबिली ऊर्फ तत्त्वबोधक स्वामी या ' जजुर्वेदी ब्राह्मणा ' नें १७७८ सालीं आपल्या नांवावर एक बनावट यजुर्वेद ग्रंथ प्रसिद्ध करून जें ' वाङ्मयकपट ' (Literary forgery) करून दाखविलें, त्याचा मनोरंजक परिचय करून दिला होता. डी नोबिलीच्या उपर्युक्त 'वाङ्मयकपटा'च्या पूर्वीं ३६ वर्षें म्हणजे १७४२ सालीं आधींच एक यजुर्वेदविषयक ' वाङ्मयकपट ' कसें घडून आलें, याचा मनोरंजक परिचय करून देणारा लेख पुणें विद्यापीठाचे संस्कृतविषयाचे प्राध्यापक डॉ. रा. ना. दांडेकर यांनीं लिहिला आहे. तो लेख या ' नवभारता 'च्या अंकांत स्थलाभावीं देतां आला नाहीं. तो पुढील अंकीं द्यावयाचें योजिलें आहे.

भगवद्गीतेंतून प्रतीत होणारें जीवनदर्शन, गीतेच्या अर्थाचें संशोधन, मनन आणि आचरण करणारे टिळक, गांधी, अरविंद यांचे जीवनविषयक विशिष्ट दृष्टिकोन, विशेषतः या जीवनदृष्टींचा सांप्रतच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या ' साधनशुचिते'च्या प्रश्नाशीं संबंध—यांविषयीं 'नवभारतां'तून तज्ज्ञांचे शक्य ते लेख द्यावयाचा संकल्प मागील अंकांत प्रकट केला आहे. अशा चर्चेच्या योगानें जें विचारमंथन होईल, त्या योगानें जिज्ञासूंना आपली विचार-आचारविषयक तात्त्विक बैठक ठरविण्यास साहाय्यच व्हावें, असा विश्वास वाटतो. आतांपर्यंत या विषयावर श्री. शंकरराव देव यांचे तीन लेख आणि श्री. किशोरलाल मश्रूवाला यांचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे. प्रस्तुत अंकांत या विषयासंबंधीं आचार्य शं. द. जावडेकर यांचा लेख प्रसिद्ध होत आहे. यापुढील अंकांतून डॉ. दप्तरी व श्री. ज. स. करंदीकर यांचे याच विषयासंबंधीं लेख येतील.

—वि. म. बेडेकर

अनुक्रमणिका